सहामाही „ ३ „ ...
साल अखेर „ ७ „ १ ...
किरकोळ अंकास ........................
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ...
दर ओळीस.......... ...
दुसरे खेपेस .... .........

Single copy ............................ 4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 2 SEPTEMBER 1901 NO 34

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २ माहे सप्टेंबर सन १९०१ इ० अंक ३४

## खरें बोलणें

आपल्या पत्रांत कांहीं दिवसां पूर्वी " खरें बोलणें " यावर लेख आला होता. त्यांतील विचार प्रत्येकानें मनन करून हृद यांत वागविण्या सारखे आहेत. शेवटीं खोटें बोलण्याची थोडी सवड देऊन आपण असें ह्मटलें आहे कीं, निरुपायास्तव खोटें बोलावें पण तसें बोलण्याचे आणीबाणीचे प्रसंग किती व कोणते आले होते याचें टिपण करून ठेवावें. मला वाटतें ही परवानगी आपण पूर्ण विचाराचे अंतींच दिली आहे.

प्रत्येक दिवसाचा विचार केला तर तितक्या वेळांत खोटें बोलण्याची हरएक मनुष्याची प्रवृत्ति किती वेळ होते याचा नेमच नाहीं. मनुष्य खोटें कां बोलतो याचा विचार केला तर तत्कालिक कांहीं गैर सोय, अल्पसा त्रास, व थोडा अपमान टाळावा, किंवा थोडा लाभ संपादावा इतक्याच करितां खोटें बोलण्याच्या मोहांत पडून तें पातक तो संपादितो, असें दिसतें. पण ह्या क्षुल्लक लाभांची आशा सोडून व थोडें धैर्य धरून सत्य भाषण केलें तर जो लाभ होईल व जें समाधान होईल त्याचें मोल कोणास करितां यावयाचें नाहीं आणि खरें बोलण्याची संवय ठेविली तर क्षुल्लक लाभांच्या आशेस मनुष्य गुंतणार नाहीं. आणि खरें बोलण्यास येणारे अडथळे कमी होत जाऊन शेवटीं नाहींतसे होतील. खोटें बोलण्याचा आणीबाणीचा प्रसंग एका व्यक्तीस सगळ्या जन्मांत एखादाच आला तर येईल. पण खरें बोलण्याचे निश्चयाचे अभावानें तसले प्रसंग दररोज १०।५ आलेसे वाटतील. खरें बोलण्याची ही शिफारस एका मनुष्या पुरती नाहीं, ह्मणून आपल्या भोंवतालचे लोकही सत्य भाषणी होतील तर क्रमाक्रमानें सर्वांचेच अडथळे दूर होतील.

असें समजा कीं, कोणी गृहस्थ एखाद्या जाणत्या मुलास, तुझे बाबा घरांत आहेत काय? किंवा कोणी गिऱ्हाईक, शेटजी दुकानांत आहेत काय? असें विचारतात. आलेले गृहस्थ आपल्या बापाचा वेळ मोडितील व आलेले गिऱ्हाईक देण्या घेण्या बद्दल शेटजीस भीड घालतील, ह्मणून " नाहीं " असें खोटेंच उत्तर देतात. येथें थोडी शी निस्पृहता धरिली, व किंचित मुरवत तोडिली तर काम होण्या सारखें असतें व खोटेंपणा पदरीं येत नाहीं.

एखाद्या मनुष्याचा धक्का लागून दौतींतील शाई सांडली व सामान्य कागद किंवा कपडे खराब झाले, अथवा भांड्यास पाय लागून दूध वगैरे पदार्थ सांडलें, किंवा एखादा कांचेचा जिन्नस फुटला, अथवा एखादा बस्ता खालीं पडून आंतील जिन्नस अस्ताव्यस्त झाले, व ज्याचा संशय आला त्यास पुसलें - या साधारण अपराधा बद्दल ही 'आपले कडून तसें झालें नाहीं, त्या वेळीं आपण तेथें नव्हतोंच' अशी साफ बतावणी करून पुरावा देण्यास तयार होतो. पण सत्यप्रीतीनें इतकेंच ह्मटलें कीं, 'मज कडून असें झालें खरें, पुढें असें न होण्या विषयीं मी जपेन,' तर तंटाच मिटतो. मालक सत्यप्रिय असेल तर आभारा खालीं दडपेल व सत्याचे पक्षपातानें त्याचा कंठ सद्गदित होईल. आणि तो साधारण असला तरी पुढें कांहीं करणार नाहीं.

या जगांत सत्यच, केवळ सत्यच, बोलण्याचा शेवट पर्यंत निश्चय केला तर मनुष्यांचे व्यवहारास अडथळा येइल, असेंहि एखादे वेळीं घडण्याचा संभव आहे. हें ह्मणणें अत्यंत गौण आहे खरें, तरी तसें ह्मटल्या वांचून राहवत नाहीं. असा प्रसंग येणें न येण्यासारखाच आहे. तरी तो येतो ह्मणून त्यास सवड ठेविली पाहिजे. तशा सुविरल प्रसंगीं सत्य कोणतें हें देखील निराळ्या व्याख्येनें सांगितलें पाहिजे. सत्याची व्याख्या फिरविली ह्मणजे असत्याचे दोषापासून मनुष्य मुक्त होतो. कोणताहि सद्गुण घ्या. त्याचा अतिरेक झाल्यानें दोषाचा मुलामा त्यावर चढतो. उदार स्वभावाचा अतिरेक झाला तर उदार माणूस भीक मागूं लागेल. दयेचा अतिरेक झाला तर चोर, मारेकरी, वाघ, लांडगे व सर्पादि उग्र प्राणी यांजवर दया होऊन गरीब बिचाऱ्या लोकांचा चुराडा होईल. ही कसली उदारता? व ही कसली दया?

खरें बोलण्याच्या सद्गुणाची केवळ मूर्तीच असा जो राजा युधिष्ठिर त्यासही एक वेळ असत्य बोलावें लागलें. याचा भावार्थ, 'संपूर्ण अंशानीं सद्गुणांचा पुतळा मनुष्य नव्हे, ईश्वर मात्र आहे, ह्मणून थोडा तरी डाग लागतो' असा आहे कीं काय कोण जाणें!

सगळ्या सद्गुणांचें सार व हेतु, एकंदर मानव जातीचें कल्याण साधावें हा आहे. खोटें बोलण्यानें विशेष व्यक्तीचें हित होतें पण मानव जातीचें निष्कारण अनहित होतें. सत्य बोलण्यानें एकंदर मानव जातीचें हित साधतें व कोणा विशिष्ट व्यक्तीचें अनहित होत असेल ह्मणून एखादे प्रसंगीं तसें (सगळ्या मानव जातीचें) हित नेणें करून साधतें तें " खोटें बोलणें " खोटें बोलणेंच नव्हे तर खरें बोलणेंच आहे असें ठरविण्यास कोणता प्रत्यवाय आहे?

अशा अत्यंत विरल प्रसंगा पुरती व्याख्या फिरविली, ह्मणजे 'सत्य बोलावें' या नियमास अपवाद करावयास नको. नेहमींचें सत्य काय, व तशा प्रसंगाचें सत्य काय, याची परिस्फुटता खालील पद्यांत सांपडेल. यांत सत्याचें महत्व कमी केलेलें नाहीं, मात्र जगांत सत्य तसें असत्यही आहे. त्याचा मनुष्याचे हिताकरितांच प्रसंगा पुरता गौरव केला आहे कीं काय कोण जाणें!

खरें बोलण्यापासून आपणास कमीपणा येतो तो टाळावा ह्मणून लोक असत्य बोलतात, व फार मोठें नुकसान करितात. वैद्याच्या उदाहरणांत हें स्पष्ट होतें. रोग्याची प्रकृति आपणास समजली नाहीं, व आपले जवळ त्यास देण्यास औषध नाहीं, हें जाणत असून वैद्यराज असत्याचरणास प्रवृत्त होतात व रोग्याचा जीव घेतात. स्वतःचा कमीपणा उघड करण्याचें धारिष्ट होत नसेल. व तें न होणें सहज आहे. तरी ही स्वतःची अब्रू व रोग्याचा जीव त्यास वांचवितां येईल. 'आपण याची प्रकृति अमुक वैद्यास दाखविली तर बरें होईल.' वगैरे सुचनेनें स्वतःचरचें व दुसऱ्याचें संकट त्यास निवारितां येईल. सारांश खरें बोलण्यावर मनापासून प्रेम ठेवावें, व तसें वर्तावें ह्मणजे दिसून येईल कीं, किती एकांच्या अणीबाणीच्या प्रसंगांच्या टांचण वह्या कोऱ्याच राहतील.

---

( प्राणि समुहाचें हित साधणें हें धर्माचें मुख्य रहस्य आहे यास अनुलक्षून सत्यासत्याचीं लक्षणें दिलीं आहेत. )

आर्या.

जो सत्याचा वक्ता, साधुचि तो,
यांत संशयचि नाहीं ॥
बहु पूज्य सत्यवादी, त्रिजगीं
उपमान त्या नसे कांहीं ॥ १

परि जें कीं सत्य असे, केवळ दुर्ज्ञेय[1]
दीर्घबाहो! तें ॥
कोठें सत्यचि परमा–धर्म फळा कारणेंचि
वा होतें ॥२

वदतां सत्य अधर्मचि, घडतो,
वदतां असत्य, धर्म घडे ॥
आजन्म सत्यवादी, त्याहि सुपुरुषा
असा प्रसंग पडे ॥ ३

तेव्हां अशा प्रसंगीं, शुचि, हरिप्रिय सत्य,
जरि गळ चि जड ॥
पर्वीं[2] जैसें दयिता–रत्न तसें कैवसि[3]
सोडणेंचि पडे ॥ ४

नित्य अशुचिअनृत तरी, समयविशेषीं,
सुधीं[4]सि तें होय ॥
धर्मार्थ सेव्य; जैसें पर्वींच
क्षारसिंधुचें तोय ॥ ५

जोडे धर्म बरा तरि, अनृतहि बोलोनि
धर्म जोडावा ॥
जोडे अधर्म सत्यें, तरि सत्याचाहि
संग सोडावा ॥६

सत्यानृत–तत्वज्ञचि,
धर्मज्ञ; तदन्य मूढ फारचि तो ॥
धर्म–रहस्य न जाणे,
कैर्मभर[5] शिरीं कशास वा रचितो ॥ ७

( धर्माचें खरें तत्व न समजून खटाटोपांतच ज्यांचा भर असतो त्यांनीं यांतील हेतुकडे लक्ष द्यावें. )

जातीनें अधम असो,
घातकहि असो अतो महा घोर ॥
जो काय कृतप्रज्ञ,
प्राज्ञमतें पुरुष तो जगीं थोर ॥८

( एखाद्या विशिष्ठ जातींत जन्म घ्यावा हें कोणाच्या हातचें नाहीं. तर मग हलक्या जातींत जन्मल्या मुळेंच पतित व उंच जातींत जन्म पावल्या मुळें श्रेष्ठ असा सिद्धांत ठरेल. या आर्यैतील भावार्थ तसा नाहीं. कितीही दुष्ट जातींत जन्मला असो, सारासार[6] विचार करणारा आहे तर जन्म ज्ञातिमुळेंच तो फुकट गेला असें होणार नाहीं. सत्पुरुष त्याची श्रेष्ठजनांत गणना करितात.

जो रानीं चोरांनीं
धरिला त्याची घडावया मुक्ती ॥
लेश विचार न करितां
बोलाव्या तेथ शत मृषा उक्ती ॥ ९

असतां शक्य नद्यावें,
धन चोरांला मृषाहि बोलावें ॥
राहे धन पुण्य घडे,
अनृतें; तरि कां मुखें न डोलावें ॥ १०

आकोला २१।८।१९०१
वि.

---

१ समजण्यास अशक्य. २ अमावास्यादिपर्व दिवशीं. [ स्त्री गमनास वर्ज्य दिवशीं असा भावार्थ ] ३ ज्ञान्यास. ४ पंडितास. ५ खटाटोप, कर्मांचें ओझें,

६ सारासार विचार करण्यास.

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ४ शके १८२३

## √ भले बहादर !

√( लॅन्ड रेव्हिन्यु कोड, अमेंडमेंट बिल
आणि
√ नेटिव नामदारांचें सभेंतून उठून जाणें )

मुंबई इलाख्याचे गव्हरनर साहेबांचे कायदे कौन्सिलांत वरील नांवाचा कायदा फार दिवसां पासून विचारा साठीं पुढें आणिलेला होता, तो अखेरीस गेल्याचे मागील आठवड्यांत पुणें येथें भरलेल्या कायदे कौन्सिलाचे बैठकींत पास झाला. हा कायदा ह्मणजे काय आहे याची हकीकत थोडक्यांत

सांगून होणार नाहीं. ती हकीकत पुण्याच्या केसरी पत्रांत इत्थंभूत छापलेली आहे. कुळांची जमीन सावकार लोकांच्या हातीं जाऊन कुळें बुडतात ह्मणून सावकारांच्या पेचांतून कुळांस वांचविण्या करितां ह्मणून सरकारानें हा कायदा केला आहे. ह्मणजे घटकाभर सरकारच कुळांचे सावकार बनणार आहे. आणि याचा परिणाम असा होणार आहे कीं, कुळांची मालकी त्यांच्या जमिनीवर न राहिल्या मुळें सावकार लोक ह्मांना कर्जाऊ पैसे देणार नाहींत व पैसा न मिळाल्या मुळें कुळांच्या जमिनी पडित राहतील आणि सरकारचा सारा सरकारास न मिळाल्यास कुळांच्या जमिनी सरकारा कडे जाऊन कुळें भिकेस लागतील. अशा सारख्या अर्थाचा हा नवीन कायदा आहे. कायदे कौन्सिलांतील नेटिव सभासदांनीं हा कायदा पास न होण्या संबंधानें मोठी लांबलचक आणि जोरानें व आवेशानें भरलेलीं अशीं भाषणें केलीं. नामदार मेथा, सर भालचंद्र, गोखले, खरे, आणि पारख व इतर मेंबर यांचीं भाषणें अतिशय कळकळीचीं व नेटाचीं झालीं. त्यांत त्यांनीं असें दाखविलें कीं, रयतेच्या हक्काची पायमल्ली या कायद्यानें जशी होणार आहे तशी आजपर्यंत या देशांत किंवा अन्य देशांत कोणत्याही रयतेची कधीं झाली नसेल. कायद्याचा विचार कांहीं दिवस पर्यंत तहकुबीवर ठेवावा ह्मणजे मोठमोठ्या विद्वानांची, मुत्सद्यांची व न्यायाधिशांचीं मतें घ्यायास सवड मिळेल, अशी उपसूचना ना० मेथा यांनीं आणिली होती पण कौन्सिलांतील सरकारी मेंबरांच्या मतबाहुल्यानें ती हाणून पाडण्यांत आली. गव्हरनर साहेबांच्या मेजावर रयतेच्या अर्जांचे ढीगचे ढीग येऊन पडले होते पण तेही सर्व धाब्यावर बसविण्यांत आले. शिवाय या कायद्याविरुद्ध मुंबई इलाख्यांतील वर्तमानपत्रांनीं अतिशय ओरड केली होती पण तिकडेही मुंबई सरकारानें लक्ष दिलें नाहीं. कायद्याचें पहिलें वाचन होऊन दुसऱ्या वाचनाच्या वेळीं ना० मेथा यांची सूचना रद्द होऊन आतां तिसरें वाचन होऊन बिल पास होणार असें जेव्हां नेटिव मेंबरांनीं पाहिलें तेव्हां त्यांना किती वाईट वाटलें असेल हें सांगायास नको. कारण कायदे कौंसिलांत सरकारानें नेटिव मेंबरांस बसण्याचा जो हक्क दिला आहे तो अशा करितां कीं रयतेची स्थिती सरकार पेक्षां नेटिव लोकांस चांगली कळण्याचा जास्त संभव आहे, व त्यामुळें हे नेटिव मेंबर रयतेची वास्तविक स्थिती सरकारास कळवून कोणत्याही कायद्या पासून रयतेचें नुकसान होणार नाहीं अशा बद्दल काळजी घेतील. अशा प्रकारचा कायदे कौन्सिलांत नेटीव मेंबर नेमण्याचा मूळचा हेतु आहे. असें असून व हल्लींच्या प्रसंगीं हा कायदा पास झाल्या पासून रयत सर्वस्वी बुडणार आहे असें सदरहू मेंबरांनीं सरकारास स्पष्ट दाखविलें असतांही, सरकार निवळ दुराग्रहानें हा कायदा पास करीत आहे असें सदरहू मेंबरांनीं मनांत आणून असा विचार केला कीं, तिसरें वाचन होऊन कायदा पास होण्याच्या वेळीं आपण काउन्सिलांत आपल्या बसण्यापासून कायदा पास होण्यांत आपण सहाय झालो असेंही कदाचित् सर्व लोकांस वाटेल असा विचार करून पांच नेटिव मेंबर सभेंतून उठून बाहेर गेले.

हिंदुस्थानांत इलख्यानिहाय कायदे काउन्सिलांत नेटिव मेंबर नेमले गेल्या पासून प्रजेस अहितकारक व नेटिव मेंबरांस असंमत, असे कायदे पुष्कळ झाले असतील परंतु 'आणखी कांहीं आमच्यानें करवत नाहीं तर नाहीं, परंतु सगळा इलाखा ज्याच्या विरुद्ध ओरडतो आहे असा कायदा निवळ सत्तेच्या जोरानें तुह्मी पास करितां आहां, हें निदान आमच्यानें उघड्या डोळ्यांनीं पाहवत नाहीं असें दाखविण्याकरितां गव्हरनर साहेबांच्या समोर बसलेले मेंबर त्यांच्या समक्ष धडधडीत उठून बाहेर चालते झाले, अशा प्रकारचें हें पहिलेंच उदाहरण होय. या मेंबरांच्या बहादरीचें व धैर्याचें जितकें वर्णन करावें तितकें थोडें! शाबास, शाबास, शाबास, असा त्रिवार जयघोष करून मेंबरांचें अभिनंदन केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. याचें नांव पाणी. सर्व इलाख्याच्या तर्फे काउन्सिलांत निवडून गेलेल्या किंवा नेमलेल्या मेंबरांच्या अंगीं इतकें पाणी आहे ही गोष्ट अत्यंत समाधानाची आहे. हें मेंबरांचें उठून जाणें या कायदे काउन्सिलाच्या इतिहासांत मोठी गोष्ट समजली पाहिजे व भावी इतिहासकार आपल्या इतिहासांत ती नमूद केल्यावांचून राहणार नाहींत. लोकाग्रणींत इतकें पाणी असलें तरी बस आहे. हा धडा फुकट जाणार नाहीं; ही हकीकत वाचून मुंबई इलाख्यांतीलच काय परंतु इतर प्रांतांतील लोकांसही फार वाईट वाटेल. पराजित आणि निःशस्त्र अशा राष्ट्रांमध्यें लोकाग्रणींच्या अंगीं इतकें धैर्य आहे हें अत्यंत शुभसूचक चिन्ह होय. सदरीं सांगितल्या प्रमाणें मेंबर लोक नुसते उठून गेले यांत पुष्कळ गर्भितार्थ आहे तो असा कीं "आपण सरकार अहां, आपण बलाढ्य अहां, आपण हवें तें करूं शकतां, आपणास प्रतिबंध करणार कोण आहे, कायदे काउन्सिलांत आह्मांला नेमण्याचें आपण सोंग तरी कशाला केलें आहे, आमच्या सारखीं बाहुलीं येथें पाहिजेत तरी कशाला, हे आह्मी चाललों आपण बिल पास करा, वाटेल तें करा.' इतकीं भाषणें गव्हरनर साहेबांस प्रत्यक्ष ऐकविणें आणि उठून जाणें या दोहोंचा अर्थ एकच. रयतेची व वर्तमानपत्रांची एवढी ओरड असून, आणि काउन्सिलांतील सर्व नेटिव मेंबर इतके विरुद्ध असून, सरकारानें हा कायदा पास केला, व कांहीं काळपर्यंत तहकूबीवर टाकण्याच्या उपसूचने कडेही लक्ष दिलें नाहीं ही सरकारची मोठी चूक झाली आहे. इंग्लंद सारख्या स्वतंत्र देशांत जर सरकारनें दांडगाईनें असा कायदा पास केला असतां तर घोर परिणाम झाल्या वांचून कधींही राहिले नसते. हिंदुस्थानांत रयत बिचारी हतवीर्य आणि निःशस्त्र होऊन मेंढरां प्रमाणें झाली आहे. पण मेंढरां प्रमाणें ती अज्ञान नाहीं हें सरकारनें विसरतां कामा नये. सोन्याची

राजे मिळणाऱ्या अड्यांवर सरकारनें संतुष्ट रहावें हें शहाणपणाचें आहे. हंसाला मारून टाकून त्याच्या पोटांत हजारों अंडीं असतील तीं मिळविण्याचा यत्न करूं नये. हिंदुस्थानची रयत अगोदरच भिकारी आहे. त्यांत आणखी तिला खायालाही मिळत नाहीं असें होऊन ती रयत नष्ट झाली असतां त्या पासून सरकारचें कांहीमात्र हित होणार नाहीं हें इंग्रजी मुत्सद्यांस सांगायास नको. लार्ड कर्झन साहेब या बिलास आपली संमति देणार नाहींत व कोणत्या तरी युक्तिप्रयुक्तीनें हें बिल कोनाकोपऱ्यांत पडूं देतील अशी आह्मास उमेद आहे. दादाभाई नौरोजींच्या सततच्या ओरडी कडे सरकारचें लक्ष पोहोचो. ती ओरड ही कीं, हिंदुस्थानच्या रयतेस तुह्मी कंगाल करूं नका; तिच्या पोटावर पाय देऊं नका; तसें न कराल, तर दोन्ही देशांस विघातक असे परिणाम घडल्या वांचून राहणार नाहींत.

## अभिनंदन

आनंदाच्या सुयोगाला प्रत्यक्ष दर्शनानें मोठीच शोभा येते. मे. इलियट साहेब यांस कमिशनरीचा हुद्दा मिळाला ही गोष्ट सर्व प्रांतभर मोठी आल्हादकारक वाटली. पण अशा यशस्वी व लोकप्रिय अधिकाऱ्याची प्रत्यक्ष गांठ इतके दिवस पर्यंत पडली नव्हती. ह्मणून मे. इलियट साहेब कमिशनरच्या नात्यानें गेल्या रविवारीं रात्रौ आले तेव्हां त्यांच्या अभिनंदनासाठीं या शहरची सुखवस्तु मंडळी व अधिकारी मंडळी स्टेशनावर त्यांस सामोरी गेली होती. गेल्या गुरुवारीं सायंकाळीं येथील नेटीव क्लबाच्या मित्रमंडळीनीं साहेब बहादुरांस पानसुपारीस बोलाविलें होतें. या समारंभाला पुष्कळ गृहस्थ मुद्दाम आले होते. समारंभ मोठा थाटामाटाचा होता आणि त्या दिवशींच्या पाहुण्याच्या आदरातिथ्या संबंधानें नाटकाचा प्रयोगही करविण्यांत आला. मध्यंतरीं फळाहाराचीही योजना केली होती. मे. इलियट साहेब या नव्या अधिकारावर कायम होवोत आणि याचा नैसर्गिक सुशीलपणा आणि सभ्य व मर्यादशील गोडपणा या प्रांतास दीर्घकाल लाभो असे सर्वांचे उद्गार निघत होते. या प्रसंगाला क्लबाच्या मंडळीमध्यें मुख्य पुढाकार कुमार श्री हरबामजी यांनीं घेतला होता. हे राजकुलीन थोर पुरुष इतक्या थोड्या कालांत फारच लोकप्रिय झाले आहेत हें पदोपदीं ध्यानांत येईल. आह्मी मे. इलियट साहेबांचें अभिनंदन पुन्हा एकवार करून त्यांस प्रार्थना करितों कीं त्यांनीं या प्रांतांतील लोकांस आनंद देऊन आपली कीर्ती बहुगुणित करावी!

## क्रिकेट खेळ

क्रिकेटचा खेळ आमच्या प्रांताला नवा आहे. पण हाच खेळ हल्लीं मोठा आवडता झाला आहे. या खेळाचे सामने अलिकडे पुष्कळ होऊं लागले आहेत. मे. क्यांडी साहेब वऱ्हाडांत आल्या पासून त्यांनीं शारीरिक शिक्षणाला मोठें उत्तेजन दिलें आहे. ते स्वतां खेळ खेळतात. त्यांच्या आश्रयानें दोन्ही हायस्कूलमध्यें सामने होतात. ईर्षा, वीरश्री व महत्वाकांक्षा हे सद्गुण विद्यार्थ्यां मध्यें खेळते दिसतात. मे. क्यांडी साहेब दुसरे युरोपियन आफिसर जमवितात आणि त्यांचा एक पक्ष बनवितात. विद्यार्थी मंडळीचा दुसरा पक्ष असतो. गेल्या १०।१२ दिवसांत अकोल्यास या दोन पक्षामध्यें तीन सामने झाले. हा खेळ नवा खरा पण विद्यार्थ्यांनीं तो अगदीं आपलासा केला आहे. युरोपिअन मंडळींशी यांचे सामने चांगले झाले आणि त्यांनीं आपली गती चांगली दाखविली ही मोठी समाधानाची गोष्ट होय. या खेळांत विद्यार्थ्यांचा विजय होण्याचा पुष्कळ वेळां सुयोग आला होता. विद्यार्थ्यांच्या शारीरिक संपत्ती विषयीं डायरेक्टर साहेब फार काळजी घेतात आणि त्यांच्याच परिश्रमामुळें हल्लींचे खेळ दृष्टीस पडत आहेत. विद्या फार झाल्या आहेत आणि अभ्यासाच्या बोजा खालीं विद्यार्थी अगदीं दबलेले असतात. अशा समयीं हा खेळाचा मार्ग प्रचलित झाला आहे ही भाग्याची गोष्ट होय. मर्दुमकी नवीन पिढींत तरी कांहीं जिवंत राहो एवढीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

## मंत्री मंडळ

हैदराबादच्या दरबारांत मोठीच क्रांती झाली आहे. नबाब विकार उल् मुल्क यांनीं आपल्या दिवाणगिरीचा राजिनामा दिला. अलिकडे निजाम सरकार व दिवाणसाहेब यांचा फारसा सलोखा नव्हता ह्मणून नवीन प्रधानमंडळाची मोठीच जरूरी झाली. हैदराबादच्या संस्थानांत अनेक राजकारणें चालूंच असतात पण जेव्हां दिवाण बदलतात तेव्हां राज्यकारभाराला दिशा निराळी लागली असें मानतात. महाराज किशनप्रसाद पेशकार व लष्करी खात्याचे सेक्रेटरी यांस दिवाणगिरी देण्यांत आली आहे. सुप्रसिद्ध व विख्यात राजा चंदूलाल यांचे हे वंशज आहेत. या घराण्यांत पूर्वीं दिवाणगिरी होती आणि ती तेथेंच परत आली. ही आनंदाची गोष्ट होय. महमदी निजाम सरकारचे दिवाण हिंदु आहेत ही गोष्ट हिंदु मुसलमानांच्या एकजीवाची पूर्ण साक्ष देत आहे.

## राजकीय सभा

मुंबई इलाख्याची प्रांतिक सभा यंदा मुंबईस नेटीव जनरल लायब्ररी मध्यें तारीख १४ सप्टेंबर शनिवार व तारीख १५ सप्टेंबर रविवार या दोन दिवशीं भरणार आहे. ही वार्षिक सभा भरविण्यांत येते किंवा नाहीं या विषयीं मोठी शंका होती. पण बांम्बे प्रेसिडेन्सी असोशिएशनच्या आश्रया खालीं ही सभा होणार आहे तेव्हां ती यशप्रद होईल या बद्दल कांहींच काळजी राहिली नाहीं. मे. दिनशा एदलजी वाचा, अबिरुद्दीन तयबजी, व चिमणलाल सेटलवाड या त्रिमूर्तींच्या सहीनें आमंत्रणें पाठविण्यांत आलीं आहेत. असे लोकमान्य अग्रणी जें कार्य हातीं घेतास तें सुफळ होईलच. नवीन जमिनीचा कायदा मुंबई सरकारनें लोकमताला न जुमानतां दांडगाईनें केला आहे तेव्हां लोकमताची जागरुकता कायम ठेवून सरकारचा निषेध मोठ्या कडाख्यानें झाला पाहिजे.

## सामाजिक सभा

मुंबईची सामाजिक सभा वरील राजकीय बैठकीच्या प्रसंगानें स्वतंत्र भरविण्यांत येणार आहे. अध्यक्षस्थान डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर एम. ए. हे सुशोभित करणार आहेत. नामदार न्यायमूर्ती रानडे यांच्या निधनामुळें जी मोठी राष्ट्रहानी झाली आहे ती कांहीं भरून येण्यासारखी नाहीं. तथापि दुःखांत सुख इतकेंच कीं या महात्म्याच्या प्रेरणेनें चालू असलेल्या संस्थांचा पुढाकार नामदार न्यायमूर्ती चंदावरकर यांनीं आपल्याकडे घेतला आहे. कै० रानडे यांची कार्यमाला निराश्रीत राहणार नाहीं ही आनंदाची गोष्ट होय. सामाजिक प्रगतीच्या खुणा निराळ्याच असतात पण या सभेच्या द्वारानें यांची माहिती चांगली होत असते; आणि पुढील सुधारणांचें स्वरूप व धोरण हीं या सभेंतील वादविवादा वरून चांगली कळून येतात.

## फौजदारी न्यायखातें

या खात्याची वर्षाची कामगिरी दर सालच्या रिपोर्टांत आली ह्मणजे ती वाचण्याकडे लोकांची धांव विशेष असते. पण यंदाचा ह्मणजे १९०० सालचा वार्षिक रिपोर्ट अगदींच लहान आहे आणि त्यामध्यें माहिती जितकी पुष्कळ यावयाला पाहिजे होती तितकी नाहीं. इंडिया सरकारच्या नव्या हुकुमा प्रमाणें ही माहिती फार संक्षिपानें देण्यांत आली आहे. या रिपोर्टाचा सांचा पटच्री असावा असा अलिशान रेसिडेंट यांचा हुकूम आहे. या रिपोर्टांतील कांहीं पत्रकें यापुढें गाळावीं अशीही सूचना झाली आहे. १९०० चा रिपोर्ट नमुन्या प्रमाणें आहे आणि त्याच्याच धोरणावर पुढील रिपोर्ट असावेंत अशा विषयीं मुद्दाम शिफारस झाली आहे. मे० इलियट साहेब यांच्या हातचा हा शेवटला रिपोर्ट आहे आणि या पुढें फौजदारी रिपोर्टाशी त्यांचा संबंध पडणार नाहीं असा भरंवसा आहे

रिपोर्टाच्या वर्षीं फौजदारीकडे ७६ न्यायाधीश काम करीत होते. फौजदारी कोडतामुळें जे गुन्हे आले त्यांची संख्या १७९८१ आहे. ही संख्या मागील दुष्काळाच्या वर्षापेक्षां ३७२ नें वाढली आहे. या संख्येमध्यें वऱ्हाड प्रांता बरोबर हैदराबाद रेसिडेन्सी, औरंगाबाद, जालना, हिंगोली इत्यादि भागांतील गुन्ह्यांचा समावेश होतो. १९०० सालीं पहिले आठ नऊ महिने दुष्काळच होता. आणि त्यामुळें चोरी, घरफोडी, लुटालुटी वगैरे सारखे गुन्हे पुष्कळ वाढले. असे गुन्हे एकंदर ९८१० झाले. ही संख्या मूळच्या संख्येच्या दुपटीहूनही थोडी अधिक आहे. हे गुन्हे वाढतात पण त्या बरोबर पोलिसांचें ३४ वे कलमाखालचे गुन्हे, मुनसिपल कायद्या अन्वयें होणारे गुन्हे, अबकारीचे गुन्हे, आणि मारामारीचे, धमकीचे, दुखापतीचे, अब्रूचे व कोंडवाड्या संबंधीं गुन्हे पुष्कळ कमी झाले आहेत. अशा प्रकारचे गुन्हे सारे ७५७८ नजरेस आले. दुष्काळामुळें लोकांच्या पाशीं अशा गुन्ह्यांच्या फिर्यादीअयादी करण्याला पैसा नव्हता आणि पोटाच्या धंद्यामुळें त्यांस हीं कामें करण्याला फुरसतही झाली नाहीं.

२७३९२ लोकांवर फौजदारी खटले करण्यांत आले. त्यापैकीं १८६११ अपराध्यांवर गुन्ह्यांची शाबिती होऊन त्यांस दंड, सजा वगैरे शिक्षा सांगण्यांत आल्या. १९०० सालीं पुष्कळशा ह्मणजे १९३२ फिर्यादी रद्द करण्यांत आल्या. जुडिशिअल कमिशनर साहेब ह्मणतात कीं, इतक्या फिर्यादी काढून टाकण्यांत आल्या, पण तसें करण्याला योग्य कारणें नव्हतीं असें दिसून आलें नाहीं.

जिल्हा माजिस्ट्रेटांनीं फौजदारी काम पुष्कळ केलें पण बुलढाण्याचे डिपुटी कमिशनरापासून जितकें व्हावयाला पाहिजे होतें तितकें झालें नाहीं. समरी अधिकारा खालचे गुन्हे पुष्कळसे ज्या माजिस्ट्रेटास समरीचे अधिकार नव्हते अशांकडे पाठविण्यांत आले. या व्यवस्थेनें काम लांबतें आणि समरी अधिकाराचा बराचसा उपयोग होत नाहीं.

सिव्हिल व सेशन जज्ज यांच्याकडे खुनाचे व डाक्याचे खटले पुष्कळ वाढले होते पण त्यापैकीं बऱ्याच प्रकरणांत आरोपी न सुटण्या सारखे सुटले असा आक्षेप वरिष्ठाकडून काढण्यांत आला आहे.

## The Berar Samachar

**MONDAY SEPTEMBER 2 1901**

The Bombay Government have amended the Land Revenue Code in some important respects. The new law is enacted after great and prolonged deliberations in the legislative Council held at Poona. The amendments were meant to interpret the law in a manner to remove some old ambiguities contained therein. To our plain mind there was in fact no ambiguity or no obscure point in the old law. The changes are made to fascilitate certain deep-laid objects of the Government. Those objects are in connection with the agrarian problem of the day. There is a change in the policy of the Government. They view with a great apprehension the downfall of the agricultural population of India. Indebtedness is the canker of the peasantry. It has checked its proper growth and prosperity. There is no staying power left in the masses and the recent famines have brought them to the verge of starvation. The agriculturists cannot hold their ground in the face of their money—lending Shylocks. In the present competition between the money-lenders and their debtors the latter have lost all stakes. They are no longer owners of land and are reduced to the serfdom of day labourers. This phenomenal ruin of the agricultural classes is a great political danger. The Government are awakened to these new exigencies and hope to discharge their responsibility by experimenting in new legislative measures. The first outcome was the Punjab Land alienation act. The second step is not imperial but restricted to the Bombay Presidency alone. Both are experimental measures and upon their success or otherwise depends the future policy of the Government. The sole question turns upon the way of absolving the Ryots from their indebtedness.

We donot doubt the best intentions of the Government. There are no two opinions about their good intentions. But the difference arises when we approach the question with some probable solution. There is no respect shown for the views of learned and influential leaders of the society. The opinion of the Government is diametrically opposite to that of the public. But the Government have at their back a strong workable majority of their own and can easily give full significance to their proposals. In this connection of the Bombay Land Revenue Code amendments are hurled at the people in a very hot haste and in a most disasteful manner. The Government translate their proposals into legal enactments and there will soon be decisive steps to enforce the legal rules into positive action.

The history of the Bombay Legislative proceedings are not without a great moral. Public opinion carries little weight when it runs counter to the views of the Government. The best men of the nation like the Hon'ble Mr. Pherojshah Mehtha fail to move the Government to wait some time longer till opinions are collected from various important quarters. Delay of a six months' postponement was too much in the eyes of the official members of the Council who could wait no more. The non—official members thought it inpracticable to further continue in the Council after their prayer for a postponement was lost by a majority. They had to retire with the permission of the President. This they did and this conduct on their part justified by for the manner in which public opinion is set at naught in a most systematic procedure.

We hope that such a strong opposition will induce the Viceroy to veto the new law. But this hope belies the possibility of events. The eloquent discussion will leave some salutary lesson to the Government as well. They will do their best to make their new law successful. They will forestall all difficulties and walk with caution to amend the lot of the agriculturists. Let success attend the Government to the great chagrin of the public opinion. We aim at one point and if we achieve it in a wrong process we shall have no reason to be very sorry.

But the Bombay law does more than propose remedies against the indebtedness of the people. The new law declares that the State is the highest land—lord. The nationalization of land is the final effect of such a policy. The state land—lordism is new to India. The Rajbhag is a share in the crops of the land or its value. The Government have no other right to the ownership over the land. This is the old and time immemorial principle. It is the fundamental basis of the Government. There is no wonder if people rise to object to the Government when this essential principle is shaken to its foundation by a stroke of legislation. The present law is however limited to waste land and to forfeited surveyed land. But the principle at stake is just the same. For default in payment of the land revenue, land will be forfeited to the Government and it will afterwards rest with the Government to let it for any period and with the restrictions of prohibiting alienation. The Government will not also allow any heritable rights over such forfeited lands. The prohibition against alienation and the usurpation of the heritable rights over land is the central feature of the future policy of the Government. We do not see how this step will wipe off the existing debts. The Government are not disposed to listen to the proposals of the National Congress. Mere legislation will not remedy the grievance. It must be coupled with the positive acts of the state—help.

## वऱ्हाड

हवामान–पावसानें अगदीं तारंबळ उडवून दिली. नद्या, ओढे, नाले इत्यादिकांस पूर येऊन पाण्याची मोठी शोभा दिसते. तसेंच सृष्टीचें रमणीय व हिरवेगार नैसर्गिक रूप मनाला आल्हादकारक वाटतें. रोगराई कोणतीच ह्मणण्यासारखी नाहीं, ईश्वरकृपेनें उंदीर, कृमी व पांखरें यांचीही पीडा टळून धनधान्याची समृद्धी होईल अशी हृदयंगम आशा वाटते ती सफळ होवो.

रा० रा० रामराव बापूजी पतकी तहशिलदार मूर्तिजापूर यांस एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या दर्जाची बढती देऊन उमरावतीस नेमण्यांत आलें. तसेंच रा. रा. धोंडो हरी लर्ळीगकर, क्लार्क आफ कोर्ट, निसबत कमिशनर यांस पहिले वर्गाचे तहशिलदारी देऊन मूर्तिजापुरास नेमण्यांत आलें.

आणि रा. रा. मारुती हरी क्लार्क आफ कोर्ट निसबत जुडिशिअल कमिशनर यांस कमिशनर साहेबांच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं नेमण्यांत आलें.

राजा इंद्रकरण बहादूर आनररी अव्वाची हे गेल्या शनिवार पासून एक आठवड्याच्या रजेवर हैदराबादेस गेले आहेत. ते परत येऊन आपल्या कामाचा चार्ज देऊन लवकरच हैदराबादच्या दरबारीं परत जातील.

मोर्शीचे तहाशिलदार रा. रा. लक्ष्मणराव गोखले यांनीं आपली रजा वाढविल्यामुळें त्यांच्या जागीं मि. मीर अलम क्लार्क आफ कोर्ट बुलढाणा यांस नेमल्या विषयीं कळतें.

पुसदचे नायब तहाशिलदार रा० रा० बळवंत त्रिंबक यानीं तीन महिन्यांची रजा घेतल्यावरून त्यांच्या रजेंत रा० रा० गणेश बळवंत मोने यांस नायब तहाशिलदार नेमिलें.

मि० हैदर अल्ली एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, वाशिम यांनीं दोन महिन्यांची रजा वाढविल्यामुळें त्या मुदतींत रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे यांस एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरीवरच वाशिमास ठेवण्यांत आलें आहे.

तहशिलदारीच्या खालील नेमणुका कायमच्या झाल्या आहेत:–

| रा० रा० | पगार रुपये |
|---|---|
| रामराव बापूजी पतकी | २५० |
| अजिमुद्दीन | २०० |
| कृष्णराव पुरुषोत्तम भट | १७५ |
| रघुवीरसिंह दुनियासिंह | १५० |

रा० रा० शिवराम हरी गोखले एम. ए. यांनीं काल सायंकाळीं ताऱ्यांच्या चमत्कारा विषयीं सुरस व्याख्यान दिलें.

आज पासून उमरावतीस वकिलीच्या परीक्षेला प्रारंभ होणार आहे.

## वेद पाठशाळा.

( सर्वत्रांस विज्ञप्ति. )

आह्मी आकोल्यास आमचे गृहीं एक वेद पाठशाळा सुरूं करून वेदमंत्रादि नित्य नैमित्तिक ब्रह्म कर्माचीं चार अक्षरें ब्राह्मज्ञातींतील गरजू व जिज्ञासू लोकांच्या मुलांस शिकविण्याची योजना केली आहे. अध्यापक वे. शा. सं. रा. रा. वामनभट्ट बिन गणेशभट्ट घैसास श्रीक्षेत्र त्रिंबककर हे आहेत. शिक्षण सर्वांस सारखें दिलें जाईल. द्रव्य प्राप्तीची इच्छा धरून हें कार्य आरंभिलें नाहीं. सर्वांस कळावें. तारीख २९।८।०१ इसवी.

सही

बळवंत गणेश सोमण कसरती

मास्तर आकोला.

## वर्तमानसार

लढाईची खबर—लढाईचीं सूत्रें दिवसानुदिवस ढिलावत चाललीं आहेत. बोअर लोकांचा दम मृतप्राय दिसत आहे. त्यांस जयाची आशा उरलेली दिसत नाहीं. तरी पण त्यांचा हिय्या जशाचा तसाच आहे. दातीं तृण धरून शत्रू पुढें लोटांगण घालून व आपले जीव त्यांच्या हातांत देऊन आपण ते घालतील त्या बंदिवासांत व गुलामगिरींत, लाजलज्जा व अभिमान हीं सर्व सांडून आनंदानें आजन्म दिवस कंठावे या गोष्टीची त्यांस फारच चीड आहे. व ते जीव गेला तरी ही गोष्ट करणार नाहींत. लार्ड किचनेर यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, बोअर लोक शरण न येतील तर आह्मी त्यास हद्दपार करूं. पण या असल्या धमक्यास ते किती जुमानत असतील कोण जाणे शिवाय ते शरण येत तर नाहींतच व हद्दपार जाण्याची त्यांस दरकार नाहीं कारण ते या जगाच्याही पार जाण्यास तयार आहेत. असो. इंग्रज बहाद्दुरांनीं धर्म युद्ध सोडून आपल्या सदोल्या जोरावर एका कोना कोपऱ्यांतील पण शूर अशा नरवीरांचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्यांस अनाथ व दीन केले व इंग्रज लोक हे स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते ही जी उज्वल कीर्ति त्यास काळोखी दिली यांत त्यांनीं काय कमावले बरें? असो. इंग्रजांच्या सुसंगतीनें बोअर लोकांचा प्रतापसूर्य यावच्चंद्र दिवाकरौ तळपत राहील व ह्या सूर्य प्रकाशांत हजारों अंध राष्ट्रें आपलें दास्यत्व नाहींसें करण्याच्या उद्योगास लागतील.

नवीन करमणूक— स्वराज्य बुडाल्या पासून व दारिद्र्यानें घेरल्या पासून हत्ती सारखीं राजविलासी जनावरें दृष्टीसही पडत नाहींत मग त्यावर बसण्या इतकी ऐपत कोठून येणार! ह्मणूनच कीं काय, मुंबईस राणीच्या बागेंत एक दोन आण्याच्या पैशावर गजारोहणाच्या सौख्यानंदाचा लाभ सर्वांस मिळावा अशी योजना केली आहे ह्मणतात.

जबर पोहणारी स्त्री—आस्ट्रियांतील एक स्त्री फ्रान्सांत आली आहे. तिनें गेल्या वर्षी डोव्हरची सामुद्रधुनी पोहून जाण्याचा यत्न केला होता पण तो फसला. ह्मणून पुनः ह्या वर्षी ती खात्रीनें जाणार आहे. आमच्याकडे स्त्रियांनाच काय पण पुष्कळ पुरुषांनाहि पोहतां येत नाहीं याची लाज वाटली पाहिजे.

सुधारणा व गरिबांचा काळ—बर्नलेच्या एका कोष्ट्यानें आंटोमाटिक माग शोधून काढला आहे. त्यामुळें एकटा मनुष्य दुप्पट माग चालवून १२।१३ पट कापड जास्त काढूं शकतो. ह्या युक्तीनें शेंकडा ६० मजूर लोकांस फांटा मिळेल. मग त्यानीं काय रहावें?

सोन्याची खाण—मांचुरियामध्यें सोन्याची खाण सांपडली आहे व ह्मणूनच रशियास मांचुरिआ पाहिजे आहे. पैसा कोणास नको आहे?

अती ठेंगू स्त्री-- पंढरपूर क्षेत्रीं एक २९।३० वर्षाच्या उमरीची स्त्री आली आहे. ती इतकी लहान गुट्टू आहे कीं, तिची उंची सारी २९।३० इंच आहे. अलीकडे खुजट व खुरटीं माणसेंच फार उत्पन्न होऊं लागलीं आहेत. धीट व धिप्पाड माणसें आतां क्वचितच दृष्टीस पडतात. हें राष्ट्राच्या अवनतीचें द्योतक होय.

अद्भुत विहिर- लखनौ कडील अमीपगंड येथें एक विहीर सांपडली आहे. तिच्या पाण्यांत विलक्षण गुण आहे ह्मणतात. त्या पाण्याच्यामुळें रक्तपिती सारखा महारोग दूर होतो. ही गोष्ट खरी असल्यास एक अमूल्य अमृत रसाचा झराच सांपडला ह्मणावयाचा ह्या पाण्याचें शास्त्रोय रीत्या संशोधन होईलच.

भविष्य— येत्या महिन्यांत गुजराथेत अती वृष्टी होणार असें भविष्य वेध घेणारांनीं वर्तविल्यामुळें तेथील नदी कांठच्या लोकांनीं फार जपून असण्याबद्दल हुकूम सुटले आहेत. पहावें किती सत्यतेस उतरतें तें!

वादळ— रंगूनकडे भयंकर वादळ होऊन घरावरील लोखंडी पत्रे उडून पुष्कळ माणसें जाया झाली. पंचमहाभूतांनीं मनावर घेतल्यावर प्रलयकाळ लांब नाहीं!

बिहार कडील दोन गोऱ्यांनीं मुसलमानीं धर्म अंगिकारिला. असें का? हिंदी धर्म वाईट होता काय? धर्मांतरांत कांहीं अर्थ नाहीं. मुख्य मनांतील सर्व घाण काढून तें स्वच्छ केलें पाहिजे.

रा. म्हात्रे शिल्पकार यांस युरोपांत शिकण्यासाठीं पाठविण्या करितां पैसा जमा करण्याचें काम सुरूं आहे. मोठमोठ्या राजे रजवाड्यांनीं असलीं अमोल माणसें आपल्याच पदरीं ठेवण्यास पाहिजे होतीं.

हु कून दिलें:— डी वारनर साहेबांचें सिटिझन आफ इंडिया नांवाचें पुस्तक मध्य प्रांतांतील अधिकाऱ्यास नापसंत वाटल्यावरून तें बंद करण्यांत आलें.

रशियानें आशियांतील लोकांशीं विशेष व्यापारी दळण वळण पडावें ह्मणून नवीन एक मंडळी स्थापिली आहे.

कोण अरिष्ट हें-- पंजाबकडे एका नवरे मुलानें क्षणभर लग्न सोहाळ्या निमित्त तरवार हातीं घेतली ह्मणून पोलिसानें त्यास कैद केलें. पण मानिस्ट्रेटांनीं धर्म संबंधी चाली करितां शस्त्र हातीं घेतल्यास कायद्यानें अपराध होत नाहीं असें स्पष्ट ठरविलें व नवरदेवास मोकळें केलें. लग्नांत हें दुश्चिन्ह! व त्यामुळें तो बिचारा खरोखरीच चतुर्भुज होत होता.

नवीन टूम— बडोदे रेलवे स्टेशनावर तसेंच आमदाबाद, आनंद वगैरे स्टेशनावर विलायतेंतील कुशल कारागिरीनें हलतीं चित्रें तयार करून त्यांच्या पेट्या प्रत्येक स्टेशनावर ठेवल्या असून गम्मत ही आहे कीं ढबू टाकल्या शिवाय आंत दिवा न पेटतां पैसे फुकट जातात. ढबू टाकल्या बरोबर दिवा पेटून चित्रें नाचतात, पोंहतात, चालतात व अनेक प्रकारच्या गमती १० मिनिटें पहावयास मिळतात. नौकरांची व रक्षकांचा गरज पडत नाहीं. आठवड्यात एकदां एजट येऊन पैसे काढून घेऊन जातो. कमाल आहे अक्कलेची! व पैसा काढण्याची!

अंतस्थ कारवाई असावी-फ्रेंच प्रेसिडेंट यांनीं रशियाचे झारांना सैन्याची पहाणी करण्यास बोलावलें व तें त्यांनीं मान्य केलें. ह्या दोन राष्ट्रांच्या मैत्रीमुळें युरोपांत कांहीं लढाईचें आभाळ तर फिरणार नाहीं ना!

स्त्री स्त्रीचा विवाह—न्यूयार्क येथें आज तीस वर्षें पुरुषाचे वेषांत राहिलेली एक स्त्री मरण पावली. तिनें दोन स्त्रियांशीं आपलें लग्न केलें होतें. सर्वांची जीवनयात्रा कशी काय पार पडली कोण जाणे?

अनावर क्रोध व साहस— नागपुरास एका मुलीचें आईशीं भांडण झाल्यावरून तिनें आपल्या लुगड्यावर राकेल ओतून पेटवतें. व दृढनिश्चयानें न डगमतां अग्निनारायणास आपल्या देहाची आहुती दिली.

अपमृत्यु—बीडकडे एक साळी आपल्या १० वर्षाच्या मुलीला घेऊन पाण्यांतून येत होता. मध्येंच पाण्याच्या जोरानें मुलगी हातांतून सुटली व वाहून जाऊन मरण पावली पाण्यांतून जाणें धोक्याचें आहे. मोठी सावधगिरी पाहिजे.

पाऊसपाणी—ईशकृपेनें सर्वत्र आबादानी आहे. जनावरांना चारा मुबलक आहे. सर्वत्र पाऊस चांगला झाला. व पुष्कळ ठिकाणीं पाऊस अती होऊन नास होण्याचाहि संभव आहे. ईश्वराधीन सर्व गोष्टी आहेत, तरी पण सध्यां ठीक दिसतें.

मासलेवाईक ध्यानांत धरण्याजोगी गोष्ट—सुमारें शंभर वर्षांपूर्वी पंजाबकडे एक श्रीमान् गृहस्थ रहात होता. त्यानें स्वतां साठीं एक हवेली बांधली तेव्हां, त्यानें पुढें मागें एखादे कठिण प्रसंगीं आपल्या मुलाबाळांच्या उपयोगीं पडावें ह्मणून त्या घराच्या पायाखालीं बरेंच धन पुरून ठेविलें होतें. ह्या घरांत द्रव्य पुरलेलें आहे हें कोणासहि माहित नव्हतें. व कधीं काळीं माहित होण्याचा संभवहि नव्हता. पण कर्मधर्मसंयोगानें त्या घराची एक बाजू पडली व दुरुस्तीसाठीं पाया खणवा लागला. ह्मणून ती पूर्व संचित संपत्ति अचानक त्या नातेवाईकांच्या हातीं पडली. पण चमत्कार पहा कीं, ह्या पैशामुळें त्या घरांतील मनुष्यांचें सुख व आनंद हीं न वाढतां उलट तंटेबखेडे व वितुष्टास कारण मात्र झालें. त्या द्रव्याच्यापायीं तंटे, फिर्यादीआर्यादी व अपिलावर अपिलेंहि झालीं. हा खटला ६ वर्षे चालला व एकंदर १६ कोर्टाची मदत मागितली गेली. व ह्या कोर्टादि खर्चाच्या पायीं सर्व धनाचें वाटोळें होऊन असंतोष व सर्वांची फाटाफूट हीं मात्र लाभलीं. आणि अद्याप निकाल व अपिलें व्हावयाचीं राहिलींच आहेत. फारच बोधपर गोष्ट होय.

अगाऊ तरतूद— पुण्यास गोख्यानी साहेबानीं असें जाहीर केलें आहे कीं, जो मनुष्य उंदीर धरून आणील त्यास दर उंदरामागें एक एक शिवराई देण्यात येईल. प्लेग साठीं हा बंदोबस्त ठीकच आहे. पण उंदरावर प्लेगचें कांहीं बस्तान आहे अशा बद्दल मोठमोठ्या डाक्टरांचा फार मतभेद आहे. कांहीं असो. गरीब लोकांना एक पोटाचा धंदा मिळाला हें खरें. उंदीर जातीनें सावध रहावें कारण त्यांस जीवें मारण्या बद्दल हुकूम सुटले आहेत.

चवदा कणसांचें मक्याचें झाड—सातार कडील मंदळहवेली गावीं एक चौदा कणसांनीं भरलेलें एक मक्याचें झाड सांपडलें. व लागलींच, अशा चमत्कारिक वस्तूंचें जें माहेरघर विलायत, तिकडे त्यास पाठविण्यांत आलें. उत्तमोत्तम गुणवान् गोष्टींनीं विलायतेचा मार्ग धरला आहे ही गोष्ट कांहीं वावगी नाहीं.

खरें कीं खोटें— इंग्लंडाधिपती ह्यांना पुढील वर्षी राज्याभिषेक होऊन ते सिंव्हासनारूढ होणार आहेत. त्या नंतर 'हिंदुस्थानचे बादशहा' हा किताब धारण करण्यासाठीं यांनीं, इतिहास प्रसिद्ध जी पूर्व काळची हिंदुस्थानची राजधानी दिल्ली शहर, येथें येऊन मोठा दरबार भरवून समारंभ करवावा अशा बद्दल इकडील राजे रजवाड्यांनीं विनंती केली आहे ह्मणतात. कै० महाराणी साहेबांचे पुण्य पवित्र पाय ह्या देशास लागण्याचा सुयोग ह्या देशाच्या नशिबीं नव्हता. पण कदाचित तो योग आतां येणार आहे. ह्मणून सर्वांस फारफार आनंद होईल. पण यांचा पाहुणचार आज्ञाहीन व दीन झालेल्या प्रजे कडून कसा व्हावा हा मोठा प्रश्न आहे.

चोराची युक्ति फसली— चितगांगहून रंगूनास एक प्रवासी बोटींत बसून आला पण त्याजजवळ टिकिट नव्हतें व पैसेहि नव्हते सबब त्यास तेथेंच अटकेंत ठेविलें. बाकीचे सर्व उतारू निघून जाई पर्यंत ह्या मनुष्यानें लून जाण्याचा उद्योग आरंभला. बोटीच्या एका फाटकांत त्यानें आपली मुंडी खुपसली व त्यांतून पार जाण्याचा प्रयत्न केला पण असें झालें कीं, तो त्या फाटकाच्या गजांत अर्धा आंत व अर्धा बाहेर असा अडकून राहिला. व त्यास ह्या आपत्तींतून सोडविण्यासाठीं लोखंडी गज व लाकूड कापून काढावें लागलें. तरी सुद्धां तो मोकळा होईना ह्मणून त्या मनुष्याच्या अंगाला तेल चोपडून तो मऊ झाल्यावर त्याची सुटी झाली. येणें प्रमाणें युक्ति फसली व फजिती झाली.

REGISTERED N. No. 4

वर्षाचा आगाऊ ५ ... ६४१२
सहामाही „ ३ „ ६८
साल अखेर „ ७ „ १ ६८
किरकोळ अंकास ....................... ६४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ५० १
दर ओळीस ....... ६१ ०६
दुसरे खेपेस ....... ६१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly ......... 3 ............... 8 as
Single copy ............................. 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line ... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 9 SEPTEMBER 1901 NO 35

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ९ माहे सप्टेंबर सन १९०१ इ० अंक ३५

## मोरोपंत

निवडक वेंचे

( ३४ व्या अंकावरून पुढें. )

आणखीं अभिप्राय.

मोरोपंत भाषांतरकार आहेत या आक्षेपाचें प्रमाणसिद्ध खंडन.

"ही उत्प्रेक्षा आहे. हा उत्तराच्या पलायनाचा प्रसंग पंतांनीं कसा वर्णिला आहे पहा. हें सुरेख आणि हृदयंगम वर्णन करणारा कवि भाषांतरकार ठरेल काय? या पद्यांतील गोडी चाखण्यास अंगीं बरेंच सहृदयत्व पाहिजे इतकें खरें"

का. सं. वि. प. अ. २
अंक ३९ पृ ७१

"हें उत्तराच्या भीरुत्वाचें पंतांनीं केलेलें सुरेख वर्णन मूळ ग्रंथांतील कोणत्या श्लोकाचें भाषांतर आहे हें कोणी दाखवील काय?

का. सं. वि. प.
अंक ३९ पृ. ७४

"हें गीतार्ध मुळांतील कोणत्या श्लोकाचें भाषांतर" असा प्रश्न पंतांना भाषांतरकार ह्मणणारांस अवश्य केला पाहिजे"

का. सं. वि. प.
अंक ४० पृ. ९२

"या श्लोकांतील वर्णन पंतांच्या पदरचें आहे. तेव्हां हें मुळांतील कोणत्या श्लोकाचें भाषांतर आहे असा प्रश्न पंतांच्या निंदकांस केला तर त्यांस मौनच धरावें लागेल"

का. सं. कृष्णविजय
अंक ४० १३७ अ. ६८

"या श्लोकांस मुळांत कांहींएक आधार नाहीं. पंतांची प्रतिमा जेव्हां भरांत असते, तेव्हां ती अशाच समयोचित, अलंकारमय आणि हृदयंगम कल्पनांनीं भरलेल्या श्लोकांस प्रसवते. पंतांस भाषांतरकार ह्मणून नादान ठरविण्याची खटपट करणारे पंडितमन्य आक्षेपक हा श्लोक श्रीमद्भागवतांतील कोणत्या श्लोकाचें भाषांतर आहे हें दाखविण्याची कृपा करितील तर किती चांगलें होणार आहे? पंतांच्या सरस्वतीचा हा प्रवाह सुरस आणि प्रसन्न नाहीं असें कोण ह्मणेल? कालिंदी बलरामास शरण आली, एवढ्याच गोष्टीला अनुलक्षून या श्लोकांत, किंवा, कीं, अथवा, किंबहुना, या शब्दांनीं सुचविलेले जे कल्पनातरंग, पंतांच्या सरस्वति प्रवाहांत उठले आहेत, ते चित्ताकर्षक नाहींत असें कोण रसिक ह्मणेल?"

का. सं. कृ. वि.
अंक. ३७ ११६ अ. ६६

"मोरोपंत हा भाषांतरकार होय असें या कवितेवरून ठरेल काय? या सुरस पद्यांवरूनहीजर पंत भाषांतरकार ठरतील, तर सर्व सुप्रसिद्ध कविजनांसही याच माळेंत ओंवण्याची पाळी येणार आहे"

का. सं. वि. प.
अंक ३९ पृ. ७७

हे अभिप्राय येथें पूर्ण झाले. आतां विराट पर्वांतील कांहीं सुंदर पद्यें देण्यापूर्वीं इतर प्रकर्णांतील तशींच सुंदर पद्यें दृष्टीस पडलीं ह्मणून तींच अगोदर देतों— हीं पद्यें मनाचें उत्तम प्रकारें रंजन करून अमृतासारखा बोध करित आहेत व नीतीचा सरळ मार्ग दाखवीत आहेत.

आर्या. (गुरुशिष्य प्रश्नोत्तरमाला)*

श्री शंकर भगवत्पद--
रचित प्रश्नोत्तराख्य ही माला ॥
प्राकृत-शद्ब गुणीं मी,
रचितों बुध हो! परंतु प्रतिपाला ॥ १
कंठींच असों द्या हो!
हे मणिमाला अलभ्य परि साची ॥
प्रेमें सुलभचि रसिकां,
कीर्ति इणें जिंकिलीच, परिसाची ॥ २
प्रश्नोत्तर मणिमाला,
हे केवळ होय हो! सुधा[2]धारा ॥
खल राहु[3]लाचि न जिरे
त्यासि जिरे भजति जे बुधा[4]धारा ॥ ३

× × + ×

"स्वामी! काय ग्राह्य,
स्वमुखें सांगा करा दया पूर्ण ॥
शिष्या! स्वीकारावें,
गुरुवचन प्रणतिपूर्व अति तूर्ण ॥ ७
काय त्यागावें? तें,
स्वामी! सांगा अजाणत्यास मज ॥
शिष्या! अका[5]र्य सारें,
टाकावें हें मनीं बरें समज ॥ ८
स्वामी! कोण गुरू हें,
सांगा होईन संशयोन्मुक्त ॥
शिष्या! जो तत्वज्ञ,
प्राणिहिता कारणें सदे[6]द्युक्त ॥ ९
पंडित कोण? स्वामी!
छात्रजनार्थ[6]या अनंत सुखें हेतो!॥
शिष्या! सद्बुद्धि सुधा—कलशा
जेथें विवेक राहे तो ॥ १४
स्वामी! वैरी कोण?
छात्रा! तो शत्रु जो अनुद्योग ॥
ज्या उद्योगाभावें,
पावति विद्यासि सर्व सुखभोग ॥ २०
स्वामी! कोण पासुनि,
भय लोकीं फार पावति प्राणी ॥
शिष्या! मरणा पासुनि,
भय पावति सर्व ही खरी वाणी ॥ २१
स्वामी! शूर ह्मणावें,
कोणाला? हें मला तुह्मी बोधा ॥
शिष्या! स्त्रीनेत्रशरें,
पावेना जो व्यथेसि तो योधा ॥ २३
देवा! हेंही सांगा,
त्रैलोक्यामाजि काय हो! गहन ॥
शिष्या! चरित स्त्रीचें,
नेणति विधि, शक्र, गुरु, शशी, दहन॥ २६
दारिद्र्य कोण सांगा?
बटु पुसतों कीं तुह्मा नसे रोष ॥
शिष्या! बरवें पुशिलें,
दरिद्रपण तेंचि जो असंतोष ॥ २८
स्वामी! कोण सुदुःसह,
सर्वां नरकां परीसही नरक? ॥
परवशताचि निरय, हें,
जाणुनि तूं ईश सोडुनी नरक ॥ २९
स्वामी! जे जे प्राणी,
त्यांचें प्रिय वस्तु मुख्य तें काय? ॥
शिष्या! पंचप्राणचि,
लोकांचा प्रियपदार्थसमुदाय ३९
मित्र कवण? हें सांगा,
संशय न तुह्माविना दुजा छेदी ॥
तो मित्र होय बापा!
पापाचारांत जो बुडों नेदी ४१
गुरुजी! मरण कवण हें,
सांगुनि मजला निवृ[1]ती द्या विपुला ॥
बाळा! मूर्खत्वचि रे!
निधन महा तें नसो नसो रिपुला ४९
गुरु राया! वश होतो,
कवणाला प्राणिगण जसा दास ॥
शिष्या! सत्य प्रिय जो,
नित्य वदे त्याचि बहु विनीतांस ६३
नित्य रहावें कोठें?
सांगाजी! शिष्य मानसा धाया ॥
न्याय पथीं वस वत्सा!
दृष्टादृष्टा[3]र्थ लाभ साधाया ६४
स्वामी! काय असे हो!
चपलेच्या विलासितोंपरी चपळ ॥
खलसंगति युवति जनाहि,
चपळ, तयांला विलोकितांच पळ!! ६९

"सन्मनोरथराजि" या काव्यांतून

कर्ण युगांत भरावें,
जें हरि. हरिजनयश प्रचुर ग्या तें ॥
जैसा दोंदा कोंदी,
गुर्जर देशस्थ विप्र चुरम्यांत १
हा हो सुतृप्त राघव—
नामें, सारेंचि जेंवि तेलिंगा ॥
शीला जपो बहु नृपति,
जैसे अग्न्याख्य साधु ते लिंगा ४
मतिची पडो हरि गुणीं,
पतिकंठीं मिठि जसी सुदारांची ॥
नुच्चारू परमर्मा,
जीभ नकारा जशी उदारांची ६
खोत जसें न त्यजवे,
केलें उच्छिष्ट मांजरें दुधतें ॥
सज्जन दूषिलें जरि,
दुष्टें; मद्बुद्धि न त्यजू शुभ तें ॥ ८
कांपावें मन कुजनीं,
वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें ॥
सत्संगींच शिरावें,
बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें १३
प्रेमें नवीं नवीं तीं,
माझ्या रसनेसि सुकविकुल—गीतें ॥
गीतें यावीं, येतीं,
माहिरा जावि बहुत मुलगीतें २२
हरि कीर्तनीं शिरावें,
धनिक गृहीं जेवि जपुनि चोरानें ॥
न उठावें बहु कार्यें,
बहुमारें जेंवि कुत्तर ढोरानें ३५
संसार दुःख विसरवू,
सत्पद्धति, मतिस; जेंवि काय घं[8]डी ॥
वर मायेसि विवाहीं,
बिसरावि; चवरी, गुलाल पायघडी ॥ ३६
ज्यां कीर्तना टपावें,
मार्जारें सर्वदा जसें दुग्धा ॥
सन्मति विनयादि गुणां,
वाहो; प्रेमें नंगां जसी मुग्धा ॥ ३८

वि०

---

* मूळ श्रीमत्शंकराचार्य विरचित. १ शद्बरूपी दोऱ्यांत. २ अमृतधारा. ३ राहु दैत्यास अमृत धारा जिरली नाहीं हें प्रसिद्धच आहे. ४ ज्ञान्यांचा आश्रय. ५ सकल शास्त्र तात्पर्यज्ञ. ६ हे गुरूचें विशेषण. ७ हें शिष्याचें विशेषण.

१ सुख. २ विनय संपन्नास. ३ ऐहिक व परलौकिक. ४ विजेच्या. ५ लवणें, चमकणें. ६ पुष्कळ.

१ कवि मोरोपंत. २ उत्तम कवींच्या समुदायानें गाइलेलीं. ३ एक घटका, घटकाभर. ४ अलंकार,

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ११ शके १८२३

## ज्याचें त्यास.

लोकांत एक विलक्षण प्रकारचा अविचारीपणा चालतो. कोणताही अविचार झटला

ह्मणजे वाईटच; परंतु ज्या अविचाराच्या संबंधानें आह्मी दोन शब्द लिहिण्यास इच्छितों तो अविचारीपणा विलक्षण प्रकारचा आहे. पुष्कळ लोक त्यांत विशेषें करून तरुण या अविचारीपणास पात्र होतात. तो अविचारीपणा "दुसरा अमुक करितो ह्मणून आपण तसें करावें" अशी जी कित्येकांच्या मनाची प्रवृत्ति ती होय. सरकारी नोकरींतील कित्येक लोक पैसे खातात, असें कर्णोपकर्णी ऐकून, सरकारी नोकरींत नुकतेच शिरलेले कित्येक तरुण पैसे खाण्याची इच्छा करितात. कित्येक लुच्चे लफंग लोक परस्त्रीचें प्रेम संपादन करितात, असें कर्णोपकर्णी ऐकून कित्येक तरुण जन आपणही तशा प्रकारचें प्रेम संपादन करावें अशी इच्छा करितात. कित्येक सरकारी अंमलदार रयतेशीं दांडगाईनें वागतात, तीस मारठोक करितात आणि त्याबद्दल त्यांचें कांहीं पारिपत्य होत नाहीं, असें बहुतांशीं ऐकून व थोड्या अंशीं पाहून, सरकारी नोकरींत शिरलेले कित्येक नूतन तरुण गृहस्थ आपण ही तसें करण्याची इच्छा करितात. या प्रमाणेंच दुसऱ्या अनेक गोष्टी तरुणांना दुसऱ्याचें पाहून तसें करण्याची इच्छा होते, याचें कारण असें कीं, अमुक अमुक व्यक्ति अशा अशा वागतात याबद्दल चारचौघांत जेव्हां त्यांची चर्चा होते, तेव्हां त्यांच्या धाडसाबद्दल व बहादरीबद्दल त्यांची तारीफ होते. वस्तुतः लोक त्यांच्या दुर्गुणाबद्दल त्यांची निंदाच करित असतात; तरी पण तशा गोष्टि करण्यास त्या त्या व्यक्ति अति नर्वीन, या करितां त्यांच्या कुकिंमते ची व साहसाची एक प्रकारें वाहवाहि होत असते. तरुणांच्या कानीं ती तारीफ पडली ह्मणजे त्यांना असें वाटतें 'आह्मीं कमी आहों काय? यांत काय आहे? आपण ही अशा गोष्टी करूं शकूं.' असें मनांत आणून आवश्यक संधी किंवा अधिकार प्राप्त झाला ह्मणजे, अशीं बहादरीचीं कृत्यें करून दाखविण्याचें ते मनांत आणतात, व कित्येक करूंही लागतात. आतां, असे तरुण लोक सर्व अज्ञान असतात असें ह्मणावें तर तसेंही नसतें. कारण ज्यांनीं बरीच विद्या संपादन केली आहे, किंबहुना ज्यांचें अध्ययन बी. ए. च्या परीक्षे पर्यंत झालेलें आहे असेही पुष्कळ तरुण या अनुकरण करणाऱ्या जनांच्या वर्गांत असतात या बिचाऱ्या अनुभवहीन तरुणांना दुधाची चर्वी दिसते, पण तिच्या मागें असणारा बडगा दिसत नाहीं. यांत मोठी दुःखाची गोष्ट ही कीं इतरांचें अनुकरण करण्यासाठीं जीं कृत्यें करण्याचें हे मनांत योजितात तीं कृत्यें त्यांना गुप्त ठेवावीं लागतात. कारण तीं कृत्यें लबाडीचीं असल्यामुळें तीं दुसऱ्याला सांगण्याची सोयच नसते. त्यांची इच्छा अशी असते कीं, हीं हीं कृत्यें करणें बहादरीचें आहे तेव्हां हीं आपण केलीं ह्मणजे आपणही बहादर झालों. पण अशीं कृत्यें करण्यास जी बुद्धिमत्ता, जे डावपेंच व एकंदर जी हुषारी, अशीं कृत्यें करून पचविणारांच्या अंगीं असते ती आपल्या अंगीं आहे किंवा नाहीं या गोष्टीचा तिळमात्र विचार या अनुकरण करणारांच्या मनांत येत नाहीं. कारण जगतांत मूर्ख ह्मणून कोणीच नाहीं जो तो आपापल्या ठिकाणीं आपणांस शहाणा समजतो, या दुर्दैवाला काय करावें?

लांच लुचपत खाणें हें कोणत्याही प्रमाणानें चाललेलें असो; या सारखें भयंकर कृत्य कोणतेंही नाहीं. जे लोक लांचलुचपत खात असतील त्यांच्यांत ती खाण्याला खरे योग्य असे शेंकडा पांच मिळणार नाहींत. या संबंधाची खरी योग्यता ह्मणजे अशा लांच खाऊनही ज्यांच्या पोटांत काडीमात्र धास्ती वाटत नसेल, ज्यांस रात्रीं झोंप स्वस्थ येत असेल, आपल्याबद्दल लोकांत चर्चा चालते तिचें ज्यास कांहीं भय वाटत नसेल, वरिष्ठांनीं प्रश्न विचारला असतां ज्यांची मुखचर्या काडीमात्र बदलणार नाहीं किंवा उतरणार नाहीं, ज्यांस सरकारनें सस्पेंड केलें असतां घामाचा एक थेंबहि येणार नाहीं, किंवा छाती धडधडणार नाहीं, ज्यांस कोर्टापुढें उभे केलें असतां ज्यांची जीभ आडखी पडणार नाहीं, किंवा कंप सुटणार नाहीं व जे शाबिती होऊन कैदेंत गेले तरी, तींतून बाहेर येतील तेव्हां पौंड दोन पौंड ज्यास्तच वाढून येतील, पण यत्किंचित् कमी होणार नाहींत, असे जे पुरे पुरे बेरड असतील तेच लांच खाण्यास योग्य व लांच खाण्याचे खरे अधिकारी होत. यांवाचून बाकीचे जे राहिले ते निव्वळ मूर्ख. त्यांचें चाललें आहे तों पर्यंत चाललें आहे, पण प्रसंग आला असतां त्यांची धाग. त्यांच्या दुःखास व विपत्तीस पारावार नाहीं आणि त्यांच्या जिवास शांतिही कधींच माहित नाहीं. त्यांच्या लटपटी आणि घालमेली आणि अनेक तऱ्हेच्या लबाड्या नेहमीं चाललेल्या असावयाच्या. आणि ज्याअर्थीं त्यांस कांहीं वेळा मध्यस्थहि पाहिजे असतात त्या अर्थी त्यांचीं कृत्यें षट्कर्णी झालेलीं असल्याची त्यांची खातरी असतेच. व एरव्ही तरी आपलें कृत्य केवळ चतुष्कर्णी नसेल हें त्यांस कळतेंच. या करितां त्यांना फार जपून वागावें लागतें. व आपापल्या शहाणपणा प्रमाणें ते वागत असतात. पुष्कळ वेळां त्यांचें अखेर पर्यंत बरेंच निभतें. परंतु हे जे तरुण अनुभवशून्य अनुकरणेच्छु त्यांना मागची पुढचीं धोरणें नसल्यामुळें, ते फसतात आणि जन्माचें नुकसान करून घेतात.

लांच लुचपतीच्या संबंधानें जें वर सांगितलें तेंच परस्त्रीचें प्रेम संपादन करण्याच्या संबंधानें लागूं आहे. हा यत्न करणार लोकहि पुरे बेरड असावे लागतात. जे बिचारे साधे तरुण गृहस्थ ही नीचपणाची बहादरी मिळविण्यास इच्छितात ते शेंकडोंच्या शेंकडों फसतात, जनांत आपली छीः थू करून घेतात आणि अनेक रीतींनीं हानि पावतात.

जे सरकारी नोकर आपल्या अधिकाराच्या तोऱ्यांत अविचारानें मनसोक्त वागतात तेही कांहीं अशीं जन्मलेले बेरडच असतात. शिवाय त्यांच्या अंगीं अनेक प्रकारच्या युक्तिप्रयुक्ति असतात त्या अशा. कांहींकांचा वरिष्ठशीं अनेक कारणांनीं जमलेला स्नेहभाव असतो. त्यांना ते पैसे चारतात किंवा अनेक नीचपणाच्या गोष्टी करून त्यांच्या उपयोगीं पडतात. इतर लोकांताहि अनेक कारणांमुळें त्यांचा स्नेहभाव असतो. तेव्हां त्यांनीं एखादी दांडगाईची गोष्ट केली असतां तिजवर झांकण घालणारे अनेक लोक त्यांच्या मदतीस येतात. शिवाय हे गृहस्थ स्वतः अंधारांत पायां पडण्यास किंवा पैसा खर्चण्यास पुरे इतके नीच असतात. अशीं अनेक कारणें आंत होऊन, बाहेर मात्र त्यांची बहादरी इतरांच्या दृष्टीस पडते, किंवा इतरांस ऐकूं येते.

या तिन्ही प्रकारच्या लोकांचें अनुकरण करण्यास इच्छिणारे तरुण गृहस्थ बाहेरच्या गोष्टी मात्र पाहतात किंवा ऐकितात, पण आंतले डावपेंच त्यांना समक्ष कळत नाहींत, व ऐकूंहि येत नाहींत. या मुळें ते बिचारे, लोक अशा अशा गोष्टी करितात ह्मणून आपणहि करूं जातात. गेल्या दुष्काळांत जी अनेक तरुण मंडळी पैशाची अफरातफर केल्या बद्दल किंवा पैसे खाल्या बद्दल कैदेंत गेली, ती अशाच प्रकारची तरुण मंडळी होय. त्याच काळामध्यें आपणांस यत्किंचित असलेला अधिकार फार मोठा समजून गरिबगुरिबांस ज्यांनीं मारहाण केली त्यांस आपल्या कृत्यांचें प्रायश्चित भोगावें लागलें. कित्येक लोक पोलीस खात्यांत नोकर होतात; त्यांना तर फारच दिमाक येतो. अमुक अंमलदार असे वागले, अमुक तसे वागले, असें त्यांनीं ऐकिलें असतें. तेणें करून आपणही तसें वागतात; आणि आपल्या अधिकारा बाहेर वागून अब्रूदार माणसांची अब्रू घेतात. किंवा गरिबगुरिबांचा छळ करितात. पण हीं मार्गे आपणांवर उलटलीं असतां, बचावाचीं साधनें आपणापाशीं काय आहेत, याचा त्यांनीं विचार केलेला नसतो. यामुळें प्रसंग आला असतां त्यांस आमरण दुःखच भोगावें लागतें.

सर्व तरुण गृहस्थांस त्यांच्या त्यांच्या घरचीं माणसें "अरे भिऊन वागत जा बरें; कोणाच्या पैशाला शिवूं नको; कोणाशीं वैर करूं नको; अंगीं गर्व आणूं नको." इत्यादि प्रकारें पुष्कळ उपदेश करित असतात, प्रसंग विशेषीं कोणी वडील, आप्त, इष्ट हेही तसाच उपदेश करितात; पण हीं पोरें "मी शहाणा आहें, मी हुषार आहे, घरच्या मनुष्यांस माझी हुषारी काय कळते" इत्यादि प्रकारें आपल्या ठिकाणीं घमेंड करून अविचारानें वागतात आणि अखेरीस आप्तइष्टांस व आपणा स्वतःस संकटांत घालून घेतात. अशा तरुणां करितां हे वरील विचार सांगितले आहेत. सर्व तरुणांनीं लक्षांत ठेवावें कीं इतरांच्या कशा जरी गोष्टी आपण ऐकिल्या, तरी त्या 'त्यांच्या त्यांनाच.' त्यांचें आह्मी अनुकरण करणें बरोबर नाहीं. आपली शक्ति थोडी, आपली अक्कल थोडी, आपला अनुभव थोडा, असें ह्मणूनच त्यांनीं चालावें. प्रामाणिकपणा, इमानीपणा, मेहनत या गोष्टी मुख्यत्वें करून आपल्या पुढें ठेवून त्यांनीं चालावें, अनुकरण करणें असल्यास दुसऱ्यांच्या सद्गुणांचें अनुकरण करावें. चांगल्या रीतीनें वागूनही मनुष्यांवर कधीं कधीं संकटें येतात, मग वाईट रीतीनें वागून संकटें आल्यास त्यांत नवल तें काय? या ज्या तीन गोष्टी वर सांगितल्या त्या करून पचविणारे लोक एक तर जन्मतः बेरड असले पाहिजेत, किंवा बेरड गुरूंच्या हाताखालीं ते तरबेज झाले असले पाहिजेत. त्यांच्या कृति त्यांस. त्या भलत्यांस काय होत? तरुण, व अननुभवी पोरांनीं तर तिकडे लक्षच देऊं नये.

## भारतधर्म.

धर्माची ग्लानि झाली आहे खरी, पण धर्माचें उज्जीवन व उन्नति हीं पुनः दृश्यमान होतील असें प्रस्तुतच्या काळ चक्रावरून वाटतें. धर्म मलीन झाला, आणि नीतीच्या जीवनकळेशीं धर्माचा संबंध तुटत चालला. कांहीं धर्मलंड व पाखांडी मंडळीचीं श्रीमंती, त्यांचा पंडितपणा व त्यांची सरकारी हुद्देदारी यांमुळें यांनीं कांहीं काळ सामान्य लोकांस भुरळ पाडली होती, धर्मावर हा जो मोठा आघात इंग्रजीच्या पहिल्या पन्नास पाऊणशें वर्षांत पडला त्याच्या मागून वस्तुस्थितीच्या निदर्शनानें प्रत्याघात चालू झाला. हल्लीं त्या श्रीमंतीची व त्या सरकारी कृपेची सावली जसजशी दूर गेली व गरिबीची दशा सैरावैरा फिरूं लागली तसें धर्माच्या द्वारानें ईश्वराकडे डोळे लागूं लागले. व इंग्रजी लकेरी निघून जाऊं लागली. भारत धर्म जगाच्या बरोबरीनें वृद्ध आहे. त्याचें तत्वज्ञान, त्याची सुखाची मीमांसा व त्याची समाधानीची देणगी यांनीं आयुष्याचा काळ संक्रमणाला सुगम केला आहे. आणि निदान इंडियन लोकांस धर्माचाच काय तो मोठा आश्रय राहिला आहे. इंडियाच्या सनातन धर्माविषयीं लोकांची श्रद्धा अनुभवानें दृढतर होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. धर्माविषयीं व्याख्यानें अलिकडे पुष्कळ ऐकूं येतात. इंग्रजी राज्यांत धर्मशिक्षणाच्या सोयी मोठ्या दुष्कर आहेत पण धर्मशिक्षण पाहिजे आणि त्या वाचून नैतिक शिक्षण फोल आहे असा सर्व साधारण ग्रह आहे कालमानानें भारत धर्माला संग्राहक स्वरूप दिले पाहिजे. आणि सर्व धर्माला मागें सारून हाच धर्म जगाचा आदिधर्म होईल अशी याची गुप्त सरणी स्फूट व विख्यात केली पाहिजे. सरकारी शाळांच्या अनुसंधानानें धर्मशिक्षणाच्या शाळा निघाल्या पाहिजेत आणि अशा धर्तीवर नव्या व जुन्या गोष्टींची सांगड घालण्यांत येईल तरच इंडियाचा उर्जित काल होण्याचा संभव आहे. आह्मापाशीं राजकीय सत्ता नाहीं, श्रीमंतीचें पाठबळ नाहीं, आमचीं राजनिष्टा व भावी आशासमूह हींच आमचीं शस्त्रें व आमचा दरूगोळा होय. ही संग्रामाची सिद्धता असतांना जर आह्मी धर्माची कांस धरली, उद्योगधंदे व कलाकौशल्य शिकलों आणि स्वावलंबनाचाच धडा पाठ केला तर सरकार आपले राजकीय हक्क घ्या ह्मणून आमच्या पाठीमागें लागतील, आदरबुद्धीनें आह्मांस सन्मुख ठेवितील आणि आपली चाकरी व हुद्देदारी विद्यमान स्ववृत्तीच्या लोकांच्या गळ्यांत घालणार नाहीं. लक्ष्मी नानाविध रंगानीं दृष्टीस पडते पण तिचा विलक्षण धर्म असा आहे कीं, तिच्या नादीं लागणाऱ्यांस ती फसविते आणि सद्गुणी,

सद्धर्मी, अभिमानी, व संपूज्य लोकांस ती आपली सुमनमाला अर्पिते व त्यांच्या आश्रयानें तिची श्री व दीप्ति हींहि सार्थकता पावतात.

## भावी दुश्चिन्ह

पुष्कळशा बऱ्या वाईट गोष्टी संसर्गानें सत्वर घडून येतात. पंजाबांत जमिनी संबंधानें प्रथम कायदा झाला. मुंबई सरकारानें तो कायदा आपल्या तऱ्हेनें आपलासा केला. मुंबई सरकारची युक्ति मोठ्या कुशलतेची व शहाणपणाची दिसून आली. जो संकल्प ठरला तो पूर्णतेस नेण्याचा मार्ग एकच असला तरी तो मार्ग गजगतीनें आक्रमिला व आपल्या चातुर्याची नौबद गाजविली. लोकमताचा किल्ला मुंबई सरकारानें जमीनदोस्त केला. हा विजय इतर स्थानिक सरकाराला ईर्षा व वीरश्री चढविण्या इतका बलवत्तर होईल यांत तिळमात्र संदेह नाहीं. मुंबईचा जमिनीचा कायदा नवा झाला तेव्हांपासून आमच्या प्रांतांतील लोकांस नवीन क्रांति होण्यासारखा रंग दिसतो. सावकार लोक, सुखवस्तु, जमीनदार लोक व इतर पैसेवाले पांढरपेशे लोक ह्मणतात कीं, हा कायदा वऱ्हाडांत आला तर सर्वच सृष्टी बदलून जाईल. कर्जबाजारी शेतकरी, शेतीवाडी सावकारांच्या घरीं चालती करणारे जमिनीचे मालक व शेतकरी वर्गांत मोडणारा सर्व बाजारबुणगा यांस नवा कायदा संजीवनी अमृतासारखा वाटतो. सरकार आपलीं मायबाप आहेत आणि सरकारच आपणांस या जीवन यात्रेच्या कष्टांतून व कर्जदारीच्या पेचांतून पार पाडणार आहेत असा मोठा विश्वास सरकारच्या ठायीं उत्पन्न झाला आहे.

आमच्या स्थानिक सरकारची चौकशी बारकाईनें चालू आहे आणि शेतकरी वर्गास सुखी करण्याचे उपाय सरकार शोधीत आहे अशा वेळीं मुंबई सरकारचा अनुभव व नवा कायदा मोठाच आधार होणार आहे. मुंबईचा नवा कायदा चमत्कारिक आहे. सरकार ह्मणते कीं, ज्या जमिनीचा सारा थकेल ती जमीन आह्मी आपल्या हातीं घेऊं. ती परत वाहण्याला देऊं तर आह्मी आपल्या अटीवर देऊं. नेमक्या वर्षीं करितां व ठराविक रकमेला लावून काढूं. आणि ती जमीन विकण्याचा, किंवा गहाण वगैरे ठेवण्याचा किंवा दुसऱ्याला देण्याचा अधिकार वहितदाराला आह्मी देणार नाहीं. हें तत्व दिसण्याला क्षुल्लक दिसतें पण त्याचा अर्थ मोठा खोल व गर्भित आहे. इतके दिवस आपण असें समजत होतों कीं, सरकार आपल्या सा[illegible] मालक आणि साऱ्या संबंधाची मालकी खेरीज करून सर्व मालकी जमिनीच्या कुळाची होती. रयतेचें स्वतत्र जमिनीवर नाहीं असा अर्थ नव्या कायद्यानें केला. राजभाग जो कांहीं जमाबंदीच्या वेळीं ठरला असेल तेवढाच सरकारचा होता पण यापुढें साऱ्यासाठीं ज्या जमिनी सरकार परत घेईल त्यांच्या भोगवट्याची पूर्ण मालकी सरकारानें आपल्याकडे घेतली. कुळाच्यानें सारा देववत नाहीं ह्मणून त्यानें आपली जमीन सरकारला परत करावी. लागलीच सर्व मालकी सरकारची झाली. सावकाराच्या हातीं तुरी देण्याला एक गुप्तसा अंधारांतून जाणारा मार्ग सरकारानें दाखविला आहे इतके दिवस सारा थकला तर जमिनीचा हरास होत असे आणि जमीन एका कुळाकडून दुसऱ्या कुळाकडे जाई. साऱ्यापेक्षां अधीक रक्कम हरासांत वसूल झाली तर ती जमिनीच्या मालकाला मिळत असे. परंतु या पुढें तसा क्रम चालणार नाहीं. जितक्या मिळतील तितक्या जमिनी सरकार परत घेईल. सरकाराला साऱ्याची माफी किंवा सूट मागण्याला कोणी जाणार नाहीं. सारा द्यावा नाहीं तर जमीन परत द्यावी असा कायदा ठरला आहे. या कायद्यानें रयतेचें स्वामित्व नष्ट केलें आहे.

सरकारचा हेतु चांगला असेल पण या कायद्याच्या मार्गानें तो साध्य नाहीं. पुष्कळसे शेतकरी असे निघाले आहेत कीं त्यांनीं आपली शेतीवरील मालकी विकून किंवा उधळून टाकली आहे. सरकारची शेती मजुरदारा प्रमाणें वाहतात आणि त्यांचें पोट भरत नाहीं. अशा लोकांकडे शेतीची पूर्ण मालकी ठेविली होती ही सरकारास मोठी चूक वाटते. जो वेडा मनुष्य स्वतां शहाणपणानें आपली इस्टेट संभाळत नाहीं त्याला एखादा पालन कर्ता लागतो. तद्वत् सरकार रयतेचा पालनकर्तेपणा आपल्याकडे घेत आहे आणि सावकारच्या कर्जरूपी धोंड्याखालीं सांपडलेल्या आणि कर्जाच्या चिखलांत रुतलेल्या रयतेला वर उचलण्यासाठीं सरकार आपला हात पुढें करण्याचा घाट घालीत आहे. हेतु फार स्तुत्य आहे पण अर्थशास्त्रवेत्ते ह्मणतात कीं, सरकारचा उपाय चुकीचा आहे आणि त्या पासून ऋणरोगाची वृद्धी होणार आहे. रोगाची चिकित्सा बरोबर झाली तरी औषधाच्या उपचाराचा मागही चिकित्से इतकाच कठीण आहे. हा दुसरा कार्यभाग सरकारला साधला नाहीं असें ह्मटल्या शिवाय राहवत नाहीं.

मुंबईच्या कायद्याची वऱ्हाडाला मोठीच भिती आहे आणि ती यथार्थ आहे. आमच्या प्रांतांत कायदे फार जलदी बनतात आणि त्यांची फारशी परिस्फूटताही कोठें होत नाहीं. याला उदाहरणें ह्मणजे पाटील पटवाऱ्यांचा नवा कायदाकानू होय. मुंबईचा कायदा इंडिया सरकारानें मान्य करूं नये ह्मणून मुंबई इलाख्यांत शहरोशहरीं जाहीर सभा भरत आहेत. अशा वेळीं आमच्या प्रांताला शंका घेण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.


# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 9 1901


We are sorry to record the death of Rao Bahadur Deorao Jaikrishna Deshpande, pensioner Extra Assistant Commissioner in his 62nd. year at Mehkar. The news is so sudden a surprise upon us that we are extremely grieved to find that such an excellent career in the public service should not find its sequel n the remaining portion of hisi social and private life. The abrupt close of his life suggests some sorry reflections. Rao Bahadur Babasahib was really a great man. The secret of his greatness lies in his ambition for a nobler self—devotion to duty and untiring energy for all sorts of work. He was a shrewd judge of human nature. He was a worldly wise—man He was his own architect. He had a taste for education. His application to official work was of a singular nature. From a low rank in the pulic service he rose to the highest grade in the line of the Extra Assistant Commissioners. He was keen and studious enough to pick up the meaning of talk and writing in English though he himself was a stranger to the English tongue. In the later years of his life his mind was mellowed with the richness of experience, the ripe thoughts of old age and a higher ideal of public usefulness. He was most utiliterian in views and character. Men in high posts discharge their duties in a satisfactory manner. But the crowning work of his public service was his stupendous work in the welfare of the famine-stricken people. His word was most honored in the circle of his jurisdiction and it was through him that charities were most liberally extended towards the relief of the poor and destitute families. His last services endeared him most to the public at large.

Rao Babadur was in harness and he preserved good health for his age till he retired from service. A four month's period of rest unnerved him so much that he was quite a stranger to the new routine of a comfortable, peaceful and quiet life. To our mind his death repeats some useful lessons. The sedentary habits of a judge at the desk for hours together have a killing effect upon the longevity of great people. The crush of office—work is often severe and burdensome. It usurps the hours of rest. It is now the fashion of the day that a servant of the Government should be a slave of work for all hours of the day The ideal of service has assumed a new phenomenal aspect. The Government do not expect their servants to do more than their proper duty. The excess of work cuts short a good number of useful lives and we hope that this evil will be remedied in some tangible manner by the joint action of the Government and their servants.

Education is the blessing of the British rule. The present system is thoroughly western in principle and character. The old ways of education did no longer continue to be useful in the face of the new demands which a foreign rule and a keen competition with the most civilized nations of the west made upon the educational requirements of the people. Like all human institutions, the present system of education has its many short—comings and weak points. The right observation of these defects will clear up the difficulties of the road. It is for this purpose of reviewing the past results of the education in India that Lord Curzon has held at Simla an Educational Conference of experts and specialists in education. The inaugeral address of the Viceroy was a masterly piece of eloquence, instruction and a comprehensive review of the modern progress of education. We hope to recur to this subject on some other occasion but before we do so we make no apology to quote Lord Curzon's remarks on the necessity of technical education. They are as follow:—

"Our present industrial schools are largely engaged in teaching carpentry and smithy work to boys who never intend to be carpenters or blacksmiths. There can be no excuse for such a mis—direction of energy. It applies also to many of the Art Schools, where with great labour a boy is taught carving or pottery or sculpture, or some other art industry, and then when he has got his diploma he cheerfully drops his art, and accepts a modest billet in the service of Government. If technical education is to open a real field for the youth of India, it is obvious that it must be conducted. First, we must co-ordinate them with the general schools, and distinguish, instead of mixing up, their courses. Then, we must turn them into practical places where a boy does not merely pick up a smattering of an art or an industry for which he has care, but where he acquires a training for a professional career. Lastly, we must invite native interest to co-operate with us in the matter, for there is no use in creating good schools, if the pupils will not come into them, and there is no use in manufacturing good workmen if no employment is available for them when they have been taught. If we can proceed on these lines, I belive that we may be able to do something substantial, even if it be not heroic for the cause of technical education in this country."

## वऱ्हाड

काल सायंकाळीं येथील वर्षोत्सव व्याख्यान मालेतलें ७ वें व्याख्यान रा० रा० विनायक आपाजी काणे पेनशनर तहशिलदार यांचे झालें. संभाषणाचा निबंध भूतदया ह्मणजे 'वसुधैव कुटुम्बकम्' या तत्वावर लिहिलेला होता. अध्यक्षस्थानीं रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर हे होते.

मौलवी रहिमतुल्ला हकीमुद्दीन तहशिलदार, खामगांव यांनीं आपली बदली वणी तहशिलीवर करून घेतली आणि रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर तहशिलदार, वणी हे या अदलाबदलीत खामगांवच्या तहशिलीवर येतील.

गेल्या २० वे तारखेपासून २४ दिवसची हक्काची रजा मि० दादी मास्तर तहशिलदार, पुसद यांनीं घेतल्या वरून त्यांच्या रजेंत रा. रा. गोविंद भास्कर ओक वाशिमच्या जिल्हा बोर्डाचे सेक्रेटरी यांस आफिशिएटींग तहशिलदारीची पुन्हा बढती देण्यांत आली हें कळविण्यास आनंद वाटतो.

नायब तहशिलदारांनीं कोणकोणती कामें करावीं या विषयीं अलिशान रेसिडेंट साहेबांनीं गेल्या रेसिडेन्सी आरडरी मध्यें हुकूम प्रकाशित केला आहे.

क्या० आर. डब्ल्यू. बर्टन कंटानमेंट माजिस्ट्रेट सिकंदराबाद यांची लोअर व हायर परीक्षा घेण्यासाठीं मुद्दाम कमिटी गेल्या ८ जुलै रोजीं बसली होती आणि तेव्हां क्या० साहेबांची फौजदारि विषयांत हायर परीक्षा उतरली व सिव्हिल विषयात ते नापास झाले.

वर्तमानसार.

चीनची खबर— चीनच्या बलहीन राष्ट्रास खाण्यासाठीं क्षुधेनें पीडलेले दहा पांच युरोपियन वाघ जेव्हां चवताळून चीनच्या अंगावर चोहोंकडून धांवले तेव्हां चीनचा चक्काचूर होऊन जातो अशी सर्वत्रांस भीति पडली होती. पण ईश्वरानें इतक्यांच्याहि काळदाढेंतून त्यास सुरक्षित पार पाडिलें. इतक्या एकत्र झालेल्या बलवान् शत्रूंशीं न लढण्याची कारवाई चिनास फारच उपयोगीं पडली. स्वातंत्र्यासाठीं, किंवा धर्मासाठीं लढण्याचा पैगम ह्यांनीं बांधला असतां तर हल्लीं जें यश ह्यास प्राप्त झालें आहे तें कदापिहि मिळतें ना. आपल्या शत्रूंचा आपसांतील द्वेषभाव व हेवा वाढून त्यांची आपसांतच फाटाफूट होईल व दुही माजेल, व असें झालें म्हणजे आपलें अचानक संरक्षण होईल ही जी चिनी मुत्सद्यांची शहाणपणाची मसलत तिनें आज चिनास आपली सुधारणा करण्यास फुरसत दिली आहे. व ह्या अमोल संधीचा ते जर पूर्ण उपयोग करून घेणार नाहींत तर ह्यांचे सारखें दुधखुळें व हतभागी राष्ट्र दुसरें कोणतेंच नाहीं.

लढाई— आपलें स्वातंत्र्य मिळेपर्यंत हातचें शस्त्र खालीं ठेवणें नाहीं असा जो बोअर लोकांचा कृत निश्चय तो अणुरेणु इतकाहि ढळला नाहीं. जसजसा इंग्रजांचा सोसाट्याचा झुंझावात बोअर लोकांच्या मंदावलेल्या अग्निशलाका वरून जातो तसतसा तो अग्नि मोठ्या जोरानेंच पेट घेतो. मे. क्रूगर, व स्टीन तसेंच बोअर सेनाधिपति डीवेट, बोथा, डिलारी आदिकरून मंडळी आपल्या लोकांस उत्तेजन देत आहेत व इंग्रज लोकांस साधेल तिकडून छळण्याचा क्रम अबाधित सुरूंच आहे. आह्मी, आमचीं मुलें व त्यांचीं मुलें अशी परंपरा देशास स्वातंत्र्य देई पर्यंत एक सारखें नेटानें लढत लढत प्राण देऊं पण भागुबाई सारखे शरण जाणार नाहीं किंवा लपून रहाणार नाहीं अशी त्यांची गर्वोक्ति आहे. आह्मांस स्वातंत्र्याखेरीज कोणचीहि गोष्ट प्रिय नाहीं. व अशा ह्या प्राणाहूनहि प्रिय वस्तूच्या प्राप्तीसाठीं आमच्या वंशातील कोणत्याहि मनुष्याच्या हातून कसूर होणार नाहीं. आमचा ईश्वरावर असलेला पूर्ण भरंवसा व आमचा दृढनिश्चय याचें सुफल आह्मांस प्राप्त झाल्याखेरीज रहाणार नाहींच नाहीं, असा त्यांचा पक्का ग्रह झाला आहे. इंग्रज लोकांनीं आमचा सर्व देश आपल्या बलाढ्य सैन्यानें फुळवून सोडला व आह्मांस एका गव्हा इतकीहि जागा ठेविली नाहीं तरी आमचें जें पुण्य पवित्र रक्त येथें सांडिलें आहे त्याच्या प्रभावानें आमच्या प्रिय भूमीच्या पोटांतून एकदम हजारों लाखों शूर वीर उत्पन्न होऊन ह्यांस सैरा वैरा पळवून लावतील अशी आह्मांस उमेद आहे. आपल्या इंग्रजांच्याहि सद्दीचा जोर कांहीं कमी नाहीं व तेहि ह्या लोकांचा खरपूस समाचार घेतल्याखेरीज स्वस्थ राहतील ही गोष्ट होणें नाहीं.

मे. क्रूगर ह्यांनीं झार साहेबांच्या मुखाल. तीचा सुयोग पुन्हां जुळवून आणण्याचा प्रयत्न केला पण दुर्दैवानें तो निष्फळ झाला, बोअर लोकांचा उघडपणें कोणीच कैवार घेत नाहीं किंवा ह्यांच्या संबंधीं मध्यस्ती करण्याचेंहि कोणी पतकरीत नाहीं. असें असतांना बोअर लोकांचा धीर किमपिहि तुटूं नये हें आश्चर्य होय. पाताळांत काय गुप्त कारस्थानें असतील ती असोत.

बहाद्दर चोर—अमेरिकेंत सानफ्रांसिस्को शहराजवळ सोन्याची खाण आहे. तेथें २ खंडी सोनें तयार करून त्याच्या कांबी एका मजबूत कोखंडी खोलींत ठेविल्या होत्या. व रीतीप्रमाणें बंदूक पहारा सज्ज होता. पण कांहीं अट्टल चोरांनीं तेथून जवळच असलेल्या आगगाडीच्या बोगद्यापासून तों थेट त्या सोन्यापर्यंत भुयार खणून सर्व सोनें लांबविलें. व हें सर्व काम इतक्या शिताफीनें व बेमालूम करून सोडलें आहे कीं, सर्वांना तोंडांत बोटें घालून चुरमुरे खात बसावें लागलें. ह्याला म्हणतात चौर्यकर्माचें कसब !

चमत्कार—पारीस व बर्लिन ह्या दोन शहरामधील ५०० मैल अंतर आहे व ह्या दोन शहारांमध्यें एक नळ घातला आहे. ह्यांत पत्र टाकलें असतां अर्ध्या तासांत तें दुसरीकडे पोहोंचतें. ही काय युक्ति आहे बरें ?

नकली हिरे—आस्ट्रिया देशांत असले हिरे पुष्कळ आहेत व ते खऱ्या हिऱ्यांनाहि आपल्या गुणांनीं मागें सारतात. चकचकीत पितळ किंवा खोटें मोती खऱ्याचीहि तोंडांत मारतें तद्वत हें होय. सर्वच गोष्टींत खऱ्या खोट्याची पारख करणें फारच अवघड व धोक्याचें काम आहे.

ही कशी काय सुधारणा—अलिकडे बंदुकींत विशेष सुधारणा झाली आहे व त्यामुळें जखमी झालेले शेंकडा सहाच गतप्राण होतात. ही सुधारणा बरी कां वाईट ?

पोहण्याचें साहस—डोव्हरची सामुद्रधुनी पोहून जाण्याचे पुष्कळांचे प्रयत्न सुरूं आहेत. परवां हालपिन नांवाचा एक मनुष्य १२ तास क्याले शहरापासून पोहत गेला. इंग्लंडच्या किनाऱ्याला पोहोंचण्यास सोर ६ मैलच जावयाचें राहिलें होतें. तेवढें होतें तर हें धाडसी कृत्य तडीस गेलें असतें. इतका पोहणारा आजपर्यंत कोणी आढळला नाहीं.

कायद्याचा ठराव—मि. बकलंडसाहेब, चीफ सेक्रेटरी, बंगाल सरकार यांनीं असा, ठराव केला आहे कीं,-फौजदारींत फिर्याद दाखल झाल्याबरोबर माजिस्ट्रेटांनीं आरोपीस समन्सें करूं नयेत, तर पूर्वी फिर्यादी तर्फे कांहीं मुद्याचे साक्षीदार घेऊन खटल्याचे खरेपणाविषयीं थोडीशी चांचणी पहावी व फिर्याद दुष्ट बुद्धीनें किंवा लबाडीनें केली नसून खरी असावी असा ग्रह झाला तर पुढें आरोपीस समन्सें करून खटला चालवावा. अशा पद्धतीनें निरपराधी लोकांस त्यांच्या दुष्ट व उपद्रवी शत्रूपासून होणारा विनाकारण त्रास व छल बंद होईल. हेतु चांगला आहे पण ह्या रीतीनें, मनुष्य अपराधी आहे असा पूर्वीच एककली ग्रह झाल्यामुळें न्यायाधिशाच्या मनाची समता बिघडून न जाण्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे.

उद्योग—अमेरिकेंत एक कंपनी निघाली आहे. तिचा उद्देश असा आहे कीं, एक राकेल तेलाची खूप खोल विहीर खणावयाची. व त्यांत एक पाणबुड्या सोडून तळापर्यंत तिची तपासणी करावयाची. ह्मणजे मग दुसऱ्या राकेलच्या खाणी शोधून काढण्यास ह्या तपासणीचा चांगला उपयोग होईल. अमेरिकन लोक उद्योगी खरे !

स्त्रिया विरुद्ध ओरड— स्काटलंडांत स्त्रियांनीं वकिलीचा धंदा आटोपण्याचें काम सुरूं केल्यामुळें पुरुषांची प्राप्ति कमी होऊं लागली आहे व ह्यामुळें ह्यांनीं असे पुरुषांचे धंदे करूं नये अशाबद्दल ओरड सुरूं आहे. स्त्रिया व पुरुष यची स्पर्धा सुरूं झाली तर स्त्रियाच विजयी होतील व मनुष्यास हार खावी लागेल. ईश्वरानें अशीच कांहीं खजब मोहनी स्त्रियांस दिली आहे. सुधारणा छत्रा खालीं स्त्रीपुरुषांचे हक्क समसमान सारखे आहेत. मग त्यांच्या विरुद्ध इतकें अकांडतांडव काय ह्मणून !

भ्रष्टाकार—- बंगालकडे एका ब्राह्मणाचे घरीं स्वयंपाक करण्यासाठीं एक हजाम स्त्री आ ण ब्राह्मणाच्या आहों अशी लबाडी करून राहिली पण हें पाप बाहेर येऊन त्याचें यथायोग्य प्रायश्चित तीस मिळालें. लबाडी व पाप कधीं झाकत नाहीं.

असें कसें झालें?— एका स्त्रीनें आपला फोटोग्राफ काढू दिला. पण चमत्कार असा कीं, तो फोटो फारच उत्तम निघाला व तो तिच्या नवऱ्यास खुद्द त्या बायकोपेक्षांही जास्तच आवडला. फोटो काढण्यानें अस्सल पेक्षां नक्कल सरस उतरू लागली तर मग आपला फोटो कोणी काढून देणार नाहीं हें फोटोग्राफरांनीं ध्यानांत ठेवावें.

झोंपेंत चालणारी स्त्री— ही खोड पुष्कळांस असते पण यापासून अपघात झाल्याचीं उदाहरणें क्वचित ऐकूं येतात. एका स्त्रीनें आपल्या आईला पहाटे उठविण्याविषयीं सांगितलें होतें. पण ती पूर्वीच झोंपेंत उठून, आपला पोषाख चढवून, बायसिकलवर बसून रपेट करण्यास गेली व तिला ह्यानें रपेट करितांना पाहिलें होते. परंतु तिला हा पैकीं एकाही गोष्टीचें भान नव्हतें. असा काय चमत्कार आहे कोण जाणे !

उत्तम शोध— एका डाक्टरानें असें शोधून काढलें आहे कीं, पुत्र प्राप्तीची इच्छा करणाऱ्या स्त्रियांनीं ‘ कारबो हाइड्रेट ’ हें द्रव्य विशेष पोटांत जाईल असें अन्न खावें. गर्भवती स्त्रीच्या खाण्यापिण्यावर मुलगा किंवा मुलगी होणें अवलंबून आहे. तिच्या खाण्यांत नाइट्रोजनचा पुरवठा कमी झाल्यास कन्या व अधिक झाल्यास पुत्र होतो. पुत्र संतानाची इच्छा असणाऱ्या लोकांनीं इकडे लक्ष्य पुरवावें.

एक शोधक—अहो, फलाणे डाक्टर कोठें राहतात आणि रोगी कोठें असतात !

डाक्टरचा कंपौंडर— डाक्टर येथें खालीं राहतात आणि त्यांचे रोगी ( माडीकडे व आकाशाकडे बोट दाखवून ) वर राहतात.

शोधक— रोगी पहिल्यानें येथें येतांना कसे येतात आणि जातांना कसे जातात ?

कंपौंडर— रोग्यानां आणण्याला एकटा दुकटा बस होतो पण जातांना मात्र चौघे तरी लागतातच.

सात आठ वर्षे वयाच्या एका मुलाला चोरीचे अपराधाबद्दल माजिस्ट्रेट कोर्टांत उभें केलें होतें. मुलाचें तें लहान वय पाहून माजिस्ट्रेटाला फार दया आली व त्यानें त्याला विचारलें, कायरे मुला ! तूं एवढ्या लहान वयांत चोरी करूं लागलास कां ! त्याला मुलानें उत्तर दिलें. सरकार, बाबा अतिशय आजारी आहेत, तेव्हां त्यांचें काम मी नाहीं केलें तर कोण करणार ! धा.वृ.

युक्तीची कमाल आहे— पोस्टांतून लोकांच्या सोईसाठीं ह्मणून क्विनाइन विकण्यांत येत असतें तद्वत चहाहि विकण्यांत यावा अशाबद्दल व्यापारी लोकांचे प्रयत्न सुरू आहेत. पोस्टांत आणखीहि कित्येक वस्तु उत्तम रीतीनें किफायतवार खपण्याचा संभव आहे. युक्ति खरोखर नांवाजण्या सारखी आहे.

विषावर तेजाब रामबाण आहे— सर्प चावलेल्या मनुष्यास गंधकाचा अर्क ( Suphurio Acid ) दिलें व सर्पदंश झाल्या ठिकाणीं जागा उकलून त्यावर तेजाब तेलाचा उपयोग केल्याप मनुष्य साफ बरा होतो असें अनुभवांतीं समजलें आहे. विंचवाच्या विषावरही हें तेल रामबाण होईल असें वाटतें. अनुभव घ्यावा.

अति उंच मुलगी— अमेरिकेंत इला नांवाची एक मुलगी आहे. इची उंची आतांच ८ फूट ४ इंच असून उत्तरोत्तर ती वाढत आहे. तिचे आईबाप तिला मुलाप्रमाणें शोभतात. हिला तिच्या विलक्षण उंचीवरून एका कसरत कंपनीनें आपल्या चाकरीस ठेविलें होतें. ती नोकरीदी तिनें सोडली. चाकरींत पैसा कमवून ती आतां स्वस्थ घरीं आहे. इला जास्त उंच असणारा नवरा कोठेंच मिळत नाहीं तिचें टेबल, खुर्ची, बिछाना सर्वच त्या मानानें मोठें आहे. पुष्कळ लोक तिला पहावयास जातात.

---

## नोटीस

रा. रा. १ बळीराम शिंपी, २ नारोबा शिंपी, ३ गंगाराम शिंपी, ४ राजाराम शिंपी, ५ किसन शिंपी, आणि इतर जातभाईबिरादर व सर्वत्र पंच मंडळी, रहाणार अकोला.

या सर्वांस:——

या लेखानें कळविण्यांत येते कीं जातीच्या पंचांनीं जानकीराम शिंपी याला ता० १६ आगष्ट रोजीं पावन करून घेतलें ह्या वेळीं मला अपंक्त करण्यांत आलें, व माझ्याशीं पंक्तिव्यवहार केला नाहीं.

माझ्यावर बहिष्कार त्याच दिवशीं टाकण्याला काय सबळ कारण घडलें हें मला समजूं न देतां, पंचांनीं हा खोटाच बहिष्कार घातला आहे. या संबंधाचा योग्य उलगडा तुह्मी आठ दिवसांच्या आंत केला नाहीं तर बहिष्कार टाकून माझी बेअब्रू व अपमान केल्या बद्दल तुह्मांवर योग्य कोर्टांत दिवाणी व फौजदारी केली जाईल आणि बहिष्कार घालण्याची क्रिया तुह्मी विनाकारण केली असें शाबित झाल्यास तुह्मां कडून सर्व नुकसानी भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ७ माहे सप्टेंबर सन १९०१ इ०

सही

नामदेव हरी शिंपी दस्तुर खुद.

( पुरवणी पहा )

साल अखेर „ ७ „ १ ८९
किरकोळ अंकास .........................८२

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

REGISTERED N. No. 4

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ........................... 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXV    AKOLA MONDAY 16 SEPTEMBER 1901    NO 36

वर्ष ३५    आकोला सोमवार तारीख १६ माहे सप्टेंबर सन १९०१ इ०    अंक ३६

### आमची शरीरप्रकृति व आमच्या देशाची भूगोलस्थ स्थिति.

पुष्कळ लोक प्रतिपादन करतात कीं, आमचा देश उष्ण कटिबंधांत असल्यामुळें आमच्या शरीरावर उष्ण हवेचा परिणाम होतो, व त्या मुळें आमची शक्ति क्षीण होते. जेव्हां जेव्हां आमच्या शरीर शक्ती विषयीं बोलणीं निघतात तेव्हां तेव्हां ही एक सबब पुढें आणण्यांत येते. पण ही सबब पुढें आणणारे गृहस्थ अर्धवट विचार केलेले असतात असें दिसतें. विचारी पंडितांच्या तोंडून हें विधान फारसें ऐकण्यांत येत नाहीं. तथापि ही समजूत बऱ्याच लोकांची असावी असें दिसतें. म्हणून त्या विषयीं सावकाशपणें विचार करणें जरूर आहे. भुगोलाकडे पाहिलें असतां आमचा सर्व देश उष्ण कटिबंधांत नाहीं हें पहाणारास कळेल. उत्तर अक्षांश २३॥ पर्यंत जो हिंदुस्थानचा भाग आहे तो मात्र उष्ण कटिबंधांत आहे म्हणजे साधारणतः दक्षिण हिंदुस्थान उष्ण कटिबंधांत येतो. सर्व उत्तर हिंदुस्थान समशितोष्ण कटिबंधांत आहे; परंतु हिमालय हा एक प्रकारें उत्तर ध्रुवच असल्या मुळें त्याच्या आसमंतातच्या प्रदेशांस शीत कटिबंधांतलेच प्रदेश म्हणण्याला हरकत नाहीं. हिंदुस्थानांत शीत, समशीतोष्ण आणि उष्ण अशा तिन्ही हवा आहेत; व यामुळेंच हिंदुस्थानास "जगाचें सार" अशा सारखें जें नांव दिलेले आहे तें यथार्थ आहे.

उष्णता ही शरीरशक्तीस अपायकारक आणि तिच्या वृद्धीस प्रतिबंधक आहे, असें जर आपण मानिलें तर तो आपला सिद्धांत सर्वत्र सारखा लागूं पडला पाहिजे. या करितां उष्णकटिबंधांत पृथ्वीच्या पाठीवर जे सर्व देश आहेत त्यांतील लोकांची शरीरप्रकृति कशी आहे हें पाहणें आपणांस जरूर आहे. आपल्या पश्चिमेकडचे आरब लोक, त्यांच्याही पलीकडचे आफ्रिकेंतील लोक हे आमच्या सारखेच उष्ण किंवा समशीतोष्ण कटिबंधांत आहेत. अतलांतिक महासागर ओलांडून उत्तर व दक्षिण अमेरिका या दोन्ही खंडांत उष्णकटिबंधांत असलेले लोक शरीर शक्तीनें कसे आहेत हेंही आपणांस पाहिलें पाहिजे. तसेंच पासिफिक महासागरांत उष्ण कटिबंधांत येणारीं जीं बेटें आहेत त्यांतील लोकांविषयींही आपणांस विचार केला पाहिजे, पण तूर्त आपण बेटें सोडून देऊं. कारण तीं सर्व बाजूंनीं समुद्रानें वेष्टित असल्यामुळें त्यांची आमची तुलना चांगली होणार नाहीं. या करितां आपण फक्त एशिया, आफ्रिका आणि अमेरिका यांतील देशांचाच विचार करूं. अरबस्तान देश अंशतः उष्ण व अंशतः समशीतोष्ण कटिबंधांत असून, आरब लोक शरीरानें किती सुदृढ आहेत, व त्यांच्या अंगांत पाणी आणि तरतरी किति आहे हें आपण जाणतोंच आहों. आफ्रिकेंतील उष्ण कटिबंधांतले लोक वर्णानें किती जरी काळे असले तरी किती मजबूत, कणखर आणि दगडा सारखे आहेत हेंहि आपणांत ठाऊक आहे. उत्तर व दक्षिण अमेरिका यांत उष्ण कटिबंधांत असलेल्या लोकांची आपणांस चांगलीशी माहिती नाहीं, तरी ते आमच्या सारखे पुचाट असल्या बद्दलहि आपल्या ऐकिवांत नाहीं. तेथील समशीतोष्ण कटिबंधांत असलेल्या ज्या लोकांची आपणांस माहिती आहे ते लोक म्हणजे युनाइटेडस्टेटस् या देशांतील अत्यंत सुधारलेले व पराक्रमी अमेरिकन लोक हे होत. हे मूळचे ब्रिटिश लोकच होत. तसेंच हे मूळचे थंड देशांतलेच होत. यांना अमेरिकेस जाऊन सुमारें तीनशें वर्षें झालीं. तथापि उष्ण हवेंत गेल्यामुळें हे दुर्बळ झाले आहेत असें कांहीं दिसत नाहीं. कारण हल्लीं हें राष्ट्र इतकें जोरदार आहे कीं, कोणत्याही युरोपियन राष्ट्रास तें शक्तिमत्तेंत हार जाणार नाहीं. आरब, आफ्रिकन् किंवा अमेरिकन् या लोकां पैकीं कोणावर उष्ण हवेचा परिणाम होऊन जर ते दुर्बळ झालेले नाहींत तर उष्ण हवेमुळें आम्ही हिंदुस्थानचे लोक मात्र दुर्बळ झालों आहों हें म्हणणें कसें टिकेल ?

आमचा देश अर्ध्याहून अधिक उष्णकटिबंधांत आहे हें खरें. तथापि उष्ण हवाच बारा महिने असते असें कांहीं नाहीं. हवेंत ऋतूंचा फेरबदल चांगला आहे. सुमारें तीन महिने पावसाळ्याचे, चार महिने थंडीचे आणि एक दोन महिने मध्यम उष्णतेचे असे सुमारें वर्षाचे नऊ महिने पावेतों हवा थंड आणि समशीतोष्ण अशी असते. शिवाय समुद्रकांठ किंवा घाटमाथा येथील लोकांस तर थंड आणि समशीतोष्ण हवेचा विशेष फायदा असतो. तेव्हां उष्ण देश असल्यामुळें उष्ण हवेचा शरिरावर परिणाम होऊन तें निःशक्त होतें किंवा त्याची चांगली वाढ होत नाहीं हें म्हणणें पोकळ आहे. प्राचीन काळीं, कौरव पांडवांच्या वेळीं म्हणा, त्याच्या अलिकडे ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं शें दोनशें वर्षें म्हणा, या देशांत जे लोक होते ते किती शक्तिवान, पिंडानें मजबूत, उंच आणि पराक्रमी असे होते. त्याच्याही अलिकडे मुसलमानांच्या पहिल्या पहिल्या स्वाऱ्यांच्या वेळीं तसेंच त्याहून अलिकडे शिवाजी महाराजांच्या वेळे पर्यंत जे लोक होते तेही काय कमी होते ? सर्व निःशक्तता काय ती इंग्रजी पासून अलिकडे आली आहे. तेव्हां हवेच्या कारणापेक्षां दुसरीं कारणें असलीं पाहिजेत तीं कोणतीं असतील यांचा विचार सर्वांनीं करून तीं दूर करण्याचा यत्न केला पाहिजे. सर्व दोष जे हवेवर ढकलतात ते विचार करून आपल्या मेंदूस श्रम द्यायला इच्छित नाहींत.

दुसऱ्या एका दृष्टीनें हा विचार करूं. एकंदर सृष्टीची रचना अशी दिसते कीं, ज्या कोणत्य ही हवेंत जे प्राणी असतात त्यांना ती हवा पथ्यकारक असते. कितीही उष्णता असली तरी त्या हवेंत जे प्राणी असतात त्यांची रचना अशी बनलेली असते कीं, ती उष्णता त्यांस हितावहच असते. हीच गोष्ट थंड हवेस लागू आहे. हवे पासून जर दुष्परिणाम व्हावयाचा असेल तर एका हवेंत जन्मलेले प्राणी जर दुसऱ्या हवेंत जाऊन राहतील तर ती दुसरी हवा त्या प्राण्यांस अपायकारक होईल. पण कोणतीहि हवा तिच्यांत जन्मलेल्या प्राण्यास जर अपायकारक होऊं लागली तर सृष्टि रचनेंत दोष आहे असें म्हणावें लागेल. पण सृष्टि इतकी बिनचूक व पूर्णपणें बनली आहे कीं तिच्यांत दोष काढणें शक्य नाहीं. बलकें मनुष्यांचें सर्व शहाणपण सृष्टिरूप गुरू पासून शिकलेलें व संपादन केलेलें आहे. या शिवाय सृष्टीच्या अंगीं दुसरा एक मोठा उपकारक गुण आहे तो हा कीं, जरी एखाद्या हवेंत कित्येक प्राणी जन्मलेले नसले तरी त्या हवेंत त्यांच्या दीर्घकालीन वासानें त्यांस ती हवा पथ्यकारक होऊं लागते, व तशी ती होणार नसेल तर त्या हवेंत परकी प्राण्यांचा फार दिवस वासच होऊं शकणार नाहीं. परंतु हा सृष्टीच्या अंगचा गुण मर्यादित असला पाहिजे. आपल्या प्रस्तुतच्या विषया संबंधानें आपणांस हा विचार कर्तव्य नाहीं. कारण आपला देश उष्ण आहे व आपण त्यांतच जन्मलेले आहों. तेव्हां तो आपल्या शरीरप्रकृतीस हितावहच असला पाहिजे. इंग्रजां सारखे थंड देशांत रहाणारे लोक या उष्ण देशांत येऊन राहले आहेत. त्यांस ही हवा अपायकारक होणें सर्वथैव शक्य आहे. पण ज्या आमच्या शरिरांतील प्रत्येक परमाणु उष्ण देशांतील पृथ्वीचाच अंश आहे त्या आमच्या जड शरिरांचें आणि उष्णतेचें स्वाभाविक प्रेम आहे हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे. आणि आमच्या निःशक्ततेस उष्णता कारण आहे ही भ्रांति समूळ काढून टाकिली पाहिजे.

आम्ही तर विषुववृत्ता पासून उत्तरे कडे आठ नऊ अंश दूर आहों, पण आफ्रिकेंतील विषुववृत्ता जवळचे लोक घ्या. त्यांचीं शरिरें कोळशा सारखीं काळीं आहेत ही गोष्ट वेगळी. पण त्यांचा मजबूतपणा आणि घट्टमुट्टपणा किती वर्णनीय आहे हें सिद्दी लोकांस ज्यांनीं पाहिलें असेल त्यांच्या लक्षांत आलें असेल. जे बोअर लोक इंग्रजांशीं आज दोन वर्षें लढत आहेत, त्यांचा ट्रान्सव्हाल देश घ्या. हा देश उष्ण कटिबंधांतच आहे. तरी ते लोक किती मजबूत व शूर आहेत ? हे लोक मूळचे ट्रान्सव्हालचे नाहींत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हे लोक आपणांस डच म्हणवितात, म्हणजे हे मूळचे हालंड देशाचे रहिवासी होत. ट्रान्सव्हाल हें त्यांस देशांतर होय, व त्यामुळें हालंडच्या डच लोकांपेक्षां ते निःशक्त असायास पाहिजे होते; परंतु तसा प्रकार दिसत नाहीं. तिसरें उदाहरण, युनैटेड स्टेटस् येथील अमेरिकन लोकांचे घ्या. सतराव्या शतकाच्या आरंभीं व पुढें कांहीं वर्षें पर्यंत त्या शतकांत इंग्लंड देश सोडून ते अमेरिकेस जाऊन राहिले. युनैटेडस्टेटस् हा देश समशीतोष्ण कटिबंधांत आहे. तेथील हवा इंग्लंडच्या हवेपेक्षां पुष्कळच उष्ण अशी त्या लोकांस वाटली असली पाहिजे. परंतु उष्ण हवेचा निःशक्तकारक परिणाम त्यांच्या शरिरांवर न होतां ते जसेच्या तसेच बळकट राहिले आहेत. जर ते त्या हवेंत निःशक्त झाले असते तर सन १७७६ चे सुमारास अमेरिकन लढाई झाली तेव्हां ब्रिटिश सरकारनें त्यांस चोपलें असतें, आणि त्या लोकांनीं इंग्रजांचा पराभव करून जें स्वातंत्र्य मिळविलें तेंही त्यांस मिळालें नसतें. बरें, त्या काळाला आज बरींच वर्षें झालीं, तेव्हां पासून हल्लीं पर्यंत जरी ते अधिक अशक्त झाले असते तरी इंग्रज सरकारनें आज देखील कांहीं कुसपट काढून त्यांच्याशीं कलह उभा केला असतां. पण त्यांची शक्तिमत्ता इतकी कायम राहिली आहे कीं त्यांस सर्व राष्ट्रें भितात. उष्ण कटिबंधांतील सर्व देशांचा इतिहास कळणें संभवनीय नसल्यामुळें प्रत्येक देशाची शारीरशक्तिमत्ता कशी आहे हें पहाण्याची आपणांस सवड नाहीं. नाहीं तर या संबंधांत आपणांस आपली पक्की खातरी प्रत्यक्ष उदाहरणांनीं करून घेण्यास सांपडली असती. हल्लीं जीं कांहीं थोडीं उदाहरणें कळण्यासारखीं आहेत तीं वर दिलीं आहेत. तितक्यावरून व वर दिलेल्या इतर विवेचनावरून, आपल्या देशाची उष्णता आपल्या शक्तिहीनतेस बिलकूल कारण नाहीं असें खातरीपूर्वक समजण्यास कांहीं हरकत नाहीं.

बरें, देशाच्या देशांत भिन्न जातींच्या लोकांकडे पाहा. सर्व सारखे दुर्बळ आहेत काय ? उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान यांच्यामध्यें तर मोठाच फरक आहे. त्या प्रमाणेंच उत्तर हिंदुस्थानचे उत्तर हिंदुस्थानांत, पंजाबचे लोक, वायव्येकडील प्रांतांतील लोक व बंगाली लोक यांत फरक आहे. त्या प्रमाणेंच सिंधी लोक, मारवाडी लोक, रजपूत लोक, कच्छी आणि काठ्यावाडी यांत फरक आहे. तसेंच दक्षिण हिंदुस्थानचे दक्षिण हिंदुस्थानांत, मराठे,

कानडी, तेलंगी वगैरे लोकांत फरक आहे. मराठ्यांत ब्राह्मण, शूद्र, वैश्य इत्यादिकांतही फरक आहे. हे सर्व लोक बहुतेक सारख्याच हवेंतले असून त्यांच्या शरिरांचे पिंड, यांचा राकटपणा आणि यांची शक्तिमत्ता यांत फरक कां ? या फरकाचें आणि हवेचें लग्न लावणें बरोबर होणार नाहीं. फरकाचीं कारणें कोणतींही असोत व कितींही असोत तीं देशस्थिति आणि हवा यांच्या बाहेर शोधिलीं पाहिजेत. विद्वानांनीं तीं शोधिलीं आहेत व तीं सांपडलीं आहेत. तीं कारणें अशीं आहेत कीं, त्यांचा सर्वास प्रतिकार करितां येईल. देशस्थिती आणि हवा हीच जर कारणें असतीं तर यांच्या पुढें आपणांस हात टेकावे लागले असते.

## लोकांची मदत पाहिजे.

हल्लींची राज्यपद्धती अशी आहे कीं, कित्येक गोष्टींत जर लोकांनीं मदत केली नाहीं, तर त्या त्या गोष्टी चांगल्या चालावयाच्या नाहींत. अशा गोष्टींमध्यें वर्तमानपत्राचीही गोष्ट आहे. “वर्तमानपत्रें ही सर्व गोष्टींत लोकाश्रयावर अवलंबून आहेत, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. लोकांनीं वर्गणीदार होऊन तीं घेतलीं पाहिजेत. ह्मणजे त्याला द्रव्यद्वारा आश्रय दिला पाहिजे; कित्येक लोकांनीं ठिकठिकाणची बातमी त्यांना पाठविली पाहिजे; विद्वानांनीं त्यांस पुष्कळसे लेख लिहून पाठविले पाहिजेत; व सरकारी अंमलदारांचा जुलूम किंवा दांडगाई कमी होण्यास पाहिजे असेल, तर लोकांनीं आपल्या जबाबदारीवर त्या संबंधाच्या गोष्टी वर्तमानपत्रांस कळवून, प्रसंग पडल्यास, पुरावा व पैसा यांनिशीं वर्तमानपत्रकारांस मदत करण्यासाठीं तयार असलें पाहिजे. लोकांस असें वाटतें कीं, सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलमाच्या किंवा दांडगाईच्या गोष्टी वर्तमानपत्रांत याव्यात. व त्या न आल्या ह्मणजे ते वर्तमानपत्रांच्या संपादकांस शिव्या देतात, भित्रे ह्मणतात, व सर्वतोपरी त्यांवर रागावतात. पण अशा गोष्टींत लोकांची दोन प्रकारची त्यास मदत पाहिजे असते एक पुराव्याची व दुसरी पैशाची. सरकारी अंमलदारांचें अन्यायाचें वर्तन ज्या ज्या लोकांनीं पाहिलें असेल त्या सर्वांनीं प्रसंग पडल्यास कोर्टांत जाऊन त्याबद्दल खरी खरी साक्ष दिली पाहिजे. व दुसरें वर्तमानपत्राच्या सर्व वर्गणीदारांनीं वर्तमानपत्राला, फौजदारी खटला झाला असतां, जो खर्च लागेल तो पुरवला पाहिजे. अशा रीतीनें वर्तमानपत्रास जेव्हां लोकाश्रय मिळेल, तेव्हांच तीं सरकारी अंमलदारांच्या अन्यायाच्या आचरणांवर उघड उघड टीका करूं शकतील, व आपलें एक मुख्य कर्तव्य करूं शकतील. अशा तयारी वांचून टीका करण्याचें काम फार भयंकर आहे. कारण हें राज्य कायदेकानूंचें आहे. कोणत्याही व्यक्ती संबंधानें या व्यक्तीच्या कीर्तीस प्रतिकूल असा एक शब्द लिहावयाचा झाला तर तो लिहिण्यापूर्वीं पुराव्याची सज्ज तयारी पाहिजे. शिवाय या गोष्टीच्या स्वरूपा प्रमाणें संपादकाच्या खिशांत हजार दोन हजारांची रक्कम तयार पाहिजे. कारणें ज्या व्यक्तीच्या संबंधानें प्रतिकूल टीका येणार ती व्यक्ति संपादकावर अब्रूच्या नुकसानी बद्दल खास फिर्याद करणार. खुषीनें न करील, तर वरिष्ट तरी त्या व्यक्तीला फिर्याद करायाला लावणार. अशा रीतीनें चार दोन फिर्यादी होऊन सरकारी अंमलदार जेव्हां दोषी ठरतील व वर्तमानपत्रकार यशस्वी होतील तेव्हांच वर्तमानपत्रांचा चांगला वचक बसेल. अशी वेळ येईपर्यंत अशा प्रकारचा वर्तमानपत्रांचा वचक बसणें दुरापास्त आहे. व तोपर्यंत वर्तमानपत्रांकडून लोकशिक्षणाचें काम साधारणच होईल; याहून अधिक जोराचीं कामें होणार नाहींत. वर्तमानपत्रांसंबंधानें लोकांचीं कर्तव्यें काय आहेत हीं त्यांनीं समजून घेतली पाहिजेत. वरिष्ट प्रतीचे जे लोक आहेत त्यांत या गोष्टी कळतात. पण या संबंधानें ते पर्वा फारशी करीत नाहींत. कारण सरकारी अंमलदारांच्या अन्यायापासून त्यांना कांहीं विशेष त्रास होत नाहीं, व ते आपल्या पलीकडे इतर लोकांची बस्तपूस्त करीत नाहींत. ज्यांना अन्यायाचे परिणाम भोगावे लागतात ते बिचारे खालच्या प्रतीचे लोक होत. यांनीं इतकीच कामगिरी करावयाची आहे कीं, “खरें बोलायाचें;” मग त्या पासून जो परिणाम होईल तो होईल. एरव्ही तरी त्यांना अनेक दुःखें भोगावीं लागतातच. खरें बोलण्या पासून जर कांहीं संकट ओढवलें किंवा दुःख झालें, तर त्यांना एवढें तरी समाधान राहील कीं, “खरें बोलावें” ही धर्माची आज्ञा आहे; व त्या आज्ञे प्रमाणें आपण वागलों, त्या अर्थी याचा चांगला मोबदला येथें किंवा पढें आपणांस मिळेल. ही एक बाजू झाली. आतां दुसरी बाजू राहिली ती मध्यम आणि श्रेष्ठ वर्गाकडे येते. या दोन्ही वर्गांनीं, ह्मणजे ज्या वर्गांतच वर्तमानपत्रांचे आश्रयदाते व वर्गणीदार असतात त्यांनीं प्रसंगास पैसा पुरविण्याची हमी घेतली पाहिजे. ती हमी घेण्यास त्यांच्या ठिकाणीं परोपकारबुद्धि पाहिजे. एक प्रकारें हा परोपकारच होईल; पण दुसऱ्या प्रकारें तें त्यांचें स्वतःचें कर्तव्यच आहे. व तें त्यांनीं बजावलें असें होईल.

× × ×

कोणतेंही सरकार म्हटलें ह्मणजे त्या मध्यें हजारों व्यक्तींचा समुदाय असलाच पाहिजे. ह्मणजे सरकारचीं कामें करणारे नोकर हजारों असलेच पाहिजेत. कोणतीही राज्यव्यवस्था लोकांच्या सुखा करितां असते. जे सरकारचे नोकर असतात यांस कायद्या प्रमाणें वागून लोकांस सुख द्यायाचें असतें. हे नोकर लोक ह्मणजे सरकारची दिव्य दृष्टी होय व हीच अंध होऊन लोकांस दुःख देईल तर राजा किंवा कायदे करणारे त्या गोष्टीस काय करतील? अज्ञान रयतेस असें वाटतें कीं सरकारचे नोकर जो आह्मांस त्रास देतात, तो देण्यास त्यांस राजाचीच आज्ञा असते; पण ही यांची चुकीची समजूत आहे. नोकर काय करितात हें राजास कळत देखील नाहीं; व कळणें संभवनीय नाहीं. तेव्हां नोकरांचे जुलूम लोकांनीच उघडे पाडिल्या वांचून त्यांच्या प्रतिबंधास दुसरा इलाजच नाहीं. हा प्रतिबंध राजाकडून कधींच व्हावयाचा नाहीं. याचे उपाय लोकांनींच स्वतः केले पाहिजेत. आपण पुष्कळ वेळां “अमुक राष्ट्र सुधारलेलें आहे,” असें बोलतों. त्या बोलण्यांत आपले दुसरे कितीहि अर्थ असोत; त्यात मुख्य अर्थ असा असतो कीं “त्या राज्यांतील रयतेस सरकारी नोकर भितात” तेव्हां मध्यम वर्गाचे व वरिष्ठ वर्गाचे लोक जर आपलें राष्ट्र सुधारावें अशी इच्छा करित असतील तर त्यांनीं वर्तमानपत्रांस हरएक प्रकारें जोर देण्याचा यत्न केला पाहिजे; व तो जोर देणें ह्मणजे त्यांनीं वर्तमानपत्रांस द्रव्यद्वारा मदत केली पाहिजे. मागें प्लेग संबंधानें मुंबई इलाख्यांतील रयतेला सरकारी अधिकाऱ्यांपासून काय काय त्रास सहन करावा लागला हें सर्वांना ठाऊकच आहे. कायद्यानें जे जुलूम झाले असतील याबद्दल कायदे करणारे जबाबदार होत, पण दुष्ट कायद्याच्या जुलमा पेक्षां कायद्यांची अमलबारी करणारे जे सरकारी नोकर त्यांचाच जास्त जुलमी कारभार होतो. पण कोणत्याहीं गोष्टी संबंधानें ज्या वेळेस कायदे करणार कांहीं नियम करितात, त्यावेळेस ते नियम एकंदरीनें रयतेच्या सुखा करितां ह्मणून होतात, पण जुलूम जो होतो तो त्या नियमांची अमलबारी करणारांकडूनच विशेष होतो. हा जुलूम बंद करणें केवळ रयतेकडे आहे. खरें बोलण्याचा गुण रयतेमध्यें वाढल्यावांचून व मध्यम वर्ग आणि वरिष्ट वर्ग यांच्यामध्यें उदारबुद्धि आणि खऱ्या देशकल्याणाची इच्छा तीव्र उत्पन्न झाल्यावांचून या दिशेनें राष्ट्राची सुधारणा होणार नाहीं. या सुधारणेपुढें बाकींच्या सुधारणा विशेष महत्वाच्या नाहींत. सुधारलेल्या राष्ट्रांत वर्तमानपत्रांस जी मोठी योग्यता आहे ती याच गोष्टीमुळें आहे. ज्या प्रमाणें एक किंवा अनेक पक्षकारांचा कोर्टांत एखादा वकील असतो त्या प्रमाणें वर्तमानपत्रें हीं सर्व समाजाच्या तर्फे राजाच्या कोर्टांत वकील होत. वकिलांस जसे आपल्या वतीनें भांडण्यासाठीं शेंकडों रुपये द्यावे लागतात, त्या प्रमाणें वर्तमानपत्रकारांसही समाजानें शेंकडों रुपये दिले पाहिजेत. अशा रीतीनें वर्तमानपत्रें हीं जीं लोकांची व राजांची दांडगी शक्तिमत्ता ती चांगली भरभराटीस येईल. व सर्व देशाची नीतिमत्ता कायमची वाढवील.

## वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ४ शके १८२३

कोणतेंहि राज्य आबादानीनें व सुख संपत्तीनें भरून जाण्यास राजा व प्रजा यांचा एक दिल असावा लागतो. राजाला आपल्या प्रजेच्या कल्याणाची अहर्निश चिंता वहावी लागते. व प्रजेसहि आपल्या राजास शरीर सामर्थ्यानें, व संपत्तीबळानें पूर्ण मदत करावी लागते. राष्ट्राची उन्नति व कीर्ति ही साधण्यास राजा व प्रजा यांचा मनोमय ऐक्यभावच परिपूर्ण असला पाहिजे. आपपरतेचें दुष्ट वारें यांच्या अंगास झोंबलें व आपस्वार्थीपणाचें पाणी रक्तांत खेळूं लागलें तर परस्परांत असंतोष वाढून अनर्थ ओढवतील व जो तो आपलाच स्वार्थ साधण्यासाठीं आपली सर्व शक्तिमत्ता खर्ची घालील. अशा रीतीनें तें राज्य कधींहि शक्तिमान् व बलाढ्य होणार नाहीं. याच्या उन्नति वाढीस लागणारीं पोषक द्रव्यें त्यास मिळणार नाहींत. त्या राज्य वृक्षाच्या बुंधांत हजारों किडे उत्पन्न होऊन तें पोखरून निःसत्व होईल, आणि मग एखाद्या लहानशा वायूच्या झुळके सरशी तें कडाडून पडेल व मातीस मिळून जाईल.

हिंदुस्थानची राज्यपद्धती विशेष चमत्कारिक आहे. हिंदुस्थानचें राष्ट्र हें इतर राष्ट्रा प्रमाणें प्रजासत्तात्मक नाहीं किंवा राजसत्तात्मक नाहीं, किंवा येथें ह्या दोन्ही पद्धतींचें संमेलनही नाहीं. तें राज्यसत्तात्मक आहे ह्मणजे ह्या हिंदुस्थानचें राज्य ही प्रजा होय व हिजवर सर्व सत्ता इंग्लंडाच्या राज्याची आहे ह्मणजे इंग्लंडचें राज्य हिंदुस्थानच्या प्रजाजनांचा राजा होय. तशीच दुसरी एक विशेष गोष्ट ही आहे कीं, इतर राष्ट्रांत राजा व प्रजा यांच्या कल्याणाचा सन्मार्ग एकच असतो पण तशी गोष्ट इंग्लंडच्या सत्ते खालील हिंदुस्थानची नाहीं. व तशी असणें शक्यही नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांतील हिंदुस्थान देश हा मोठा विस्तीर्ण, अग्रगण्य, व अति महत्वाचा भाग होय. पण ब्रिटिश साम्राज्याच्या पुष्टीमुळें हिंदुस्थान देश जास्त पुष्ट होत नाहीं. साम्राज्याचें वैभवसुख इंग्रज लोक जसें भोगतात तसें हिंदुस्थानच्या लोकांस भोगण्यास मिळणें दुरापास्त होत आहे. इतर राष्ट्रांमध्यें वैभवसुख, व इतर सुखसंपदा हीं सर्व प्रजाजनांस सारखींच लाभतात, ह्मणजे सर्व संपत्ती व कीर्ति मिळविणारे पुरुष तेच व भोक्ते पुरुषहि तेच. पण हिंदुस्थानचे लोक हे ब्रिटिश साम्राज्याच्या सुखाचे मोठ पुरस्कर्ते ह्मणजे साहित्यसाधनें होत. ह्या सामुग्रीनें इंग्रज लोक हवीं तितकीं सुखें मिळवूं शकतात, व ह्या सुखांत भर घालण्यासाठीं त्यांस निराळीं बलवत्तर साधनें मिळविण्याचा खटाटोप पडत नाहीं. ह्या साम्राज्य सुखाचा उपभोग घेणारे भोक्ते पुरुष फक्त तेच एकटे होत. हिंदुस्थानचे लोक हे भोक्ते नसून उपभोग्य वस्तू. किंवा त्या मिळवून आणण्याचीं शस्त्रें व यंत्रें होत. हिंदुस्थान देश हा आमचा जित व पादाक्रांत केलेला आहे व आह्मी इंग्रज लोक त्यांचे राज्यकर्ते आहोंत असे अंतःकरणास लागणारे बोल जोंपर्यंत आमच्या राज्यकर्त्यांच्या तोंडून निघत आहेत, व त्या बोला प्रमाणें कार्यक्रमही अबाधित चालू आहे तों पर्यंत त्यांच्या व हिंदुस्थानच्या लोकांचा एक जीव झाला हें ह्मणणें निर्फळ आहे. जों पर्यंत असल्या घातुक व अनुदार विचारांचा अफाट व दुस्तर समुद्र दोन राज्यांमध्यें पसारला राहील तों पर्यंत आमचें व हिंदुस्थानच्या प्रजेचें कल्याण व सुख एकच आहे अशा बतावणीची संजुगणी खोटी नाहीं असें कोण

ह्मणेल. इंग्लंड जें राज्य आमच्यावर करितें तें आपणांस वैभवशिखरावर नेऊन ठेवण्यासाठीं नव्हे तर तें आपल्या स्वतांच्या फायद्यासाठीं व सौख्यासाठीं करितें आहे असा आमचा समज होऊं लागला आहे. व असा समज होऊं देणें चांगलें नाहीं. इंग्रज लोक व हिंदुस्थानचे लोक हे एकाच छत्राखालचे प्रजाजन आहेत, त्यांचीं सुखदुःखें एकवटलीं आहेत, व यांचे सर्व हक्क समसमान आहेत हा जो प्रशंसनीय व उत्तम राजमार्ग ह्याचें अवलंबन केलें पाहिजे. आह्मी शहाणे नाहीं आहों व आमच्यांत गुण नाहींत ही गोष्ट खरी, तरी पण आह्मांस शिकवून आपल्या प्रमाणें शहाणे करून सोडण्यास व आपल्या बरोबरीनें आह्मांस वागविण्यास त्यांनीं झटलें पाहिजे, व आह्मीहि ते जें चांगलें सांगतील तें ऐकिलें पाहिजे व लौकर गुणवान् झालें पाहिजे. असा आमचा व इंग्रजांचा मनोमय एकभाव झाला ह्मणजे जी जूट होईल ती साम्राज्याची खरी इभ्रत वाढवील व हें अद्वितिय राज्य काळासहि अजिंक्य असें नांदेल.

महत्वाकांक्षेची अनिवार हाव आणि नवीन राज्यें जिंकण्याची दारुण तृष्णा ह्या दोन महारोगांनीं एखादें राज्य पीडिलें ह्मणजे त्यास स्वस्थता कोठून असणार ? जों जों ही हाव व तृष्णा तृप्त करण्यास झटावें तों तों ती दुप्पट जोरानेंच वाढते. ही राज्यतृष्णेची हाव कधींहि आपोआप सरावयाची नाहीं. ह्यास राष्ट्रानेंच योग्यकाळीं आळा घातला पाहिजे, नाहींतर हिच्या पायीं महान् महान् बलवत्तर राष्ट्रें क्षणार्धांत धुळीस मिळून जातात. हा बुद्धिवाद ह्या त्या राष्ट्राच्या हितचिंतकांस उमजत नाहीं असें नाहीं पण ह्या जळव्यांत राष्ट्र गुरफटून गेलें ह्मणजे त्या पेंचातून पार पडणें सहसा संभवत नाहीं. ज्या प्रमाणें पाप वासनांचा पूर्ण अंमल होऊन यांची धुंदी चढल्यावर त्या वासना दूर करणें असंभवनीय, तद्वतच ह्या राज्यमदाची धुंदी कोणत्याहि मात्रेनें उतरूं शकत नाहीं. बुडत्याचा पाय खोलांत ह्या प्रमाणें जें राष्ट्र आपलें सर्व पृथ्वी तळावर साम्राज्य गाजविण्याचा अखंड उद्योग आरंभितें त्याच्या हातून तें कार्य यशस्वी होत नाहींच पण उलट तोच अखंड उद्योग त्यास खोल खोल पाण्यांत ओढून एकदम सपशेल बुडविण्याच्या कामी सहाय्यभूत होतो. अशी ही दुष्ट राज्यतृष्णा युरोपस्थ राष्ट्रांना अलीकडे फार लागली आहे व ह्याचा प्रतिकार झाला नाहीं तर यूरोपमध्यें चांगलीच क्रान्ति झाल्याखेरीज रहाणार नाहीं. प्रस्तुत पश्चिमेचीं राष्ट्रें पूर्वेकडील राष्ट्रांची पायमल्ली करीत आहेत पण हा काल पालटून उलट क्रियाही चालूं होण्यास विद्यमान गोष्टीच कारणीभूत होतील. नवीन राज्य जिंकणें हें कार्य दुस्तर आहे व जो पराक्रमी व सत्ताधीश आहे तो तें मिळवीलहि. पण मिळविलेलें राज्य रक्षण करणें हें महत्कृत्य फारच दुस्तर होय. खरें राज्यकर्तृत्व ह्या गोष्टीमुळें चांगलें कसोटीस लागतें. प्रजेच्या हिताहिताच्या गोष्टीकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे व प्रजा नेहमीं खुषी व आनंदी ठेवण्यासाठीं तिजबद्दल जीवापाड श्रम केले पाहिजेत. पण ह्या गोष्टी करण्याची सद्भावना असूनहि तद्वस्तुप्राप्तीसाठीं जो मार्ग तो सोडून दिला तर त्या सद्हेतूचें चीज होत नाहीं. आमच्या राज्यकर्त्या इंग्रज लोकांची हीच गोष्ट होय. इंग्लंड व हिंदुस्थान हीं सख्खी जुळीं भावंडें आहेत पण तीं सावत्र भावंडाप्रमाणें वागविलीं जातात. हिंदुस्थानची जिवाला पीळ देऊन जितकी कळकळ घेतली पाहिजे तितकी मुळींच घेतली जात नाहीं. ह्या भाऊबंदकीपणामुळें वितुष्ट वाढून फाटाफूट होईल व असें होणें दोघांसहि इष्ट नाहीं. ह्या दोघांनीं एकत्र राहून गोड गोळीनें सुखसमृद्धी होईल असें राज्यशकट चालविलें पाहिजे. ही गोष्ट होण्यास एकच साधन आहे तें हें कीं इंग्रज बहादुरांनीं आपला अहंभाव सोडावा व आह्मांस बरोबरीनें वागवून राज्यतृष्णा थोडी कमी करावी. ट्रान्सव्हाल व चीन येथील लढाया पासून योग्य तो बोध नेतृपक्षीय राष्ट्रांनीं अगदीं वेळेवर घ्यावा आणि समाधानाची व संतोषाची वृत्ती ठेवण्याची काळजी घ्यावी असें आह्मांस वाटतें.

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 16, 1901

Indebtedness is the curse of the Indian peasantry. It is a source of great anxiety and presents a most difficult problem of national importance. Momentous issues are involved in the proper solution of this vexed question and our future possibilities either for good or for bad will take a determinate course in the right understanding of the present events. Indebtedness has reached a growth as old as the British rule in India. It has become a moral canker and has eaten up into the vitals of all progress and prosperity. The danger is of a long date and has got the accumulative force of changing the course of our social evolution. The old grades in the Indian society have given place to new types of people. The foreign rule, brought on a change in the political relations of the people towards the Government. There is a rapid development in the commercial and industrial life of the nation; but the new activity is suicidal in so far as it kills the energy for progress and reform in every direction. The wealth of India is drained away to her further impoverishment. The highest privilege of wealth is the service of the nation. Our wealth has no living force therein. It fails to stimulate the life—pulse of the nation by enlarging the bounds of knowledge, fostering the love of freedom or filling the national mind with generous emotions which pave the way for national regeneration. Our country is the mere store—room of valuable acquisitions for that Imperial nation. The social degradation of our agricultural people is a serious danger. They alone form the biggest part of the Indian nation. Some people in the society might be the chosen few of the Government but they cannot hope to make up a nation. The downfall of the peasantry is the downfall of the whole nation. The new and the largest platform of our society is full of poverty of unlimited expansion. Poverty has moulded our present course of life and activity and in the race and struggle for bread our people cannot hope to stand a fair chance of survival.

The probability of our rise as one people is a matter of hard calculation. The Government evince a warm sympathy in our affairs and make great efforts to reconstruct our society on a new foundation. The experience of a three—fourths of a century fails to serve them as a guide and they hit upon legislation to remedy the evils of indebtedness. Legislation is considered at present to be the sole panecia for indebtedness. The new hall—mark of a legislative council will make changes in the tenure of land and will no doubt stamp out the peasants' unwisdom of free alienation of land but even then we confess our inability to understand how this legislative nostrum will wipe off the existing debts and will afford a hope for future amelioration. To our mind the Government have taken a wrong step. The examples of the Punjab and the Bombay—presidency will not remain without a companion. We are told that there is a minute and careful inquiry in this connection. It is a pleasure that the Government are awakened to their responsibilities but we hope that hot haste will not be the rule of our local Government.

In the light of the experiences of the last famines we would request our Government to gauge the real condition of the people. The unbroken and continuous prosperity of more than half a century is but a delusion. The solid fact of prosperity has no existence. With a prosperous people, the events would not have been what they were. The sorry spectacle of one fifth population at famine camps belies all hopes and arguments of prosperity. The facts are patent to all. There is no staying power in the people. Nor there is any wonderful recuperative power. People cannot hope to return to prosperous times even if there be one, two or three good and successive seasons of bumper crops. The phenomena of a rapid and sudden prosperity should suggest that the experiences of the famines should be interpreted with a greater insight into the real condition of the people. Let us hope that the lessons are not lost upon the Government.

## वऱ्हाड

हवामान— उष्मा विशेष होतो. पाऊस लवकरच आपली अमृताची वृष्टी करील असा रंग दिसतो. रोगराई नवीन कांहीं नाहीं. ताप, खोकला, वगैरे किरकोळ आजाराला लोकही कांहीं जुमानीत नाहींत. सर्वत्र पिकें कल्पनेनें जितकीं सुरेख वाटतात तितकीं तीं नाहींत.

उमरावतीच्या व आकोल्याच्या युरोपियन मंडळीमध्यें गेल्या शुक्रवारीं क्रिकेटचा सामना झाला. दोन्ही पक्षाचे खेळगडी चांगले सफाईनें खेळले. सरशीची गोष्ट अनिश्चित राहिली.

गायनाच्या कांहीं चिजा आकोल्याच्या व उमरावतीच्या युरोपियन मंडळींनीं पियानोच्या पेटीवर ह्मणून दाखविल्या. हा छोटासा प्रयोग नाटकी धर्तीवर झाला. टिकिटेंही लावण्यांत आलीं होतीं. हा खेळ गेल्या गुरुवारीं रात्रीं इंग्लिश क्लबांत झाला. करमणुकीला हा मार्ग फार चांगला.

देऊळगांव राजाचा एक ३० वर्षें वयाचा वाणी आपल्या भावा बरोबर भांडून बाळापुरास सासऱ्याच्या घरीं आला होता. तो गेल्या पोळ्याच्या दिवशीं बैलाला घेऊन मनन्दीच्या डोहांत पोहत असतां तळाशीं बुडून मरण पावला. तो चोवीस तास पाण्यांत होता तरी तो फुगला नाहीं. हा एक विशेष प्रकार दृष्टीस पडला.

रा. रा. हरीहर काशिनाथ पाटील हे वाशिमास कलेक्टरचें काम करीत होते. रेल्वेकडे घेतलेल्या जमिनीच्या किंमती ठरविणें व इतर तत्संबंधीं कामें करणें वगैरे गोष्टी त्यांच्याकडे सोंपविल्या होत्या, तें काम आटोपून ते परत उमरावतीस गेल्या शनिवारीं दाखल झाले. यांच्या हक्का संबंधानें योग्य विचार होऊन जुडिशिअल कमिशनरच्या क्लार्क आफ कोर्टा पेक्षां मोठ्या हुद्दयावर त्यांची योजना होईल अशी आह्मांस मोठी आशा आहे.

काल सायंकाळीं रा० रा० विनायक बळवंत बापट यांनीं व्याख्यान मालेंतील आठवें व्याख्यान वांचलें. आमच्यांतील जातिभेद व विवाह संस्कार हे आमच्या प्रगतीस विघातक आहेत काय ? हा व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थान रा० रा० दत्तात्रय त्रिंबक भावे यांनीं सुशोभित केलें होतें. वाचन चांगलें झालें.

## नोटीस

रा. रा. गुलाबराय गोविंदराम या नांवचें दुकान मालक सुरजमल गोविंदराम रहणार अकोला.— यांस.

नोटीस देणार कमुबेगम भर्द शेख मनु जाहागीरदार रहाणार वणी हल्लीं रहणार अकोलें ताजनापेठ इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आह्मी तुह्मास तारीख २५।११ सन १८९९ इ० रोजीं गहाणाचा दस्तैवज करून दिला आहे. सदर्हू गहाणखतांत व्याज दरमहा दरशेकडा एक रुपया प्रमाणे देण्याचें कबूल केलें आहे. सदर्हू गहाणाची रकम मुद्दल व व्याज असें आह्मी देण्यास तयार आहों. सदर्हू गहाणाच्या रकमेचें व्याज तारीख २५।११।१८९९ इ० पासून तारीख १६।९।१९०१ इ० पावेतों महिने ६९ दिवस २० चे दरमहा दरशेकडा एक रुपया प्रमाणें आकार रुपये ३८३॥८ होत आहे व देन रुपये ९५० असे एकून रकम रुपयें ९३३८= होतात ते रुपये आह्मी रा. रा. बालचंद बनसीलाल साहू दुकान आकोलें याचे येथें आपणास देण्याकरितां ठेविले आहेत ते आपण घेऊन त्यांना आजबद्दल पावती द्यावी व आह्मास आमचा गहाणाचा दस्तऐवज परत द्यावा. असें न केल्यास त्या तारखे नंतर आह्मी कांहीं व्याज देणार नाहीं. व कोर्टांत आपण फिर्याद केल्यास त्याचा खर्चही आह्मी देणार नाहीं. उलटें आमचा खर्च आह्मी तुह्मापासून भरून घेऊं तारीख १६।९।१९०१ इसवी.

सही

कमुबेगम मर्द शेख मनु जहागीरदार निशाणी खुद्द हातची बांगडी असे.

दस्तुर गोविंद लक्ष्मण.

## चिटणीस जयवंत प्रकरणाची समाप्ति ! !

( एका विश्वसनीय मित्राकडुन )

या मथळ्या खालीं आपण 'काळ' पुणे ( ता० २३-८-०१ ) यांत 'मित्रांचें' पत्र वाचलेंच असेल. आमचा असा समज आहे कीं, रंगराव यांचे जे सर्व लेख, काळ, देशसेवक, प्रमोदसिंधु, इंडियन सोशल रिफॉरमर वगैरे पत्रांत प्रसिद्ध झाले त्यांत मुख्य मुद्दा—चिटणीस दाखवितात, व ज्या बऱ्या सुधारकांचे दोषावर पांघरूण घालूं इच्छितात अशा सुधारकास ते दिसतात, तितके सरळ, प्रामाणिक, अचल आहेत कीं काय हाच होता. होय ना? तर मग आपल्यास योग्य, न्याय्य व सरळपणाचें वाटल्यास हें सर्व प्रसिद्ध व्हावें; प्रसिद्ध झाल्यास कृपाकरून अंक यावा. त्यांत आपण आपला अभिप्राय निर्भिडपणें द्यावा. केवळ दोन्ही बाजू पूर्णपणें न कळल्यामुळें आपण जयंतास तारीख १३ मेचे अंकांत दोष दिला असावा असें वाटतें. तरी खात्री होण्याकरितां कृपाकरून ( ता. २२ फेब्रुवारी, ता. १२ एप्रिल व २३ आगष्ट या तारखेचे काळाचे अंक; खुद्द जयवंताचा चिटणीस मंडनार्थ आलेला पत्र व्यवहार ज्यांत आहे तोच तारीख ११-२-०१ चा, सुधारककारांनें जयवंतासच दोष दिलेला अंक; पुढें १—४—०१ चा सुधारक ) हीं पत्रें वाचुन न्याय द्दष्या योग्य दिसल्यास लोकभ्रमाचें निरसन करावें. आमचेवर विश्वास असेल असें वाटून तर आह्मी हें लिहिलेंच आहे; परंतु 'चिटणीस यांनीं दाखवावा तितका सरळपणा दाखविला नाहीं;' असें कबूल करून यापूर्वीं चिटणीसांचें मंडन करणारे वैदर्भकारहि आतां ( वैदर्भ तारीख २६-८-०१ पहा ) 'बऱ्याच दिलगिरीच्या गोष्टी नजरेस येतात' असें ह्मणत आहेत हेंहि पुष्टिकरणार्थ पहावें. आमचे मतें चिटणीसांचें वर्तन फारच घरसोडीचें दोन्हीं पक्षांस खूष ठेवण्याचा यत्न करण्यासारखें पण सुधारक या नामानें अमंत निंद्य आहे. मग आपलें मत काय असेल तें असो. चिटणीसांचें इतर वर्तन, मित्र या नात्यानें होणारी वागणूक, त्यांचा स्वभाव हीं किती हि उदाहरण घेण्यालायक असलीं तरी सुधारकद्दष्ट्या ते घसरले नाहींत असें ह्मणणें एक तर निव्वळ हट्ट, वा मित्रपक्षपात अगर भाबडेपणाचा अतिरेक किंवा सुधारकांचे दोष लपविण्याचा आग्रह अथवा समोंवार समाजमान्यता व कांहीं गुण हीं असलीं ह्मणजे दोषाकडे साहजिक दुर्लक्ष करण्याचा परिपाठ असला पाहिजे. निदान कदाचित प्रथम वाद सुरू झाला तेव्हां समाजमान्यतेमुच सुधारककारा प्रमाणें कित्येक भाळले असले तरी आतां मात्र दोन्ही पक्षांतील सरळ लोकांस चिटणीस अचल नाहींत हें कबूल करणें भाग आहे कीं नाहीं ? कोणतीहि अट न घालतां पुनर्विवाहिताशीं अन्नव्यवहार शरीरसंबंध ठेवूं ह्मणून १८९४ सालीं सही देणारे, १८९७ सालीं आह्मी असें असें विनंतिपत्र १८९४ सालीं काढलें ह्मणून प्रसिद्ध करून पुनर्विवाहितांशीं पंक्तिव्यवहार केला असें लांबलचक लेखानें सुधारकांचे वाचकांस कळविणारे, इतरांसहि तसें करा ह्मणून विनंतीपूर्वक, आग्रहपूर्वक प्रार्थना करणारे ( पुनर्विवाह होतांच ) चिटणीस— इतकेंच काय परंतु, रंगराव खंबीर सुधारकत्वाचा बिल्ला देत नाहींत ह्मणून वैदर्भकारांचे शंका निरसनार्थ ( वैदर्भ २९-४-०१ पहा ) पुनर्विवाहित जयवंताकडे जेवणारे बडे सुधारक, १९०१ चे मे मध्येंच एका महिन्याचे आंत आपला सर्व बाणा टाकून 'भाद्रपदांत पितृपक्षांत विवाह केल्याबद्दल जयवंत प्रायश्चित घेण्यास तयार नाहींत ( प्रत्यक्ष जयवंतास कांहीं एक न विचारतां गृहित धरूनच ) सबब या पुढें मी त्यांच्याशीं पंक्तिव्यवहार करणार नाहीं' असा लेख ज्या ठरावाशीं यांचा कांहीं एक संबंध नाहीं त्यांत ज्ञाति बांधवास खूष करणाऱ्या करितां लिहून देतात, तरीहि आपण व सुधारककार इत्यादि कांनीं जयवंतासच दोष द्यावा हें नवल आहे. निदान गैरसमज खास असला पाहिजे. नाहीं पेक्षां निःपक्षपात द्दष्ट्या मत देणें हेंच ज्यांचें पवित्र कर्तव्य; समाजहिताची उत्कट इच्छा हाच ज्यांचा परमानंद; अचलवृत्ति सरळपणा, सत्यप्रेम, नीतिभक्ति आणि समाजोन्नतिप्रेम यांची स्फूर्ती करणें हाच ज्यांचा धर्म तो संपादक वर्गहि 'बडेराव' मंडळीचें येन केन मंडन करण्यात प्रवृत्त होतो असें वाटण्यास साहजिक जागा रहाते. तशांत वऱ्हाडसमाचारकार यांस पुनर्विवाहित जयवंतांची पूर्ण माहिती—इतकेंच काय परंतु इतरांच्या कोणत्याहि छळास जयवंत डगमगले नाहींत तरी आले 'जयवंत हे उमरावतीच्या सुधारकांत मोडतात कांकीं, त्यांच्या हातून एक गाळांत फसलेली गाय संसारसुखाला लागली आइ वगैरे' शब्द त्यांस अत्यंत वाईट वाटण्यास कारणभूत होतील असें सहज कळण्या सारखें असूनहि त्यांनीं निराधार वा गैरसमजानें दोष दिला ही खेदाची गोष्ट आहे. झालें तें गेलें परंतु आतां तरी वऱ्हाडसमाचारकर्ते, सुधारककार यांनीं सरळपणाचें उदाहरण जनतेस घालून देणें योग्य नव्हे काय ? जयवंतास दोष देणारांस आह्मी इतकेंच विचारतों कीं, ज्यांनीं कै. आगरकरांचे वेळीं १८९०-९१ पासून आजपर्यंत आपल्या वचना प्रमाणें लेखा प्रमाणें वर्तन केलें त्यांस आपण दोषी ठरवतां व तीन वर्षांत तीन रंग करणाऱ्या सुधारकांस निर्दोष समजतां हें कोणतें न्यायशास्त्र ह्मणावयाचें ? जयवंतांचीं मतें चुकीचीं असतील परंतु तीं बरोबर वाटत आहेत तों पर्यंत, इतरांस स्वतांचे मतानुरूप वागण्यास हक्क आहेत तसेंच त्यांस नाहींत कीं काय ? तशांत वर सांगितलेलीं अनेक पवित्र कर्तव्यें करावयाचें ज्याचें काम त्याच संपादक वर्गानीं लोकछळ, महत्त्वाकांक्षा, कीर्ति यांची परवा न करितां सरळपणें वागावयाचें जयवंतास प्रोत्साहन द्यावयाचें कीं, ते जनतेच्या मार्गानें जावयास तयार नाहींत ह्मणून चिटणीसा सारख्या कमजोर सुधारकांचे पोवाडे गाऊन जयवंतास खालीं ओढण्याचा वा 'लोकांसहि बेमालूम होणारा कारभार मानवतो' असें लिहून जनोस पॉलिसी शिकवण्याचा यत्न करावयाचा तें आपणच पहा. पुरे. या खेपेस तरी मनाची समता आहे असें द्दष्टीस पडेल अशी आशा आहे. लोभ असावा. तारीख २८-८-०१

## वर्तमानसार

लढाई— बोअर लोकांनीं जें कार्य आरंभिलें आहे तें नेटानें व चिकाटीनें सुरू आहे. त्यांनीं जो सरळ मार्ग धरला आहे तो एकसारखा ते चालत आहेत व त्या चालींत तिळप्रायाहि फरक पडलेला नाहीं. स्वदेश मुक्तीसाठीं जेवढें ह्मणून शक्य आहे तेवढें करून सोडल्या शिवाय ते स्वस्थ होणार नाहींत. स्वातंत्र्य मिळेपर्यंत त्यांची मजल चालूच राहील. ही अप्रतीम स्वराज्य निष्ठा, हा कार्यक्रमाचा कठीण धडा, व हें अत्यूत्तम कोटींतलें आत्मसंयमन हीं सर्वांनीं शिकण्या सारखीं आहेत.

इंग्रजांनीही यांस हतवीर्य केल्या खेरीज लढाई बंद करण्याची नाहीं असाच कायमचा निश्चय केल्या सारखा दिसतो. ह्या मित्र प्रतिज्ञा व कृष्ण प्रतिज्ञांमध्यें कोणची तडीस जाईल हें सांगणें कठीण आहे. नंगेकू खुदाकी डरता है. ह्मणून नंग्या बोअर लोकांची इंग्रजांस जास्त भीति आहे. इंग्रजांनीं आपला अभिमान सोडून त्यास आपण होऊन स्वातंत्र्यपदारूढ केलें तर इंग्रजांची थोरवी विशेषच वाढणार आहे. पण पण मोठा चमत्कारीक आहे.

अहमदनगर येथील कांहीं बोअर कैद्यांनीं अधिकाऱ्याकडे अर्ज केला कीं, आह्मांस बंधमुक्त करून स्वदेशीं न्याल तर बोअर लोकांची सर्व गुप्त धनधान्य व दारूगोळा वगैरे सर्व सामुग्री तुह्मांस दाखवून देऊं व त्यांस जिंकून पादाक्रान्त करण्याची गुरुकिल्ली दाखवूं. दुसरे दिवशीं ह्या हरामखोर बुद्धीबद्दल त्या बोअर लोकांना चवदावें रत्नाचे चांगलेंच बक्षीस मिळालें ह्मणतात. शत्रूस भुरळ घालून आपला कार्यभाग उरकण्यासाठीं अशा गोड गोड लबाडींच्या गोष्टी ते सांगतील. पण स्वदेशद्रोहाचें नीच कृत्य त्यांच्या हातून कदापिहि होणार नाहीं.

शाबास बहादर— हलक्या सालक्या क्रिकेट खेळण्यांत सुद्धां बोअर लोक इंग्रजास हार जात नाहींत. ह्या खेळांमध्यें जर ते इंग्रजांस हटवितात तर लढाईच्या खेळांत ते त्यांस जुमानत नसतील हें खचित. शूर ते शूरच. हिरा कोठेंहि पडला तरी त्याचें अंगभूत तेज झांकणार कोठून ?

चीनचा वकील प्रिन्सचन याची व जर्मन बादशहाची मुलाखत होऊन मागील सर्व अपराधावर पांघरूण घालण्यांत आलें. चीननें आपली लवकरच सुधारणा केली पाहिजे.

पाऊस पाणी—नगर जिल्ह्यांत पावसाची फारच जरूरी आहे. ७-८ दिवसांच्या आंत मेघराजानें कृपा केली नाहीं तर दुष्ट काळाचें साम्राज्य लवकरच जारीनें सुरू होईल अशी चिंता लागली आहे. सोलापूरकडे खरीपाचीं पिकें सुकत आहेत. तोंडाशी आलेला घास जातो कीं काय ह्मणून लोक काळजींत आहेत.

इतर पुष्कळ ठिकाणीं पाऊस बेतावर पडला. व उघडीकही बेतावर झाली. आतां पुन्हां सर्वत्र पाऊस ४ ८ दिवसांत यावा अशीं सुचिन्हें दिसताहेत. यापुढें ईश्वर करील तें खरें.

अंगुष्ठ चिन्हाची पद्धती—बदमाष अपराधी लोक ओळखण्यासाठीं पूर्वी त्यांच्या शरीर ठेवणीचें मोजमाप घेत असत. पण ही पद्धति जितकी खात्रीची व निर्दोषी पाहिजे तितकी नव्हती. पुढें अंगुष्ठचिन्हाची पद्धति सुरू झाली. अंगुष्ठचिन्हें कोणाहि दोन मनुष्याचीं सारखीं आढळून येत नाहींत. ही गोष्ट जरा चमत्कारिक व अविश्वसनीय अशी भासते, पण अनुभवांतीं हें खरें आहे असेंच सिद्ध होतें. ह्या शोधामुळें पोलिस लोकांना हाच मनुष्य पूर्वीचा अपराधी होय असें खात्रीनें सांगतां येतें. याचें एक चमत्कारिक उदाहरण परवां हैदराबादेकडे घडलें, एका अपराधी मनुष्याचें अंगुष्ठचिन्ह घेऊन त्यास जामिनावर पुष्कळ दिवस सोडलें होतें. पुढें त्याच्या चौकशीच्या वेळीं पुन्हां अंगुष्ठचिन्ह घेऊन चौकशी सुरू झाली व त्यास शिक्षा दिली. पण पूर्वीचा अपराधी हा नव्हे, हा दुसरा कोणी तरी आहे; कारण अंगुष्ठचिन्हांत फरक आहे असें पोलिसाच्या आफिसांतून लिहून आलें. ह्मणून पुन्हां तपास करितां एका अपराध्याबद्दल दुसराच कोणी पैशाचे लोभानें उभा राहिला आहे असें आढळलें. हजारों अंगुष्ठचिन्हांमधून एका विशिष्ट व्यक्तीचें अंगुष्ठचिन्ह तावडतोब ओळखून काढतां येतें. ह्या पद्धतीमुळें पोलीस कारवाईस चांगली मदत होते यांत शंका नाहीं.

इंग्लंडमध्यें प्रेतें जाळण्याचा प्रकार पुष्कळ सुरू झाला आहे. शास्त्रीय द्दष्ट्या असें करणें चांगलें आहे.

मारिहूं कै० डाक्टर विश्राम रामजी घोले ह्यांच्या स्मारका प्रीत्यर्थ पुण्यास सभा भरून एक हजारावर रुपये जमले आहेत.

म्हैसूरचे माजी दिवाण बहादूर सरशेषाद्रि आय्यर ह्यांस त्यांच्या उत्तम दिवाणगिरीबद्दल ४ लक्ष रुपये बक्षीस दिले. कोरड्या पदवी पेक्षां ही देणगी बरी नव्हे काय ?

---

नोटीस

रा० रा० बाळकृष्ण कस्तुरचंद राठी मुक्काम लाषगांव यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी व आह्मी मिळून शराकतींमध्यें यवतमाळास कापसाची खेरदी गेल्या दुष्काळाच्या वर्षी केली. त्या व्यवहारांत अखेरीला हिशोब पुरा करितांना ३०० रुपयांची नुकसानी आली. त्या नुकसानीचा तुमच्याकडील चौथा हिस्सा रुपये ७५ चा आहे. त्याची मागणी पुष्कळ वेळां केली पण तुह्मी आज उद्यां करीत आला. या नोटिशीनें तुह्मास मी आठ दिवसांची मुदत दिली आहे. या मुदतींत सदहू रकमेचा उलगडा तुह्मी केला नाहीं तर कोर्टांत फिर्याद करून नोटिशीच्या व इतर खर्चासुद्धां तुह्माकडून नुकसानी वसूल करण्यांत येईल. कळावें. तारीख १४ सप्टेंबर १९०१ इसवी.

सही (मारवाडींत)
बिहारीलाल सुगालचंद
दस्तुर खुद्द.

---

( पुरवणी पहा )

REGSTERED N. No. 4

सहामाही „ २ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ८६
दुसरे खेपेस .... .......८१

Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy .......................... 4 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

VOL XXXV AKOLA MONDAY 23 SEPTEMBER 1901 NO 37

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २३ माहे सप्टेंबर सन १९०१ इ० अंक ३७

## आपली दुःस्थिती

आपला मुलगा शिकून सवरून मोठा पदवीधर व्हावा, पुढें तो मोठ्या हुद्यावर चढावा, व तो समाजांतील महत्वाच्या कामांत पुढारी असून त्याचा चांगला नांव लौकिक व्हावा, असें सर्वकाळीं प्रत्येक मुलाच्या आई बापांस वाटत असतें. व त्या प्रमाणें ह्यांची हिंमतही पण असते. परंतु आलीकडे आपल्या इकडे पाहावें तों मुलगा थोडासा शहाणा, किंचित् समजदार. आणि थोडा बहुत कमावता झाला ह्मणजे ठीक झालें, आपल्या वरली मोठीच जबाबदारी आपण बजाविली असें बहुतेक मातापितरांस वाटूं लागलें आहे. मुलांविषयीं त्यांचें ठिकाणीं फारच उदासीनता उत्पन्न झालेली दिसतें मुलगा शिकून चांगला तरबेज झाला, आणि मोठ्या रोजगारावर लागला ह्मणजे मग आपण आपल्या ह्मातारपणा बद्दल बेफिकीर झालों अशा आशेनें मुलाचें संगोपान करणाऱ्या आईबापांपेक्षां, ज्या अर्थी आपण मुलाचें जन्मदाते झालों आणि पालकत्वाचें नातें आपणांकडे आलें त्या अर्थी ह्याला खाण्या पिण्यास घालून विद्यादान द्यावयाचें आणि तो वयांत येऊन आपल्या स्वतःच्या व आपल्या बायकोच्या पोटापुरतें कमाण्याची त्याचे अंगीं कुवत आली ह्मणजे आपण आपलें कर्तव्यकर्म बजावलें व मुलाच्या ऋणांतून आपण मुक्त झालों असें समजणाऱ्या आई बापांचीच संख्या आज मितीस जास्त भरेल.

परंतु वडिलांच्या ह्या उदासीनते बद्दल वडील माणसाना दोष देतां येत नाहीं. मुलांची अशी नाउमेद स्थिती झाल्याबद्दल मुलांवरही ह्याबद्दल दोषारोप करतां येत नाहीं— असें कांहीं विलक्षण कुलंगडें होऊन त्याचा संबंध तिसरी कडेस जाऊं पहात आहे. दिवसानुदिवस आपल्या हिंदुस्थानच्या स्थितींत फरक पडत पडत ज्या दिवसांची आपणांस कांहीं माहिती मिळते त्या सर्व दिवसांपेक्षां आपली सांप्रतची स्थिती बरीच निकृष्ठ अशी झाली आहे आणि ह्याहूनही ती जास्त निकृष्ठ होणार ह्याबद्दल आजच्या स्थितींतील लक्षणें खात्री देत आहेत.

वृद्ध माणसें आणि पोक्त वयाचे जवळ जवळचे पुरुष ही गोष्ट अगदीं प्रांजळपणें कबूल करतात कीं, त्यांना जे कांहीं थोडे सुखाचे आणि अमदानीचे दिवस होते ते आपल्या मुलांबाळांनां मिळाले नाहींत व पुढें मिळणारही पण नाहींत. आपल्या वडिलांच्या वेळेस जी स्थिती होती ती आज नाहीं व ह्याहूनही निकृष्ठ स्थिती पुढें ओढवणार आहे अशी आह्मां तरुणांची बालंबाल खात्री होत आहे.

कांहीं थोड्या वर्षांमागें राष्ट्राभिमानी आणि खरे राष्ट्रहितचिंतक कै० वा० रा. विष्णुपंत चिपळूणकर यांनीं लोक हितवादी ग्रंथावर आपला अभिप्राय देतांना त्यांच्या वेळेस आपल्या हिंदुस्थानची स्थिती जशी त्यांना दिसली तशी त्यांनीं आपणापुढें मांडून ठेविली आहे.

हा देश ( हिंदुस्थान ) अगदीं खराबीला येऊन पोहचला आहे. लोकांस आठरा विश्वे दारिद्र्यानें गाठलें असून खाण्याची सुद्धां दिवसें दिवस भ्रांत होऊं लागली आहे. कोणत्या व्यापारांत ह्मणून तेजी राहिली नाहीं. घरोंदारीं विलायत भरली आहे. सरकारी देण्यानें तर लोकांस अगदीं टेकीला आणून वरचेवर नव्या बाबी निघतच आहेत. लोकांतला वकूब पाहिला तर कोणाच्या अंगीं हिंमत नाहीं. जो तो आपल्या पुरते पाहणारा, दुसऱ्याचें पागोटें माझ्या हातीं कसें येईल, वरिष्ट अधिकाऱ्याकडे चुगली करून दुसऱ्यास पेचांत कसा आणीन, पुढें पुढें शेपूट हालवून व बुटाचे पवित्र प्रहार सोसून खुशामत कशी करीन या विचारांत बहुतेक मंडळी निमग्न. शिपाईगिरी लोकांत किती राहिली आहे, ह्मणाल तर शस्त्रास्त्रांचीं चित्रें पुस्तकांतून पहावीं, व त्यांचे प्रयोग इतिहासांत वाचावे. नुसत्या शारीर सामर्थ्याकडे पाहावें तर दरपिढीला आंत आंत पाय येत असून लवकरच हरबऱ्याच्या झाडाला शिडी लावण्याची पाळी येते कीं, काय कोण जाणें असें वाटतें! जुन्या विद्या, जुन्या कला ह्या तर नाहींशा होत चालल्या आहेत. त्यांच्या जागीं नव्या येत चालल्या आहेत ह्मणावें तर तेंही नाहीं. या खेरीज दुष्काळ महामारी वगैरे हळू हळू येथें निरंतरचें बिऱ्हाड करूं पाहत आहेत असेंही दिसतें. एकंदरींत हल्लींच्या काळाला या देशाची स्थिती मोठी भयंकर झाली आहे यांत बिलकूल संशय नाहीं.

वरील स्थिती वाचून तिच्याशीं आजच्या स्थितीची तुलना करूं लागल्यास आपणास कांहीं चांगल्या गोष्टींत फरक झालेला न दिसून उलट कांहीं विपरीतच परिणाम होत चालला आहे असें विचारांतीं कळून येईल. राष्ट्रोन्नतीकरितां ज्या सुधारणांची अगदीं अवश्यकताच आहे त्यासंबंधीं तर कांहींच उचल होत नाहीं मग फाजील सुधारणांचेंच बंड माजून दिवसानुदिवस शाश्वत निकृष्टावस्थेप्रत नेणाऱ्या कांहीं अवगुणांचेंच बीजारोपण आपलें अंगीं झालेलें दिसून येईल. कांहीं मंडळीं तर सद्यस्थितीला जणु आंधळे होऊन स्वतःस पिंड ॲंड को असें नामाभिधान करून "शाल्योदन मिष्टान्न भोगतां, सव्वाशेर ज्याचा सवता, चोवीस वर्षे चैन भोगितां, राज्य क्रान्ति जाणून नव्हता" ह्या प्रमाणें कविवर्य आनंद फंदींनीं वर्णन केलेल्या राव बाजींचें वर्तन क्रमाचें अनुकरण करण्यांत वरचढपणा मिळवीत आहेत.

विष्णुपंत शास्त्री आज जर हयातींत असते, तर ह्या वरील स्थितींत आपल्या विषयीं आणखी पांच पंचवीस बाबी त्यांनीं घातल्या असत्या. त्या जहांमर्द पुरुषाला आपली स्थिती पुढें सुधारेल, हीच निकृष्टावस्था आपले ठिकाणीं कायमची राहणार नाहीं अशी जी त्यांची आशा होती ती मावळून जाऊन त्यावेळची त्यांची आशा आजच्या निराशेंत लीन झाली असती. त्यावेळीं तरी ह्यानां अशीं कोणतीं शुभ चिन्हें दिसलीं कोण जाणे कीं ज्यांचे आधारें त्यांनीं खालील विधानें ठोकून दिलीं.

जसा एखादा प्रवाह लव्हाळ्यांनीं चोहोंकडून आच्छादून टाकला असल्यामुळें दृष्टिगोचर होत नसतो, व तो आटून गेला कीं काय असा भास होतो, किंवा एखादा जबरदस्त घाव लागल्यानें चांगला सशक्त मनुष्यही जसा कांहीं वेळ निचेष्ट होऊन पडतो, तशी वस्तुतः पाहतां आज आमच्या देशाची स्थिती जाहली आहे. पूर्वीं कधींही पडली नव्हती अशी परकी अमलाची जबरदस्त भगरमिठी ह्यावर एका एकी येऊन पडल्यामुळें त्याची हालचाल अगदीं बंद झाल्या सारखी वाह्यतः दिसते खरी व इतक्या दिवसांची निचेष्टतेनें त्याच्यावर पुष्कळ ग्लानि आली आहे, हेंही खरें तरी एकंदरीनें पाहतां आंतल्या शरीर प्रकृतीस कांहीं धक्का पोहचला आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

ह्या प्रमाणें त्यांनीं आपली कांहीं अशीं खरी स्थिती आपणास दाखवून देऊन आपल्या देशास शाश्वत निकृष्टावस्थेप्रत पोंहचलेल्या मिसर, इराण, ग्रीस, इटाली इत्यादि हतभागी देशाच्या मालिकेंत न गोवता कांहीं थोडे दिवसा करितांच आपणास ही दशा आली आहे असें त्यांनीं आपल्या मनाचें सांत्वन करून घेऊन आगंतुक अथवा नैमित्तिक निकृष्ठावस्थेप्रत पोंहचलेल्या देशांचे सदरांत घालून कांहीं दिवसांनीं तरी आपला भाग्योदय निःसंशय झालाच पाहिजे अशा आशापाशांत त्यांनीं आपणा सर्वांना गुंतवून टाकलें.

वास्तवीक वस्तुस्थितींत फरक पडलेल्या ज्या कांहीं अनेक बाबी आहेत ह्यातील सर्वांत मुख्य, सर्वांस अति उपयोगी, राष्ट्रोन्नतीस अत्यावश्यक, जिच्या बद्दल सर्वांना हळहळ वाटत असून सर्वजण हेळसांड करीत आहेत, आणि ज्या बद्दल काळजी घ्यावयाची ह्मणजे सद्यः स्थितीला आमचा कोणाचाही उपाय चालत नाहीं, अशी बाब, आमच्या देशांतील जानजवान मुलांची नाउमेद, निरुत्साह, व आयुष्यांतील अतिमहत्वाचें वयांतील श्रमाचा आणि हिंमतीचा विनाकारण क्षय हो होय. आणि हा क्षय आह्मी आपल्या आईबापांच्या रक्तानें, शक्तीचें, द्रव्याचें आणि अक्कलेचें पोषण करून करीत आहों. ह्या दुःखद स्थितीबद्दल आपण आपले हातपाय हलवायास नकोत काय? पुरता मनाशीं विचार करा व उद्योगास लागा.

## अपमृत्यूची धाड

अमेरिकन संयुक्त संस्थानाचे प्रेसिडेंट म्याकिन्ले ह्यांचें गेल्या आठवड्यांत देहावसान झालें. ह्यास शेखहॅन्ड करीत असतां एका अराजक मताच्या मनुष्यानें कपटानें आकस्मिक दोन गोळया मारल्या, एक गोळी काढण्यांत आली पण दुसरी निघाली नाहीं. प्रथमतःच ह्या मृत्यूच्या घाल्यांतून ते पार पडतील अशी आशा कोणासहि वाटली नाहीं. तरी पण पुढें हळू हळूं ह्या प्राणांतक गंडांतरांत ते दगावणार नाहींत असा धीर येऊं लागला. दिवसानुदिवस त्यांच्या प्रकृतीस आराम पडत चालला. पण काळाची घटका भरल्यास उशीर कोठून असणार! त्यानें त्या पुरुषास सर्वांच्या देखत एकदम ओढून नेलें व सर्वांस आलेला धीर व लागलेली आशा हीं सर्व पार नाहींशी करून सोडली. मनुष्याचा मृत्यू केव्हां कसा असतो हें कधींही समजत नाहीं. ह्यांच्या मागचे तीन प्रेसिडेंट असेच मारले गेले. अमेरिकडील राजरीती प्रमाणें राजाच्या हातीं कांहीं विशेष सत्ता असते असें नाहीं. तो खरें पहातां नामधारी सही शिक्या पुरताच मालक असतो. असें असूनही एका विशिष्ट उच्चतम पदारूढ मनुष्याचा खून केल्यानें कांहीं राज्याची उलथापालथ होईल अशी जी कांहीं वेड्या मतांच्या लोकांची समजूत आहे ती व्यर्थ होय. हे प्रेसिडेंट फार लोकप्रिय होते. ह्यांच्या सन्मानार्थ सर्व ब्रिटिश अमला खालील राजकचेऱ्या एक दिवस बंद करण्यांत आल्या होत्या.

दुःखकारक वर्तमान—म्हैसूर संस्थानचे माजी दिवाण सर शेषाद्री आय्यर ह्यांस देवाज्ञा झाली हें वर्तमान ऐकून सर्वांचे अंतःकरण कळकळेल यांत शंका नाहीं. हा मोठा मुत्सद्दी व कर्तव्य बहादर पुरुष होता. ह्यांच्याच अमदानीमुळें म्हैसूर संस्थानच्या सुखसंपत्तीची भरभराट झाली होती. हे त्या संस्थानचें एक रत्न होतें. तें त्या राज्यास फार दिवस लाभलें नाहीं व त्याच्या दुर्दैवामुळें तें काळानें हिरावून नेलें ह्मणून त्या संस्थानास फारच फार दुःख होईल.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ११ शके १८२३

## राजकीय धोरण

—:०*०:—

वऱ्हाड प्रांताविषयीं पुष्कळशा गोष्टींचा खल चालूं आहे. हा अमानी मुलूख परत करावा किंवा तो खालसा करावा हा एक मोठाच विषय सध्यां प्रचलित आहे. हा प्रांत निजाम सरकारास परत मिळेल असें आह्मांस वाटत नाहीं. संभाव्य गोष्टीच्या खाणाखुणा ओळखतां येतात पण तशा कोणत्याच गोष्टी विद्यमान राजकीय धोरणावरून दिसत नाहींत. हा प्रांत परत करण्याची गोष्ट निघण्या सारखी नाहीं तर हा प्रांत इंग्रजी अंमलाखालीं संपूर्णतेनें खालसा करावा अशी दुसरी वादाची बाजू आहे. खालसा करण्याची गोष्ट एका महत्वाच्या प्रश्नाचा निकाल करिते. असा निकाल करण्यापासून विनाकारण वाद वाढतो. ज्या तहाखालीं हा प्रांत वहिवाटीला घेतला आहे त्या तहाच्या अटी बदलाव्या लागतील. अशा भानगडींत पडल्या पासून मोठा तंटा व कलह उत्पन्न होईल अशी भिती आहे. सरकारच्या कारभारांत आपण निःयशः पहातों कीं, पुष्कळशा गोष्टींत वाद मांडण्या पासून अनेक तोटे असतात. अगदीं निखालस निकालाला अनेक गोष्टी लागत नाहींत. ब्या तशाच भिजत पडूं देण्यामध्यें अनेक लाभ असतात. हा अमानी मुलूख आहे आणि तो तसाच राहूं दिला तर सरकारचा कार्यभाग चांगला साधतो. मुलूख कांहीं सोडावा लागत नाहीं, आणि इंग्रज अंमल कायमपणें चालूच राहील. या शिवाय इतर राजकीय गोष्टी वरूनही असेंच अनुमान निघतें कीं हा प्रांत ह्मणजे सर्व हिंदुस्थानचा मध्यभाग आहे आणि ह्या मुळें हा भाग इंडिया सरकाराला अवश्य पाहिजे आहे. वरील वा ह्याला जोडूनच दुसरा एक पक्ष असा निघाला आहे कीं हा प्रांत राज्यकारभाराच्या सोयीसाठीं मुंबई इलाख्याला किंवा मध्यप्रांताला जोडण्यांत यावा. अलिशान रेसिडेंट कर्नल बार व मध्यप्रांताचे कामिशनर हे उभयतां सिमल्यास गव्हरनर जनरल साहेबांच्या भेटीला गेले आहेत आणि त्या भेटींत या प्रश्नाचा निकाल होणार आहे असा सार्वत्रिक समज आहे. हा प्रांत मध्यप्रांताला जोडला जाण्याचा संभव विशेष दिसतो. पुष्कळशा गोष्टी मुंबई इलाख्याच्या पद्धतीवर आहेत आणि राज्यकारभारांचें धोरणही मुंबई प्रमाणेंच आहे, तथापि सान्निध्य व निकटपणा मध्यप्रांताशीं निसर्गतःच अधीक आहे व त्या प्रांताला जोडल्या पासून अनेक सोयीं निघतील असा संभव दिसतो.

## खर्चाची काटकसर

वऱ्हाड प्रांताच्या राज्यकारभाराचा खर्च मोठा आहे अशा विषयीं पुष्कळ वर्षांपासून ओरड आहे. मुंबई इलाखा किंवा मध्यप्रांत या दोन भागामधील खर्चाशीं वऱ्हाडचा खर्च ताडून पाहिला तर या प्रांताच्या खर्चाचें प्रमाण फार मोठें आहे असें दिसून येईल. ही गोष्ट सरकारालाही गैरशिस्त वाटली आणि खर्च कमी करण्याविषयीं सरकारचा विचार पक्का ठरला. मि. ब्रुनेट नांवाचे गृहस्थ या प्रांतांत कांहीं महिन्यांपूर्वी आले होते आणि त्यांनीं बारीक चौकशी करून खर्च कमी करण्या संबंधानें इंडिया सरकारापुढें एक खर्डाच मांडला आहे. मुख्य फेरफार आह्मांस जे कळले त्यांचा आह्मी आज निर्देश करितो. वऱ्हाडचे सहा जिल्हे सध्यां आहेत. ते मोडून फक्त चार जिल्हे कायम करण्याची सूचना आहे. उमरावती जिल्ह्यांतच इलिचपूर जिल्ह्याचा समावेश होईल. आकोला जिल्हा वाढवून पुसद तालुक्या शिवाय वाशिम जिल्हा आकोल्यांत मिळवितील. पुसद तालुका वणी जिल्ह्याकडे देण्यांत येईल. बुलढाणा जिल्हा वाढवून ह्यात आकोल्याचे दोन तालुके ह्मणजे खामगांव व जळगांव हे बुलढाण्याकडे जातील. सारांश असा दिसतो कीं वाशिम व इलिचपूर हे दोन स्वतंत्र जिल्हे राहणार नाहींत. या व्यवस्थेनें दोन्ही जिल्ह्यांचे जिल्हा—आफिसर कमी होतील. या दोन जिल्ह्यांच्या काटाकाटीनें पाऊण लक्ष रुपये खर्च कमी होईल असा अंदाजा आहे. तसेंच इनस्पेक्टर जनरलची जागा कमी करण्यांत येऊन त्याचें पोलिसचें व अबकारीचें काम कमिशनरकडे देण्यांत येईल आणि रजिस्ट्रेशन व स्टांप या दोन खात्यांचीं कामें जुडिशिअल कमिशनरकडे सोपविलीं जातील. सानिटरी कमिशनरची कचेरी हैदराबादेस न ठेवितां वऱ्हाडांत येईल आणि इनस्पेक्टर जनरलची तुरुंगावरची व्यवस्था त्यांच्याकडे दिली जाईल. फारेस्ट खात्याच्या खर्चा संबंधानें मोठीच काटकसर चालूं आहे. पब्लिक वर्कस संबंधाच्याही कांहीं सूचना आहेत. शाळाखात्यावर या काटकसरीची गदा बसली नाहीं हें मोठेंच भाग्य होय. भावी होणाऱ्या काटकसरीचें दिग्दर्शन वरील सूचनांवरून चांगलें होण्यासारखें आहे.

## प्रार्थना

( नवीन साऱ्याची तहकुबी )

वऱ्हाड प्रांतांत गेल्या दुष्काळांत सरकारानें ज्या व्यवस्था केल्या होत्या त्यांचा विचार इतिहास दृष्टीनें दुष्काळाच्या रिपोर्टांत करण्यांत आला आहे. हा विचार ह्मणजे अनुभवानें सांगितलेल्या सूचना एकत्र करण्या संबंधानें आहे. वऱ्हाड प्रांताला दुष्काळ कसा काय असतो हें फारसें माहित नव्हतें तथापि दुष्काळाचा प्रारंभ होतांच सरकारी दुष्काळाच्या संस्था उभारण्यांत आल्या आणि जीवधारणेची सोय कशीतरी सरकारानें लाऊन दिली. सरकारी योजना चांगल्या होत्या असा आतां निर्णय झाला आहे आणि ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, सरकारच्या कृपेमुळें गेला दुष्काळ कसा तरी निभावला गेला. या दुष्काळांत सरकारानें साऱ्या संबंधानें सूट किंवा माफी लोकांस जितकी द्यावयाला पाहिजे होती तितकी सूट किंवा माफी देण्यांत आली नाहीं. जमिनीच्या दुरुस्तीसाठीं लोकांस कर्ज मात्र बरेंच देण्यात आलें. या कर्जानें मदत चांगली मिळाली, सरकारानें सारा माफ करावा किंवा त्याची सूट द्यावी अशा विषयीं आह्मी सरकारास पुष्कळदां विनंती केली होती. पण ती विनंती अमान्य ठरली आणि लोकांस साऱ्या संबंधानें मोठी तसदी देण्यांत आली. साऱ्याच्या वसुलासंबंधीं मोठा त्रास झाला आणि तो अजूनही कुळांस भोंवला आहे. ही चूक सरकारानें कबूल केली आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. ही चूक उशिरानें कळली खरी पण त्याचा कांहीं फायदा रयतेला होण्याचा संभव नाहीं. आमची साऱ्यासंबंधानें दुसरी एक सूचना अशी होती कीं, लोकांची स्थिति अगदीं खालावली आहे आणि त्यांची पुनः स्थिरस्थावरता होण्याला कांहीं वर्षें लागतील ह्मणून रयतेला कांहीं सोडवणूक पाहिजे आणि ती सोडवणूक नवीन साऱ्याचीं आकारणी कांहीं वर्षें बंद ठेवण्यापासून होणार आहे. ही सूचना अद्यापि विचार करण्यासारखी आहे आणि सरकार आह्मांस या बाबदींत निराश करणार नाहींत अशी आह्मी मनाची समजूत घालतो.

## प्रजेचा असंतोष.

प्रजासत्तात्मक राज्य चांगलें ह्मणतात आणि अमेरिकेची मोठी वाहवा सांगतात. पण तेथीलही लोकनियुक्त राजा बंदुकीच्या गोळीला बळी पडतो. हें आश्चर्य तर खरेंच. मृत्यु वेळेचे घटित कोणालाच कळत नाहीं, तो मुहुर्त येतो तेव्हां आपण ह्मणतो कीं हाच ईश्वरी नेमानेम खरा! राजाचा मोठेपणाहि सुखासाठीं नाहीं त्याच्या जीवालाहि मोठे धोके असतात. हाच प्रकार प्रे० म्याकिन्ले यांचा झाला. कोणी चांडाळानें सुखी प्रजाजनां त्या ऐन आनंदोत्सवाच्या भरांत प्रेसिडेंट साहेबावर गोळी झाडली, डाक्टरांच्या मंत्रिमंडळानें हातांत होते नव्हत तेवढे प्रयत्न करून सोडले पण शेवटीं दुष्ट भावितव्यताच खरी ठरली ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!

अमेरिकेंत दोन पक्ष बलवत्तर आहेत. प्रस्तुतचें राजधोरण बादशाही पद्धतीवर आहे. लोकसत्तेला पुष्कळशी बाजूला झुगारून देण्यांत आली नाहीं. रोमचा इतिहास तरी अशीच गोष्ट सांगतो संपत्ति वाढली व श्रीमंतीला शांततेनें व स्वस्थतेनें सामराज्य प्राप्त झालें ह्मणजे लोकसत्तेची पायमल्ली होते. श्रीमान लोक आपलें वर्चस्व गाजवूं लागतात आणि अर्थात् श्रीमानांच्या बादशाहीला स्थळ मिळतें. या बादशाहीची पादक्रांती सहसा होत नाहीं पण ती करूं इच्छिणाऱ्या अराजकांचा समुदाय वाढत असतो. गरीब प्रजेची असंतुष्टी मोठ मोठ्या क्रांतीला कारणीभूत असते. ही असंतुष्टीच मोठमोठीं राज्यें धुळीला मिळविते. अमेरिकेची आबादानीच आपण ऐकतो पण असा असंतुष्टीचा प्रकार वातपाताच्या रूपानें दृष्टीस पडतो तेव्हां आमचा देशच आह्मांस सुखी, संतुष्ट व धन्य वाटतो. इंडियन प्रजेच्या गरिबी विषयीं सरकार काळजी वाहते ही गोष्टच इंग्रजी राज्याचा मोठा आधारस्तंभ होय.

या निधनवृत्ता वरून आणखी एक बोध आमच्या राज्यकर्त्यांनीं घेण्या सारखा आहे. अमेरिकेंत जे लोक वसाहतीला गेले त्यांच्या पैकीं पुष्कळ जण युरोपातील समाजाचा गाळ होता. अनुदारबुद्धि त्यांच्या बरोबर अमेरिकेंत गेली आणि तिचेच प्रादुर्भाव अशा खुनामध्यें वारंवार दिसून पडतात. प्रजा दिलदार, धार्मिक, सत्ववृत्तीची व उदार बुद्धीची असावी लागते. इंडियन लोक मूळचेच संस्कृत व मानधन आहेत, त्यांची सुशीलता विख्यात आहे आणि ह्मणूनच इंडियाचें राज्य इंग्लंडाला संपदाकारक आहे. ब्रिटिश सरकारानें इंडियनाविषयीं सप्रेम भाव ठेवावा याला कारण त्यांची उत्कृष्ट अनुवंशिक सद्वृत्ती होय. प्रेसिडेंट म्याकिन्ले यांच्या मरणानें अमेरिकेला एका प्रकारचा काळिमा आला आहे आणि त्या राष्ट्राची ही अंतस्थ हीनवृत्ती पाहून फार वाईट वाटतें.

## आनंदोत्सव

( श्री मंगलमूर्तीची समाराधना )

श्रीगणपतीचे उत्सव आकोल्यास यंदा फार नामी झाले. या उत्सवात थोडेंबहुत सार्वजनिक स्वरूप आलें आहे. इतर प्रांतांतील उत्सवांपेक्षां आमच्या प्रांतांतील उत्सवाचें महत्व विशेष आहे. आमच्या इकडे दुही व फाटाफूट नाहीं. हिंदु व मुसलमान असे दोन पक्षच आह्मांमध्यें नाहींत. आमच्या प्रांतीं उभय लोकांत सख्यभाव व प्रेमभाव चांगला जागृत आहे. या सार्वजनिक उत्सवाचें सुंदर चित्र आमच्या भागांत प्रेक्षणीय आहे.

गेला आठवडा आमच्या शहरीं फार आनंदानें गेला. घरोघर श्रीगजाननाचे उत्साह होतेच पण त्या समारंभाला सार्वजनिक उत्सवांनीं मोठी शोभा व रमणीयता आली होती. येथें ' आनंदाश्रम ' ह्मणून एक छोटी संस्था आहे. तिची गणपतीचीमूर्ती फार रम्य होती. मखर आरास व रोषनाई हीं अत्यंत मनोरम होतीं. एक लहानसें कोपऱ्यांतलेंच गृह होतें पण तें श्रीगणपतीच्या समारंभानें फार शोभायमान झालें. आनंदाश्रमाची मंडळी छोटेखानी खरी पण तिचा उत्साह, एक जूट व व्यवस्था फार चांगली होती. दुसरा उत्सव येथील राजश्री रामप्रताप शेट यांच्या धर्मशाळेच्या माडीवर झाला. मुख्य मारवाडी मंडळी पुढारी होती. इमारत बाहेरून मोठी भव्य पण आंतून ओबड धोबडच आहे. तरी या स्थळींचें मखर, व कारंजें हीं चांगलीं साधलीं असून श्रीगणपतीची मूर्ती मारवाडी धर्तीवर पण सुंदर होती. गायन वादन, व कीर्तन यांनीं पुष्कळच करमणूक झाली. तिसरा उत्सव शेट मूळजी जेठा यांच्या कंपाउंडांत झाला. राजश्री रणछोडदास यांनीं हा समारंभ फार

उत्कृष्ट केला. यांच्या मंडपांतील कीर्तनांनीं मोठी बहार करून दिली. मूळचा बंगला रमणीयं असून तो सर्व प्रकारच्या मंगलकारक गोष्टींनीं मन रमण्या सारखा झाला होता. मुंबईकर नाटकमंडळीनींहि आपल्या नाटकगृहांत स्वतंत्र उत्सव केला होता. आणि तो त्यांच्या करामतीनें फार चांगला झाला. ही मंडळी आकोल्यास विशेष प्रियकर झाली आहे. मनोरंजनाच्या गोष्टी ही मंडळी पुष्कळ करिते. आणि गांवच्या लोकांतहि ही मंडळी चांगल्या शिष्टाचारानें मिसळते ही आनंदाची गोष्ट होय श्रीगणपतीच्या विसर्जनाची मिरवणूक यांनीं चांगली काढली या शिवाय रावसाहेब देवराव विनायक यांच्या गृहांतला वार्षिक उत्सव, आणि इतर कांहीं ठराविक उत्सव मामूली प्रमाणें करण्यांत आले.

लोकांची धर्मश्रद्धा वाढली, लोकांस आपल्या वार्षिक उत्सवांचा प्रसंग आवडूं लागला, व लोकांचा भक्तिभाव व संमेलन हीं वृद्धिंगत होत चाललीं हा योग मोठा चांगला होय; त्या श्रीमंगलमूर्तीच्या कृपाप्रसादानें आमच्या राष्ट्राचा एक जीव होऊन राज्यकर्त्यांस व प्रजाजनांस भावी काल कल्याणप्रद होवो !

## लोकरंजन

—:*:—

गाण्या सारखी मधुर चीज नाहीं. त्याचे आलाप मनाला सुप्रसन्न करितात, आणि ह्मणून आनंदोत्सवाच्या प्रसंगीं गायनादिकांची प्रथम योजना करितात. यंदाच्या उत्सवाला मोठी रमणीयता रा. रा. नारायण बोवा गोखले, फलटणकर यांच्या कीर्तनांनीं आली होती. हे बोवा मोठे गुणी आहेत. त्यांचा गंभीर आवाज, भव्य मूर्ती, व सुश्राव्य भाषणशैली यांनीं यांच्या कीर्तनास मोठा रंग येतो. यांच्या मनोरम गाण्यानें श्रोतृसमाज कीर्तनाच्या समयीं अगदीं तल्लीन असतो. लोकरंजनाला यांचें कीर्तन फार उत्कृष्ट होय. उपदेशाच्या किंवा वेदांताच्या दृष्टीनें ते कीर्तनाचा रोंख थोडा बदलतील तर श्रोतृसमाज त्यांचा फार आभारी होईल.

राजश्री श्रीगणेशशर्मा हे पंजाबचे व्याख्यानकारही या सप्तकांत आकोल्यास आले होते. त्यांचीं संभाषणें फार चांगलीं झालीं. ते बहुश्रुत आहेत. समयोचित दृष्टांत व कथा हे फार गोड सांगतात आपल्या प्रतिपादनाचा विषय अगदीं सुगम करितात. हिंदुस्थानी भाषेंत हे बोलतात. यांचीं व्याख्यानें धर्मसंबंधीं विषयावर झाली. भारत धर्माची महती हे चांगली समजून देतात. त्यांच्या व्याख्यानाला चांगली गर्दी होत असे. ईश्वराचें अस्तित्व, धर्मशिक्षण, मांसाहार निषेध, वेदकालची माहिती इत्यादि नाना विषय यांच्या भाषणांत होते.

या शिवाय कित्येक उत्सवाच्या प्रसंगीं हि कांहीं नैतिक विषयांवर व्याख्यानें ऐकण्यांत आलीं. या सप्तकांत लोकरंजनाच्या गोष्टी इतक्या पुष्कळ होत्या कीं, लोकांस त्यांचा वेळ अगदीं थोडा वाटला आणि रात्रींच्या रात्रीं झोंपेशिवाय गेल्या. असा आनंदाचा समय ज्या गृहस्थांच्या कृपेनें आला त्यांचा नामनिर्देश त्यांस आवडणार नाहीं. ह्मणून आह्मी त्या खटाटोपांत पडत नाहीं तथापि त्यांचे आभार मानल्या वाचून राहवत नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 23, 1901

Social reform has a ring of sacredness about it. The present idea of reform is to mould our future. It is to elevate the tone of our character, and is, therefore, the basis upon which will be built the edifice of our greatness. Social reform fails to be the life—pulse of a nation if it is kept aloof from all other fields of activities and does not give the true meaning and import to other important aspects of national life and does not hold in harmony its different multiferious forces. Social reform is one phase of our existence and unless it adjusts the industrial, commercial, political and other many sided phases of human life into one harmoneous whole, it will never gain the strength of unity and will not realize the happiness which a complex life as ours will yield under different conditions. Social reform is now a days the watch—word of many of our enlightened citizens but the aloofness which they always preserve in not moving along the lines of general progress kills the very cause of their advocacy. Social reformers are as a rule a band of people who exclude themselves from the rest of the masses and whose moral tone does not attune with the general voice of the people. Social reform becomes an objectionable creed when it is preached by the reformers from their isolated platforms. The spirit of isolation is most objectionable to the further movement of a good and noble cause. There is a great estrangement of feeling when we see that our social reformers do not mix with us in our political movements. We admit that government resolutions often muzzle the mouths of their servants but we consider it a crime in them when they do not extend their sympathies to us in other walks of life. Many of our leaders are thus hostile to our main purpose of general amelicration. It is here that our greatest failure is seen and it is in this spirit of exclusiveness that we fail to enlist the sympathies of our rulers. It is in this disintegration of our course of life that we do not command mutual respect and fall a prey to the whims of the mighty, the chances of time and the irony of fate. Social reform is really a very noble cause but it should be the heart—felt wish to promote it on all sides. It is no doubt a difficult task but for all that we can facilitate it if we create friendliness of feeling, honesty of purpose, and mutual help for further elevation. Social reform fails to catch the time when it does not stem the current and does not smooth the coarse of events. Our leaders should, no doubt, occupy a higher platform of ideas and should emulate on a higher level of noble actions. But this very higher ideal of life should not engender a dis-regard for their companions. This acrid discourtesy makes them false friends of social reform and it becomes a question whether they should continue to be the champions of this noble cause. The freedom which one enjoys in setting at naught the sympathies and support of his people is not what he enjoys when he comes in contact with other people in other phases of life. The freedom of social life is very great and comparatively we feel its want when we meet each other on other grounds of public activity. In politics we have but little freedom, sedition and dis-loyalty are at our doors when we indulge in a freer talk with the best of loyalty and sincerity of motives. In religion we are so many differing elements but a proper spirit of toleration enables each to hold his own. In commerce and industry our freedom is not worth the name, because we have got no standing in the competition of the present century. We fail to introduce social reform because we do not secure the consecrating eye of unity and harmony. The competition of life is too hard for us and we are in fact trying to trample another under our feet and to secure a footing over him and after his death. This spirit should receive a check from the religious teachings of the universality of the soul and it will be then that we shall see some safer land—marks for the future progress of our sosiety.

"The old Aryan religion of India has, in spite of temporary decay at different periods, succeeded in living through the centuries. Like some giant surf-beaten rock, it has successfully with-stood the reiterated assaults of alien bigotry and of alien creeds. Conqueror after conqueror came and passed away; thoughts the most dissimilar, manners the most opposite, have come and gone; but the old religion of Aryavarta, hoary with age, like our own Himalayas, still lifts its head proudly among the religions of earth, the great mother of all religions, the fountain-head of every system of human thought, the mighty source of all civilization, the lofty memorial of our noble past, the only unfailing guarantee of our splendid future. To our people it is the fountain of perennial youth which the Spanish conqueror sought for in vain in golden land of Montezuma. For by it our fathers had been great in the past, and by it our children shall be great in the future. But the time has now come when the grand truths, taught by our ancient religion, should be demonstrated with the aid of Western science. The time has now come when every man and woman, born on our sacred Indian soil, born of the noble old Aryan stock, should come forward to help in the mighty task of revival of the noble old religion of our fathers. And that revival must be on the lines of modern Europen science. For the age of faith has passed away, and the age of positive proof has now come upon us. Time was when the dictum of a sage, of a holy Rishi, was believed in, with a blind faith by our people. But the time has come when it is necessary to prove, step by step, as in a mathematical demonstration, a religious truth, if we want our people to believe in it. And upon our religion more than upon anything else depends the unification of India,—the bringing about of the *Dharmarajya*, for which Srikrishna and Buddha and Sankara had striven. And if this religion could be proved as a positive science, if it could be placed beyond all criticism and all cavil, it will act as the irresistible power which will unify the people of India. And this religion could only be proved as a positive science by the help of the positive sciences of the West."

Bengalee.

## वऱ्हाड

हवामान— हवेंत गर्मी विशेष भासते. ढग वारंवार येतात आणि दोन चार पाऊस चांगले होतील असा रंग प्रस्तुत तुरकळ होत असलेल्या पावसावरून दिसतो. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे. बाजारभावाची तेजी पुन्हां मंदावली आहे.

रा. रा हरीहर काशिनाथ पाटील यांनीं सात महिन्यांची रजा घेतली आहे; आणि त्यामुळें जुडिशिअल कमिशनरच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं रा० रा० मारुती हरी हेच कायम राहिले.

आणि रा० रा० धोंडू हरी लळिंकर हे मूर्तिजापुरास तहशिलदारीवर रूजू होऊन रा. रा. नारायण रामराव गुप्त यांस कमिशनरची क्लार्क आफ कोर्टची जागा अकस्मात मिळाली.

मि. इ. मार्शल एक्स्ट्रा आसिस्टंट कमिशनर, यवतमाळ यांस डायरेक्टर ऑफ लँड रिकार्डचे परसनल असिस्टंट नेमून त्यांस त्या खात्याचें काम शिकण्यास सांगितलें आहे आणि १ एप्रिल १९०२ पासून डायरेक्टरची जागा कमी केल्या नंतर हे कामिशनर साहेबांच्या हाताखालीं परसनल आसिस्टंट ह्मणून काम पाहूं लागतील.

या आठवड्यात मुनसरीम लोकांची मोजणीच्या कामांत परीक्षा घेण्यांत आली. त्या परीक्षेंत ९ पैकीं दोन पसार झाले.

राजा इंद्रकरण आनररी अव्वाची हे हैदराबादेहून गेल्या मंगळवारीं परत आले.

वाशीम जिल्ह्यांत फारेस्ट कडील सी क्लास नंबर २ मध्यें जें जंगल आहे त्या पैकीं कांहीं जमीन वहितींत आणण्याचा सरकारचा विचार ठरला आहे. मोफत जनावरें चारण्याला गांवोगांव जी जमीन अवश्य लागणार आहे ती तेवढी गांवाच्या सोयी पाहून ठेवण्यांत येईल. या बाबदींत पक्की चौकशी करून वहितीला देण्याच्या जमिनीची मोजणी, करण्यासाठीं आणि तिचे अलग अलग नंबर पाडण्यासाठीं मुद्दाम एक अधिकारी निराळा नेमण्यांत आला आहे. मि. सोराबजी शापूरजी तहशिलदार चांदूर यांजकडे हें काम देण्यांत येणार आहे.

## वर्तमानसार

मेहेरनजर— दुष्काळाच्या आपत्तींत गरीब शेतकऱ्यांना शेताच्या साऱ्याची तहकुबी किंवा माफी मिळावी म्हणून सरकारास जी विनंती करावयाची त्यास स्टांप खर्च पडत असे. पण हा खर्च तसल्या आपत्तींत फारच कष्टमय होय म्हणून अशा विनंती-अर्जास या पुढें स्टांपाची जरूर नाहीं असें दयाळू सरकारनें फर्माविलें आहे. इंग्रजी राज्य म्हणजे पैशाचें दरबार आहे. संपत्तीहीन व दीन लोक दरबारच्या मानपानास अनधिकारी होत. राजदंड भरणाऱ्या ऐपतवान् लोकां खेरीज इतर जनांना ह्या दरबारांत जाण्यास मज्जाव आहे. अशा स्थितींत ही मेहेरनजर कांहीं कमी आहे असें नाहीं.

गमावली— दुष्टकर्माकडे मनुष्याची स्वाभाविक स्फूर्ति व प्रवृत्ति विलक्षण असते. दुष्ट गोष्टींच्या जाळ्यांत चुकूनहि पाय फसला तरी त्या फांशांतून तो पाय काढणें फार दुरापास्त व बिकट कर्म आहे. हें मोहमय जाळें सर्वत्र पसरलें आहे म्हणून प्रत्येकानें फार जपून वागलें पाहिजे. एका मुसलमानानें कांहीं गैर गोष्ट केल्यामुळे आपली आज १०-१५ वर्षांची मिळवलेली खान बहादुरी गमाविली. कीर्ति व संपत्ती कमावण्याचें काम फार श्रमाचें व कालाचें आहे पण ती गमावून बसण्यास एक पलसुद्धां बस होतो. मानमान्यतेस व थोर पदवीस चढणाऱ्या चांगल्या लोकांच्या हातून क्वचितच गैर कृत्य होतें, कारण त्यांच्या थोरवीस वाईट गोष्ट करण्याचा सहाजिकच तिटकारा येतो.

स्वयंपाक्यांचा कट— स्पेनच्या राजाच्या आचाऱ्यांनीं आपला पगार वाढवीत नाहींत असें पाहून कट केला व राजाच्या पानाशीं पान लावून भोजन करणाऱ्या राजघराण्यांतील लोकांस हातानें पाकसिद्धी करण्याची पाळी आली, ही एक गमतीचीच गोष्ट होय. अलिकडे यूरोप मध्यें कट करण्याचा फारच प्रघात पडत चालला आहे. कांहीं अनिवार्य कारणामुळेच संप होत असतात. पण अशी स्थिति येऊं देणें हें चांगलें नव्हे. स्वयंपाका शिवाय कोणाचेंच चालायाचें नाहीं. सर्वांचेंच अडून पडेल. पोटासाठींच सर्व रोजगार धंदे आहेत. स्वयंपाकाची कला आपल्या इकडे बहुतेक स्त्रियांना चांगली अवगत असते. कुटुंबांत पाकनिष्पत्तीचें मुख्य काम स्त्रियांचें असतें. पण पाश्चिमेकडून येणाऱ्या स्त्रीस्वातंत्र्याच्या सोसाट वाऱ्यानें ही कला स्त्रियांच्या हातांतून पार उडून जाऊं लागली आहे, व स्वयंपाक करणें ही फार लाजीरवाणी गोष्ट आहे असें वाटूं लागलें आहे. लहान मुलींना निरुपयोगी व टाकमटिकऱ्याचें स्त्रीशिक्षण देण्याची विशेष हौस उत्पन्न झाली आहे. स्त्रियांनाच काय पण पुरुषांना सुद्धां शिक्षण देण्यास प्रत्यवाय नाहीं. पण विशेष महत्वाच्या व फार जरूरीच्या गोष्टींचें शिक्षण प्रथम पाहिजे. पाकशास्त्र हें सर्व शास्त्रांत आद्य शास्त्र होय असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. अलिकडे बऱ्याच यत्ता शिकलेल्या लोकांपेक्षां सुद्धां पाकशास्त्रज्ञ लोक जास्त पैसे मिळवितात व अशांची जरूरीहि विशेष भासूं लागली आहे. कलाकौशल्योत्तेजक मंडळी ह्या कलेची व शास्त्राची उन्नति करतील काय? व स्त्रियांना व पुरुषांनाहि याचें शिक्षण देतील काय? कारण ह्या शास्त्राचें ज्ञान प्रत्येकास नेटाकाटाचें तरी असणें आवश्यक होय.

स्वदेशाभिमान—आपल्या इंग्लंडाधिपतीच्या राणी साहेबांनीं अशी मनीषा दर्शविली कीं, राज्याभिषेकाचे वेळीं सर्व स्त्रियांनीं इंग्लिश पोषाखांचाच उपयोग करावा व अशा रीतीनें स्वदेशाच्या उद्योगधंद्यास उत्तेजन द्यावें. शाबास! प्रत्यक्ष स्त्रीजनांच्या ठायीं इतका अभिमान वागूं लागलेला पाहून स्फूर्ति होणार नाहीं असा मनुष्य विरळा! अशा स्त्रीच्या देशभक्तीचें उदाहरणानें आमच्याकडील मंडळी लाजेकाजेस्तव तरी स्वाभिमान शिकतील काय?

पुष्ट मंडळी—अशी एक संस्था फ्रान्सांत आहे. ह्याचा सभासद होण्यास निदान कमींत कमी मनुष्याचें वजन २२० पौंड असावें लागतें, मुख्य प्रेसिडेंटाचें वजन ३९० पौंड आहे. अशा गमती गमतीच्या संस्था कांहीं वाईट नाहींत.

कोयनेलची दंतकथा— कोयनेल म्हणजे कोनाईन. क्कीनाईन हा कीन आन ह्या शब्दांचा अपभ्रंश होय. आना नांवाची अमेरिकेंतील पेरू देशच्या स्पॅनिश गव्हर्नरची राणी होती ती तापानें फार बेजार होती तिला एका झाडाच्या सालीची पूड देऊन छान बरी केली. त्यावरून त्या औषधीस त्या राणीचेंच नांव ठेवण्यांत आलें.

जोडाच मारला— थप्रा कडील एका कोर्टांत एका मनुष्यावर चोरीचा मुकद्दमा चालला होता. तो शाबीत होऊन त्यास शिक्षा झाली, त्याबरोबर या कैद्यानें माजिस्ट्रेटास जोडाच फेंकून मारला. ह्या अपराधाबद्दल त्यास लगेच वरिष्ट अधिकाऱ्यांनीं निराळी शिक्षा ठोठावली. त्या आरोपीनें असा जबाब दिला कीं, मी तुरुंग भोगून नुकताच बाहेर आलों आहे. मी अगदीं अपराधी नाहीं, उलटा माफ़ी मागण्या कर्माबद्दल मला पश्चात्ताप होत आहे, असें असूनहि मला सरकारनें शिक्षा सुनावली म्हणून मी संतापानें जोडा फेंकला. न्यायदरबारीं खऱ्याखोट्याची उलटापालट पुष्कळ वेळा होते, पण न्यायासनावर बसणाऱ्या अधिकाऱ्या कडे वक्र दृष्टीनें पहाणारा धाडसी अपराधी क्वचितच दृष्टीस पडतो.

पीकपाणी— बंगालकडे पाऊस फार पडला व त्यामुळें अनर्थहि झाला. मुंबईकडील प्रांतीं पावसाची हकाटी आहे व लवकर पाऊस न पडेल तर पुढें वाढून आलेलें सोन्याचें ताट हातचें नाहींसें होण्याची भीति आहे, ऊन कडक तापतें व उकाडा मनस्वी होत असतो. पाऊस पडेल अशी आशा वाटते, पण श्रीहरी करील तें खरें.

रशियाच्या राजवाड्यांतील स्वयंपाकगृहाच्या भिंती संगमरवरी दगडाच्या असून त्यावर मौल्यवान अलंकार आहेत. भांडीं सोन्याचीं असून त्यांची किंमत दहा हजार पौंड आहे. स्वयंपाक करणारे आचारी सुमारे अडीचशें आहेत व मुख्य पाकशास्त्रज्ञाचें वर्षासन दहा हजार पौंड आहे. व ५-६ शेलके आचाऱ्यास हजार दीड हजार पौंड दरमहा आहे. ह्या पेक्षांहि जास्त मौल्यवान् तेहरानच्या शहाचें स्वयंपाकगृह होय. थोराचें सर्वच थोर. त्याची लहानास कल्पना तरी कोठून येणार?

जन्माची चुकी—मोठ्या माणसावरची संकटें मोठीं बेबंद असतात. सेंट हेलिना बेटांत नेपोलिअनाचा अंत झाला. कैदेंत असतांना नेपोलिअन बोनापार्ट म्हणत असे कीं, मी आयुष्यांत पुष्कळ चुक्या केल्या असतील पण सर्वांमध्यें मोठी चूक ही केली कीं, मी इंग्रजांच्या स्वाधीन झालों. त्यांच्या चांगुलपणा विषयीं मला मोठाच भ्रम होता. मजवर जो सेंन्ट हेलिना येथें पाठविण्याचा जुलूम करण्यांत आला तो पिढ्यानुपिढ्या लोक कधींही विसरणार नाहींत. तो म्हणे कीं किंदेही जगतांत आणि मलाही मरेपर्यंत जगलें पाहिजे.

विचित्रपणा—संपत्काल व आपत्काल यांच्यामध्यें एक मोठाच विशेष आहे. संपत्काल स्थिरावला व अचल झाला तरी मनुष्याला कांहीं महत्व वाटत नाहीं. संपदा मिळविणें म्हणजे एका उंचशा डोंगरावर जाण्यासारखें आहे उच्च शिखरावरची हवा घेतली नाहीं तरी हवाशीर, व रमणीय ठिकाणीं मनुष्याला आपला आश्रम बांधून राहतां येते. पण विपदांची गोष्ट अगदीं निराळी! विपदांची उतरण मोठीच असते. एकदां मनुष्य उतारावर लागला कीं त्याचा पायच कोठें टिकत नाहीं. तो गडबडत, व घसरत व डोळे झांकून विपदांची खोली पहात पहात अगदीं तळाशीं पोचतो विपदा काय किंवा दुर्गुण काय सारखेच, त्यांनीं पहिली गती भूमिती श्रेढीनें वाढत जाते.

मिशन बंद झालें!— निजाम हैद्राबाद येथें असलेलें मिशन, तेथील कोणीही मुसलमान दहा वर्षांत ख्रिस्ती होईना म्हणून गेल्या महिन्या पासून बंद करण्यांत आलें.

दरबार व दीपोत्सव— काबूलचे अमीर साहेब गादीवर बसून पुरीं २० वर्षें झालीं म्हणून तेथें मोठा दरबार भरला होता आणि लोकांनींही दोन दिवस मोठी रोषणाई करून आनंदी आनंद केला.

तुर्की सरकारचा हुकूम— २० वर्षांवरील प्रत्येक तुर्क रहिवाशानें तुर्की सरकारचे लष्करांत दाखल झालें पाहिजे व जे मुसलमान नाहींत त्याज जवळून माणशीं ४॥ रुपये कर घेण्यांत येईल.

विजेचा नांगर— अमेरिकेच्या एका कारागिरानें विजेच्या सहाय्यानें चालणारा एक नांगर तयार केला आहे ज्याच्या योगानें रोज ३० एकर जमीन नांगरतां येईल असें त्याचें म्हणणें आहे.

## नोटीस

रा. रा. लक्ष्मण कोंडजी निकम माळी राहणार कळंबेश्वर तालुके मेहेकर जिल्हे बुलडाणें यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे लग्नाचें नवरे असून मजला ३ वर्षांपासून टाकून दिल्यामुळें मी व तुमचे मुलगे असें मजरे मुंमेवाडी येथें असून मजला मुलाकरितां ६० रुपये कर्ज करणें भाग पडलें आहे तरी मुद्दास लागलेला सर्व ६० रुपये कर्ज मी रामजी महीपती मुंमेवे पाटील यांचे उसने आहेत तरी रामजी यास देणें असलेली रकम तुम्ही त्यास देऊन मजलाही नोटीसे पावल्यापासून १९ दिवसांचे आंत घेऊन जावें. जर तुम्ही सदहू रुपये रामजीस देऊन मजला घेऊन जाणार नाहीं तर मी जाती धर्माप्रमाणें पुनर्विवाह करीन मग लग्ना संबंधी जे तुमचे नवरेपणाचे हक आहेत त्या संबंधी कांहीं एक दावा चालणार नाहीं. म्हणून ही नोटीस दिली. कळावे तारीख २०।८।१९०१ इसवी.

सही.

सहीची निशानी बुनाई मर्द लक्ष्मण माळी निकम राहणार मजे मुंमेवाडी नजीक जाणेफळ तालुके मेहेकर हीनी बांगडी असे.

दस्तूर हैदरखां रमजानखां मुसलमान जाणेफळ.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं माझी आजी नामें मलुबी मर्द एतेकादूशा यांनी हाजी उमरशेट यांस दुकानाची जागा सात वर्षें करितां लिहून नेटून दिली असें कळतें. असें करण्याचा तिला अधिकार नव्हता आणि या व्यवहारा विषयीं मी निराळी फिर्याद करून योग्य कोर्टांकडून माझी दुकाना मी परत घेणार आहे. या लेखानें सर्वत्र लोकांस कळविता कीं, माझ्या आजीच्या चिनाला वृद्धापकाळामुळें भ्रांति पडते. भ्रांतीमध्यें तिला लोक फसवितात. तिच्याशी कोणी व्यवहार करूं नये. जर कोणी व्यवहार करील तर त्याची जबाबदारी त्याच्याच शिरावर राहील. आणि मामेबंधानें माझ्या इस्टेटीवर कोणत्याही प्रकारें वारसा व हक्क चालणार नाहीं. कळावें १९ सप्टेंबर १९०१ इसवी.

सही (उर्दूत)

हुसनशा वल्द चांदशा राहणार ताजनापेठ आकोला.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ — A. G. Watson Agent.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस......... ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

REGSTERED N. No. 4

Six monthly......... 3 ................ 8 as
Single copy ............................ 4 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

VOL XXXV AKOLA MONDAY 30 SEPTEMBER 1901 NO 38

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ३० माहे सप्टेंबर सन १९०१ इ० अंक ३८

## समाजसुधारणा

समाजसुधारणा हा शद्ब एक समाज व दुसरा सुधारणा असे दोन शद्ब मिळून झाला आहे. आता समाज ह्मणजे बहुजन समुदाय व सुधारणा ह्मणजे चांगल्या गोष्टी धारण करणें. किंवा ग्रहण करणें. ह्मणजे बहुजन समुदायानें चांगल्या गोष्टी धारण करणे असा या शद्बाचा अर्थ झाला. हे शद्ब दिसावयास दोनच आहेत परंतु या दोनच शद्बांचा अर्थ मोठा व्यापक आहे. सुधारणा सुधारणा ह्मणून जी आज कित्येक वर्षां पासून ओरड ऐकूं येत आहे तिचा अर्थ काय? सुधारणा या शद्बाचा अर्थ कांहीं फारसा अवघड नाहीं. सु ह्मणजे चांगलें धारणा ह्मणजे ग्रहण करणें ह्मणजे चांगल्या गोष्टींचें ग्रहण किंवा अवलंबन करणें हा होय. परंतु चांगलें ह्मणजे काय व याच्या उलट वाईट ह्मणजे काय याची व्याख्या झाली पाहिजे. ही व्याख्या करणें फार अवघड आहे. एकास जी गोष्ट चांगली वाटते ती दुसऱ्यास वाईट वाटते. दुसऱ्यास जी गोष्ट वाईट वाटते ती पहिल्यास चांगली वाटते. या करितां चांगलें व वाईट याची निवडा निवड करणें फार कठीण आहे. उदाहरणार्थ, एक लहानशीं प्रचारांतली गोष्ट घेऊं आतेच्या मुलीशीं लग्न करणें कांहीं लोकांस प्रशस्त दिसतें व त्यांत कांहीं एक वाईट नाहीं असें वाटतें परंतु तीच गोष्ट कांहींजणांस फार वाईट वाटतें या साठीं चांगलें व वाईट यांची व्याख्या करावयास कांहीं तरी ठरीव प्रमाण किंवा ज्याला Standard measure ह्मणतात असें प्रमाण घेतलें पाहिजे. हें प्रमाण घ्यावयाचें तें अशा रीतीनें घेतलें पाहिजे कीं दोन्ही बाजू या मापानें सारख्या मोजल्या जातील. सदसद्विवेक शक्तीस जें चांगलें वाटतें ती गोष्ट चांगली व तिला जी निंद्य किंवा वाईट वाटणारी गोष्ट ती वाईट. अशा रीतीनें चांगले व ईटाची व्याख्या करण्यांत दोन्ही पक्षांची एकवाक्यता होईलच ह्मणून अशा गोष्टी ग्रहण करणें याचें नांव सुधारणा.

आतां ही कशी होत आहे व ती ज्या रीतीनें होत आहे ती दिशा बरोबर आहे किंवा काय याचा विचार केला पाहिजे. जनसमूह आंधळा व पांगळा आहे. आंधळा ह्मणण्याचें कारण असें आहे कीं त्यास खरा मार्ग दिसत नाहीं खरा मार्ग दिसावयास ज्ञान दीप प्रज्वलित पाहिजे तो बहुतेकांचा ज्ञान दीप मंद असल्या मुळें जनसमुहास चांगला मार्ग दिसत नाहीं. तो चांचपडत आहे व ठेंचा खात आहे. लंगडा ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं. त्यास आपल्या पायावर उभें रहातां येत नाहीं. अशा या लंगड्या व आंधळ्या जनसमुहास घेऊन चालणारा वाटाड्या फार हुशार, मजबूत व सदाचरणी पाहिजे. असा वाटाड्या जों पर्यंत मिळणार नाहीं तों पर्यंत जनसमूह असाच मागें राहणार. सुधारणा शकटाचें जूं खांद्यावर घेणारा स्वार्थी, कपटपटू, ढोंगी, समूहाच्या डोळ्यांत धूळ फेंकून त्यास आड मार्गास नेणारा नसावा, परंतु असा मनुष्य सांपडावा कसा? हल्लीं जो पहावा तो वर निर्दिष्ट केलेल्या गुणांनीं पूर्ण. क्षणांत एक मार्गाचें अवलंबन करणारा व क्षणांत बदलून जाणारा, तेव्हां अशा मनुष्यावर जनसमुहानें विश्वास कसा ठेवावा? गरीब बिचारा जनसमूह अशा नाविकाच्या तावडींत सांपडून गटांगळ्या खाऊन खाऊन थकला, व अखेरीस ज्या प्रमाणें सोळावा लुई मेल्या नंतर राजा या शद्बाचा जसा फ्रेंच लोकांस तिटकारा आला तद्वत हल्लीं सुधारणा शद्बाचा लोकांस तिटकारा आला आहे. हल्लीं सुधारणा करण्यासाठीं ज्या मार्गाचें अवलंबन होत आहे तो मार्ग अगदीं उलट्या दिशेला गेला आहे. त्या मार्गानें लोक जाऊं लागले तर कधीं तरी इष्ट स्थानीं जाऊन पोहोंचतील काय? इष्ट ठिकाण जर पूर्व दिशेस आहे तर पश्चिम दिशेस जाऊन काय उपयोग होईल बरें? जनसमुहाचा व सुधारणा करूं इच्छिणारांचा मतभेद हाच.

सुधारक लोक ह्मणतात विधवा विवाह प्रचारांत आला पाहिजे. दुर्धारक ह्मणतात कशासाठीं? संसार सुखांत मुख्य अंगें दोन. एक स्त्री व दुसरा पुरुष. दोन्हीं अंगें संलग्न झालीं व तीं अबाधित पणे कायम राहिलीं ह्मणजे संसारयात्रा आटपली ह्मणायाची परंतु त्यांतलें एक अंग जर नष्ट झालें तर दुसरें अंग लटकें पडायाचेंच त्याचा सांधा उखळला तो उखळला. त्यास दुसरा सांधा कधींही चांगला बसावयाचा नाहीं. यद्यपि बसला तरी तो डागावांचून बसावयाचा नाहीं. डाग लागला ह्मणजे अर्थात तो हिणकट बनला. दुसऱ्यानें नेसलेलें वस्त्र किंवा घातलेला अंगरखा वापरण्यास जर मन कसकसतें तर परभुक्त स्त्रीचा उपभोग घेऊं इच्छिणें ह्मणजे केवढें वेडेपण आहे! पशूंस बुद्धि नसतांही परभुक्त वस्तूंचा कांहीं काल पावेतों तरी ते उपभोग घेऊं इच्छित नाहींत. मग मनुष्यास तर ईश्वरानें बुद्धि दिली आहे त्यांनीं या मार्गाचें अवलंबन करणें याहून नीचतर स्थिती कोणती? पशूपेक्षांही आपली योग्यता कमी झाली कीं नाहीं.? केवळ ऐहिक सुखासाठींच जर या मार्गाचा स्वीकार करावा असें वाटत असेल तर तो गौण आहे असें विचारांतीं कळून येईल. कारण ऐहिक सुखें क्षणभंगुर आहेत. अशा क्षणैक सुखासाठीं नीतिमत्तेचा पाया ढासळणें मोठें वेडेपण आहे. अशा अनाथ गाईची कींव न येणारा पाषाण हृदयीं राक्षस विरळा! परंतु ईश्वरसत्तेपुढें काय इलाज आहे. तिला अशा कष्टमय स्थितींत ठेवण्याचेंच जर त्याच्या मनांत असलें तर अशा अनाथ स्त्रियांना तुह्मी कितीही सनाथ केलें तरी त्या अनाथच्या अनाथच! तेव्हां या मार्गाचें अवलंबन करणें ह्मणजे आपण त्यांच्या नीतिमत्तेचा पाया खणून टाकण्या सारखें आहे. त्यांची जर खरी कळकळ तुह्माला असेल व त्यांची खरोखर कींव जर तुह्माला येत असेल तर वास्तविक ज्या अनाथ विधवा असतील ह्मणजे ज्यांस कोणीच आपंगिता नसेल अशा विधवांचें पोषण होण्यासाठीं एक फंड उभारला पाहिजे व त्या फंडाच्या व्याजांतून त्यांचा चरितार्थ चालवावा व जेणेंकरून त्यांचें पाऊल वाईट मार्गांत न पडेल अशा रीतीचा त्यांस उपदेश करीत जावा

स्त्रियांसाठीं एवढा आपण सक्त नियम करितों व त्यांच्या सुखांत आपण अंतर पाडतों व पुरुषांकरितां आपण कांहींच नियम करीत नाहीं यामुळें आपणावर पक्षपाताचा आरोप येईल तो न यावा ह्मणून पुरुषांसाठीं सुद्धां असा नियम घालणें अवश्य आहे कीं, ज्या पुरुषाची स्त्री गत होईल त्यानें पुन्हा विवाह करूं नये व अशा विधुरास कोणी आपली मुलगी देऊं नये. व जो कोणी आपली मुलगी देईल किंवा दुसऱ्याची करील त्यास जाति निर्बंधा प्रमाणें अपंक्त ठरवावें. अशा रीतीचा निर्बंध झाला ह्मणजे नीतीचा पाया खचित मजबूत होईल असें झालें ह्मणजे ती खरी सुधारणा झाली असें ह्मणावें. आतां हा नियम पाळावयास शेंकडा एक तरी निघेल किंवा नाहीं शंका आहे. असा कडक निर्बंध पुरुष आपणास घालून घेऊं इच्छित नाहींत. ते ह्मणतात कीं, आह्मास तर बंधनें नकोतच परंतु बायकांसहि तीं नकोत. या वरून जो पुरुष परस्त्रीगामी आहे तो कोठ आपल्या स्त्रीस पर पुरुषाकडे जाण्याचा धडा शिकवितो असें होत नाहीं काय? व या मुळें नीतिचा अगदी ऱ्हास होणार नाहीं काय? मग यास सुधारणा ह्मणावें कीं कुधारणा ह्मणावें. अर्थात अशा प्रकारची सुधारणा इष्ट नाहीं.

बालविवाहाची चाल मोडून त्या ऐवजीं मोठेपणीं लग्नें करण्याचा प्रघात पाडणें हा दुसरा सुधारणेचा मार्ग. जनसमूह ह्मणतो बालविवाहाची चाल चांगली आहे सुधारक ह्मणतात ती चाल फार वाईट आहे. ती पासून फार अनिष्ट प्रसंग ओढवतात, हजारों मुली अल्प वयांत विधवा होतात, प्रजा अशक्त होत व या मुळेंच पुष्कळ लोक अल्पायुषी होऊन मृत्युमुखीं पडतात. या साठीं ती चाल आजिबात बंद करून मोठेपणीं लग्न करण्याची चाल प्रचारांत आणावी. युक्ति खाशी आहे. परंतु ती अमलांत कशी यावी हा मोठा प्रश्न आहे. कारण मोठेपणीं लग्न करण्या पासूनहि तेंच अनिष्ट परिणाम घडण्याचा संभव आहे. ते कसे व यांत सुधारणा करणें आहे तर तिची दिशा कितपत बदलली पाहिजे, याचा जरूर विचार केला पाहिजे. मोठेपणीं लग्न करावयाचें ह्मणजे त्याला कांहीं ईयत्ता पाहिजे. ती ईयत्ता कोठपर्यंत असावी? सुधारणा करूं इच्छिणारांनीं असें प्रमाण सुचविलें आहे कीं, मुलगा सोळा वर्षां पेक्षां जास्त झाला व मुलगी १२ वर्षां पेक्षां जास्त झाली ह्मणजे उभयतांचा विवाह करावा. या वरून नवरा बायकोचे वयांत सुमारें पांच किंवा सहा वर्षांचें अंतर असलें ह्मणजे बस्स आहे. व पुरुषानें ४० वर्षें पर्यंत लग्न करावें त्या पुढें करूं नये अशी त्यांनीं एक कलम घातली आहे. नवरा बायकोमध्यें अंतर ६ वर्षांचें असलें तर बस्स आहे. तेव्हां चाळीस वर्षांच्या नवरदेवास तीस पस्तीस वर्षांची बायको असली पाहिजे. अशी अविवाहित मुलगी मिळणेंच नाहीं. त्याचा विवाह फार मोठी मुलगी ह्मणजे चौदा किंवा १५ वर्षांची, तिच्याबरोबर झाला तर हा विवाह वरच्या प्रमाणानें लहानपणींच झाला असें नको कां ह्मणायला? २६ वर्षांचें अंतर ह्मणजे थोडें झालें काय? मग मोठेपणीं लग्न करण्याचा अर्थ तो काय? पुढें कदाचित दुर्दैवानें तिचा नवरा लग्न झाल्याबरोबर मेला तर ही १५ वर्षांची विधवा काय व आठ दहा वर्षांची विधवा काय सारखीच. पतिसुखाचा अनुभव जर तीस नाहीं तर मोठेपणीं लग्न करूनच काय फायदा झाला? यासाठीं असा एक निर्बंध घातला पाहिजे कीं, आपासून वर सांगितलेला अनिष्ट प्रसंग टळेल. परंतु असा निर्बंध करणें सध्यांच्या स्थितींत दुष्कर आहे. यास आणखी कांहीं काळ लोटला पाहिजे. तो लोटला ह्मणजे आपोआप जनप्रवृत्ति तिकडे धांव घेऊं लागणार आहे दहा वीस वर्षांमागें जी अल्प वयांत लग्नें झालीं त्या पेक्षां हल्लीं पुष्कळ कमीं होत आहेत व पुढें याही पेक्षां कमी होत जातील.

प्रजा अशक्त होते, मनुष्यें अल्पायुषी होतात, पुष्कळ मुलींचे लहानपणींच नवरे मरतात या सर्वांचें कारण अल्प वयांत लग्न करणें हें होय असें पुष्कळ लोकांचें ह्मणणें आहे. परंतु हें भ्रांतिमूलक आहे. खरें कारण याहून फार भिन्न आहे त्याचा जर बंदोबस्त होईल तर शेंकडा ७५ निदान ६० तरी अनर्थ टळतील. तें कारण कोणतें ह्मणाल तर, लहानपणीं मुलांस लागणाऱ्या वाईट संवयी, त्यांच्या सदाचरणाचा ऱ्हास, त्यांची अनावर कामवासना वगैरे गोष्टी या अनर्थास कारणभूत आहेत. या गोष्टीकडे अवश्य लक्ष गेलें पाहिजे. परंतु ह्या गोष्टी कोणाच्या ध्यानीं मनींही येत नाहींत. ह्मणे बालविवाह बंद करा. पण बालविवाह बंद केल्यानें उलट मुलें झरणीस लागतील, कुमार्गास लागतील व येणेंकरून अनर्थ टळावयाचा एकीकडे राहून उलटा दुप्पट अनर्थ होईल.

बालविवाहाची चाल आहे ती बंद करण्याच्या भरीस न पडतां मुलांचीं मनें सुमार्गास लावण्याची खटपट केली पाहिजे. त्यांस कसरतीची गोडी लावली पाहिजे. या गोष्टींची त्यांस ईर्षा आणली पाहिजे. वर्षांतून एकदां किंवा दोनदां त्यांजकडून कुस्त्या करवून त्यांस इनामें दिलीं पाहिजेत. या गोष्टींचा मुलांस छंद लागत गेला ह्मणजे अर्थात कामवासना त्यांपासून दूर पळावयास लागेल. व ती पळूं लागली ह्मणजे अनायासें इष्ट कार्य सिद्धीस जाणार आहे. या गोष्टीबद्दल यत्किंचितही प्रयत्न न करतां बालविवाहापासून अनर्थ ओढवतात ह्मणून ती चाल बंद करा असें सांगितल्यास कोण कें ऐकणार आहे? या गोष्टी जारीनें अमलांत आणण्याच्या प्रयत्नास लागा ह्मणजे मुलें आपोआप अमुक वयापर्यंत आह्मी लग्नें करीत नाहीं असें ह्मणूं लागतील, व तीं असें ह्मणूं लागलीं ह्मणजे लग्नाच्या मुलीही हळू हळू मोठ्या होत जातील. बालविवाहाची चाल एकदम बंद करावयास सांगण्यापेक्षां अशा रीतीनें जर प्रयत्न सुरू ठेवला तर खरोखर यानें लवकर यशप्राप्ति मिळेल. इतकें करूनही कांहीं मुलींचें कपाळ फुटलेंच तर वीस वर्षांच्या मूल न झालेल्या विधवेचा विवाह करावा व तो विसांहून जास्त वयाच्या व ४० हून कमी विधुराशींच करावा, अन्य जनाशीं करूं नये अशाबद्दल आचार्यांची परवानगी मागावी. असा विवाह करणें अर्थातें गौणपक्ष. कारण, त्या स्त्रीच्या सदाचरणास बट्टा लागणारच. परंतु जगाचे सुख कांहीं तरी तीस मिळावें ह्मणून हा तिचेवर उपकार करणें होय.

या खेरिज समाज सुधारणेच्या पुष्कळ गोष्टी आहेत परंतु त्यांतील ठोकळ ठोकळ दोन चार गोष्टींचा अवश्य विचार केला पाहिजे. एक गोष्ट, मुलाच्या बापानें मुलीच्या बापापासून हुंडा किंवा करणी घेण्याची चाल अगदीं मोडून टाकली पाहिजे या चालीमुळें कितीं कुटुंबें कर्जबाजारी होऊन धुळीस मिळालीं आहेत हें सर्वांस माहीत आहेच. ही चाल बंद करण्यासाठीं सुधारक ह्मणविणाऱ्यांनीं कित्ता घालून दिला पाहिजे स्वधर्में निधनं श्रेय. हें वचन लक्षांत वागविलें पाहिजे. प्राण गेला तरी बेहत्तर परंतु हुंडा किंवा करणी घ्यावयाची नाहीं असा निश्चय केला पाहिजे. बोलल्या प्रमाणें करणारा साधूच्या मालिकेंत जाऊन बसतो. व त्यास सर्व लोक वंदूं लागतात. अशांच्या पाठीमागें जनसमूह आलाच ह्मणून समजा. ही गोष्ट झाली मंगल कार्याची. दुसरी अगदीं याच्या उलट ह्मणजे अशुभ कार्याची होय. या गोष्टी संबंधानें आपला समाज फार उदासीन दिसतो. अनाथ प्रेतसंस्कार फार पुण्यप्रद ह्मणून शास्त्रांत सांगितलें आहे. मग तें प्रेत कोणत्याही जातीचें असो. असें जर आहे तर स्वजाति बांधवाच्या प्रेत संस्काराच्या वेळीं दूर राहणें ह्मणजे किती लाजिरवाणी गोष्ट आहे. ज्याच्या घरचें माणूस गत झालें असेल त्याला संकटाच्या वेळीं मदत न करणें ह्मणजे दुष्टपणाची कमाल नव्हे कां? दुसऱ्या कोणत्याही गोष्टीत सुधारणा न झाली तर पतकरली पण या गोष्टींत अवश्य सुधारणा झाली पाहिजे व ती सुधारणा ह्मणजे फारशी कठीण नाहीं. प्रत्येकानें सवडीनुसार अशा कार्यास जाण्यास ह्मटणें ही होय. जो कोणी जाणून बुजून अशा प्रसंगीं जाण्याचें नाकारील किंवा टाळील त्यास जातीनें कांहीं तरी दंड करावा व हा दंडाचा पैसा जमा करून त्या फंडांतू अनाथ प्रेत संस्कार करावावे. तिसरी महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे आपल्या धर्मशिक्षणाचा प्रसार, धर्म शिक्षण केवळ भिक्षुक वर्गांनेंच आपल्याकडे ठेविल्यामुळें पुष्कळ वेळां शुभाशुभ प्रसंगीं या भिक्षुक वर्गाची पोळी पिकते व ते वाटेल तसे यजमानास बुचाडतात या करितां धर्म शिक्षणाच्या शाळा स्थापन करून त्यांत प्रत्येक घरच्या मुलांस धर्म शिक्षण मिळण्याची सोय व्हावी. याकरितां जो खर्च लागेल तो भागविण्यासाठीं थोडीशी फी ठेवली तरी चालेल. चवथी गोष्ट ऐक्यवर्धन होय. या गोष्टीची तर आमच्या समाजांत फारच उणीव आहे. व त्यामुळें आमच्या समाजाचें अतोनात नुकसान होत आहे. या करितां परस्परामध्यें दळण वळण वाढवून रोटी व्यवहार, बेटी व्यवहार, किंवा दुसऱ्या गोष्टी ज्यांनीं ह्मणून एकमेकांची मनें एकमेकांकडे ओढतील अशा गोष्टी करून ऐक्यभाव वाढविण्यासाठीं जारी प्रयत्न करावा. या खेरिज आणखी पुष्कळ बारीकसारीक गोष्टी सांगावयाच्या राहिल्या. त्या खेरीज करून वर सांगितलेल्या गोष्टींचाच जर लोक विचार करूं लागतील तर समाज सुधारणा होण्यास बिलकूल अडचण लागणार नाहीं.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ३ शके १८२३

---

## अपूर्व राज्याभिषेक

( भावी आनंदोत्सवाची गोड गोष्ट )

राज्याभिषेकाचें सुमंगल कार्य १९०२ सालीं होणार आहे. हा आनंदाचा मुहूर्त व जयघोषाची सुवेळा लवकर येवो असें चिंतन सर्वत्र चालूं आहे. सर्व प्रजाजन उत्कंठेनें व उत्हासानें त्या आनंदोत्सवाची मार्गप्रतिक्षा करात आहे. हा समारंभ विलायतेसच होणार आहे. तेव्हां आह्मा इंडियनांच्या नेत्रांचें साफल्य होणार नाहीं असा तर्क होता. पण अलिकडे जी एक मंगल वार्ता आमच्या राज्यकर्त्यांच्या सुवर्णमय बेटाकडून आली आहे ती मनाला मोठा आल्हाद व समाधान देते. जसा विलायतेस राज्यभिषेकाचा उत्सव होईल तसाच टोलेजंग उत्सव दिलीस व्हावयाचा आहे. ही बातमी ऐकल्या पासून आमच्या मनोराज्याचा मनोरा फार उंचवर गेला आहे. आमचे चक्रवर्ती बादशहा ७ वे एडवर्ड यांस राज्याभिषेक दिल्लीच्या गादीवर जे दिवशीं होईल तो खरा सोन्याचा दिवस होय. दिल्ली शहराची प्राचीन आख्यायिका मोठी आहे. इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर किंवा दिल्ली हीं नांवें इंडियाच्या इतिहासांत परम पूज्य आहेत. महाराज युधिष्ठिर यांस राज्याभिषेक याच पूण्यभूमीवर झालेला आहे. मोंगल बादशहाची राजनगरी ती येथेंच होती. या स्थळाशीं पूर्वापार संबंध मोठा आहे. अशा पवित्र भूमीवर आपचे चक्रवर्ती बादशहा राज्याभियेक निमित्त येतील तो सुदिन सुवर्णाक्षरांनीं इंडियाच्या इतिहासांत लिहिला जाईल. इंडिया सारखी संपदेची खाण दुनियेंत मिळणार नाहीं. अशा रत्नभूमीचा परम आदर होऊन बादशहा एडवर्ड आपल्या प्रजाजनास अत्यंत आवडतील प्रत्यक्ष राज दर्शनानें सर्व लोक अत्यंत नेत्रसुख उपभोगतील त्यांच्या राजनिष्ठेला भरतें येईल आणि प्रत्यक्ष परिचयानें प्रजेचा संतोष व आबादानी वाटेल. रघुवंशीय राजाप्रमाणें आमच्या बादशहास पृथ्वीपती ही संज्ञा खरोखर शोभते. पृथ्वीवर समुद्र व भूमी यांचा असा कोणताच कटिबंध नाहीं कीं, जेथें आमच्या पृथ्वीपतीचा यशध्वज फडकत नाहीं. आमच्या कैलासवासी परम पूज्य महाराणी सरकारचे चिरंजीव अतिच भाग्यशाली व पुण्यश्लोक राहून सुखानें चिरकाल राज्य करोत! ईश्वर करो आणि बादशहा एडवर्ड यांस इंडियांत राज्याभिषेक होवो ही नवीन बातमी किती तरी आनंदकारक वाटत आहे बरें!

## मित्र शोक

आज एका प्रिय मित्राचें निधनवृत्त सांगण्याचा दुःखद प्रसंग आह्मांवर आकस्मिक आला आहे. रा. रा. बाळकृष्ण मोरेश्वर साठे, सेक्रेटरी, जिल्हा बोर्ड हे नवज्वरामुळे गेल्या शुक्रवारीं देवाधीन झाले हें कळविण्यास परम दुःख वाटतें. अखेरच्या तीन दिवसांत नवज्वराचा जोर झाला, शक्तिपात अधिकाधिक होऊं लागला आणि अखेरची वेळा अनंतचतुर्दशीच्या दोनप्रहरीं प्राप्त झाली. वृद्ध पिता बाजूला गीतेचें पठन करीत आहे, तरुण पत्नी व तीन वर्षांचा आनंददायी मुलगा हरीच्छेनें दूर यवतमाळाला गेला आहे आणि मित्रमंडळी निराशेच्या पाचक्यानें वर खालीं फिरत आहेत अशा वेळीं अंतकाल झाला. वयाचें मान ४९ च्या आंतच होतें राजश्री साठे हे मोठे श्रीमान किंवा मोठे कोणी अधिकारी होते असा कांहीं प्रकार नाहीं. परंतु याच्या विषयीं लोकांचा जिव्हाळा फार फार तुटत आहे. गृहस्थ सामान्य खरा पण फारच चांगला होऊन गेला. त्यांच्या सहवासांत जो आला तो यांच्या मित्रप्रेमानें बद्ध होऊन जाई. राजश्री साठे बोर्डाचे सेक्रेटरी होते हा यांचा मोठेपणा नाहीं, यांच्या हातीं अधिकार लहानच होता. पण यांच्या मोठेपणाच्या खुणा निराळ्याच होत्या. ते स्वभावानें फारच गोड असत. त्यांचें वर्तन बाळबोध, सरळ व मोहक असें पण त्यांची ती हास्यमुद्रा मनाला आतां फार दुःख देते. गरीबांच्या कार्याला राजश्री साठे सदां उभे असत. श्रीमंत मंडळींतही त्यांची चहा असे. स्वतांला पुष्कळ झीज घेऊन ते परोपकार करीत. यांच्या परोपकाराचा मोठासा पुकारा नाहीं. पण त्यांच्या कक्षेंत पुष्कळ लोक त्यांचे ऋणी आहेत. सर्व मंडळीस ते आपलेसें करीत, इतकेंच नाहीं तर ज्या संस्थांमध्यें ते असत तेथें ते सर्वांचा एकजीव करून फाटाफूट नाहींतशी करीत. बरार ट्रेडींग कंपनी सुस्थितीला येण्याला राजश्री साठे कारणीभूत आहेत. त्यांची मुनसिपालिटींतील कारकीर्द खरोखरीच वर्णनीय आहे. बोर्डाच्या स्थापने पसून आज मितीला अकोला–जिल्हा–बोर्डाचा जो मोठा लौकिक आहे तो ज्या दोन गृहस्थांच्या बारा वर्षांच्या परिश्रमाचें अमृतफळ आहे त्या पैकीं हे एक होते. हे त्या दुसऱ्या गृहस्थाचे मुख्य मंत्री व उजवा हात होते. बोर्डात येण्या पूर्वी चार वर्षे हे हायस्कुलांत शिक्षक होते. याची गणना उत्कृष्ट शिक्षका मध्यें असे. यांचें अध्ययन इंजिनिअरिंग कालेजांतील पहिल्या परीक्षेच्या पुढें बरेंच झालें होतें. यांचे विचार उदात्त असून त्यांची सुधारणा पुष्कळशी कर्तीत असे. सरकारी वेतनापालिकडे हे पहात नसत. ते निरपेक्षतेनें कामें करीत. गेल्या दोन्ही दुष्काळात राजश्री साठे यांनीं आपलें कर्तृत्व चांगलें दाखविलें. गरीब मजूर यांस देवा प्रमाणें मान देत असत. यांच्या निरपेक्षतेमुळें कित्येक कंत्राटदार परवां ढळढळा रडले. आह्मांस सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, राजश्री साठे हे साधारण माणुस, पण गुणांनीं अगदीं बहुमोल होते. त्यांच्या स्मशानयात्रेला पुष्कळ गृहस्थ जमले होते. ईश्वर त्या साधुपुरुषाला परम शांति देवो!

## परीक्षा

[ न्यायाधीश आणि भावी वकील ]

आपच्या प्रांतीं सप्टेंबर व आक्टोबर हे दोन महिने ह्मणजे परीक्षेचा मोसम आहे. नुकत्याच दोन परीक्षा झाल्या. पहिली वकिलीची झाली आणि दुसरी न्यायाधिशांची झाली. वकिलीचे परीक्षेचा निकाल शून्य ब्रह्मालाच पोचेल असा पक्का तर्क आहे. न्यायाधिशांची परीक्षा ह्मणजे डिपार्टमेंटल परीक्षा मागाहून झाली ती दुसरी होय. इचा निकाल बाहेर आलेला नाहीं. या परीक्षेला उमेदवार सर्वच न्यायाधीश असतात असें नाहीं. कांहीं सुळवस्तु लोक परवानगी घेऊन या परीक्षेला पुढील आशेवर बसतात आणि कांहीं क्लार्क आफ कोर्ट व डिपुटी क्लार्क आफ कोर्ट हे न्यायाधिशाचें काम करीत नसूनही त्यांस या परीक्षेला बसावें लागतें. दिवाणी व फौजदारी विषय वकिलीच्या व या लोअर हायरच्या परीक्षेला असतात. पण त्या दोन्ही परीक्षांचे कागद पाहिले ह्मणजे वकिलीच्या व न्यायाधिशाच्या कसोटीमध्यें जमीन अस्मानीचें अंतर दिसून येईल. लोअर हायरचे कागद वकिलीच्या उमेदवारांस दिले आणि वकिलीचे या न्यायाधीश मंडळीस दिले तर त्यांच्या निकालाविषयीं ठोकळ अनुमान असें निघेल कीं, वकिलीच्या परीक्षेच्या मांडवाखालून गेलेला इसम पहिल्या कागदांत पसार होईल. पण आमच्या न्यायाधीश मंडळीपैकीं बहुतेक सर्व जणांस होन चार वर्षे परीक्षेला बसूं नये असा हुकूम मिळेल. दोन्ही परीक्षा समान विषया संबंधानें इतक्या भिन्न तऱ्हेनें कां

होतात याला कारण थोडक्यांत आहे. वकील पुष्कळ असून ते नको नको झाले आहेत. न्यायाधीश मंडळी ज्या न्यायाच्या खुर्चीवर बसली आहे त्या खुर्चीवर त्यास विराजमान व शोभायमान करण्याची परीक्षकांची इच्छा आहे. वकिलांच्या वर्गांत नवीन भरती मोठ्या कसोशीनें करितात. न्यायाधिशांची पूर्वींच झालेली कलश स्थापना परीक्षेच्या बुडावर पक्की करावयाची असते. अशा दोन विरुद्ध इच्छा परीक्षेच्या कागदांत विपरितपणा व भिन्नपणा दर्शवितात. मूळ हेतू समजून घेतले ह्मणजे दोन परीक्षांमधील लघुगुरुत्वाणा सहजीं कळेल,

आमच्या स्थानिक सरकारची समजूत काय असेल ती असो, आह्मांस तर न्यायाधिशाचें काम फार बिकट वाटतें. आमच्या मतीं न्यायशास्त्र पढलेलाच गृहस्थ न्यायाधिशाला लागतो असें नाहीं. सरकाराजवळ शहाणपणाची अशी विलक्षण टांकासळ आहे कीं ते प्रथम आपल्या उत्कृष्ट गृहस्थाला न्यायाच्या गादीवर नेऊन बसवितात आणि त्याच्या हातीं शिक्का मोर्तब दिला कीं लागलींच टांकसाळेंतील न्यायशास्त्राची ज्ञानज्योती सर्वत्र प्रकाश करिते. आणि असा प्रकाश पडला आहे अशा विषयीं सनद देण्यासाठीं ही लोअर हायर परीक्षा काढली आहे. न्याय खात्यांतील नेमणुका संबंधानें हा मोठा दोष आहे. आणि तो दूर करण्याला इतकीं वर्षे कां लागलीं या बद्दलच आह्मास आश्चर्य वाटतें. आणि अजूनही हा प्रकार चालूच राहील तर धन्यवाद कोणाचा यावा बरें ?

## योग्य सन्मान

राजा इंद्रकरण बहादूर असफ जहाई, आनररी अस्थाची, आकोला हे सर्व सप्तरांचें काम शिकण्यासाठीं आले आहेत. दिवाणी, मुलकी, फौजदारी, खजिना वगैरे सर्व खात्यांचीं कामें ते गेल्या दोन वर्षांत चांगलें शिकले असून लवकरच त्यांस हैदराबादेस परत बोलावण्यांत येईल. त्यांचा परत जाण्याचा काल समीप येत चालला ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ पानसुपारी, मेजवानी व गायनादि आनंदोत्सव चालूं आहेत. गेल्या बुधवारीं आकोला जिल्ह्याचे देशमुख, देशपांडे व इतर जमीदार यांनीं राजे साहेबांस मोठी पानसुपारी दिली. हा समारंभ फार चांगला झाला. न्यू जिनिंग फ्याक्टरीचा दिवाणखाना मोठा शोभायमान केला होता प्रथमतः रा० रा० रामराव गोपाळ देशपांडे यांनीं मराठींत साहेब बहादुरांचा मोठा गौरव केला आणि त्याचप्रमाणें त्या समयाला उचित असें उर्दू भाषण झालें. या सभेला कुमार श्री हरभामजी व इतर अधिकारी, व्यापारी, वकील वगैरे मंडळी पुष्कळ जमली होती. त्यांस उद्देशून राजे साहेब उत्तरा दाखल उर्दूत अस्खलितपणें बोलले. ते ह्मणाले कीं:—

"जमेदार मंडळीचा व आमचा बिरादरीचा संबंध आहे. आह्मी निजाम सरकारच्या माल दफ्तरचे सर कामदार आहों आणि या दफ्तराशीं योमियेदार, जमेदार, देशमुख, देशपांडे व दस्तमदार यांचा परस्पर संबंध अगदी निकट आहे. गेल्या दुष्काळांत मी केलेली खिजमत्‌गुजारी लोकांस पसंत पडली. लोक खुषी आहेत हेंच मी उत्तम बक्षीस समजतों. सरकारांत व लोकांत माझ्या कामाची चहा झाली याहून अधीक आनंदाची दुसरी गोष्ट कोणती असणार आहे ! आपल्या प्रांतांत जादा मुक्काम व्हावा आणि आपला सहवास घडावा असा माझ्या दिलाचा अर्ज आहे. आपला सहवास मला फार आवडला. पण आतां कुलकाम शिकल्यानंतर पातशहाचे दरबारीं परत जाणें फार जरूर आहे. पातशहाचा आस्ताना आमच्या बुजरुका लोकांनीं सोडला नाहीं, आमच्यानें सोडवणार नाहीं आणि आमची मुलेंबाळें सोडणार नाहींत. इतकीं दोन वर्षे आह्मी त्या दरबारा पासून लांब आहों तर आह्मास अगदीं चुकल्या सारखें वाटतें. आपल्या लोभानें व प्रेमानें मी तुमचा बनलों आहे. पण माणसाला दुनियेदारी दूर दूर ठेविते. तरी आपण मला कृपा करून आपल्या हृदयांत जागा द्याल अशी आशा आहे.

# The Berar Samachar

## MONDAY SEPTEMBER 30, 1901

We do not hope to form one people unless we cut our way against so many odds. Circumstances of the day seem to conspire against us and we are being drifted into a state of helplessness. Progress is impossible unless we show our moral strength to live a life of hard and fast principles. Self—help is no longer our staff of life. Our whole life is one sorry tale of hopeless inability to hold our own in the present struggle for bread. The sole basis of improvement is material stability, Wealth is the real lever by which we can raise ourselves to happiness. If we do not control the sources of wealth and gradually lose our old ones, it is a sure sign that we are running through our present fortune and shall soon be in the midst of a war wherein we shall be down trodden in no minute." If we are conservative in our habits and steady and stagnant in our walk of life, we presume that in our state of decline our very unpropensive aversion to change is a safe—guard against our rapid fall. We have in us the old instincts of nationality, but there are no hopeful signs of improving, much less of securing, the material wealth of the nation. Whatever we may be we are sure to fall if we do not insure an economical solvency. We are bad in politics, backward in social reform and sceptic about the moral strength of religion. In short we are not independent in tone, noble in morals and defiant against degradation. Our curse is the cringing policy that besets our whole life with the sins of running after bread. The present war and competition for bread has brought us to the stage of a dying nation. The real difficulty lies upon the proper solution of this problem of bread. We have got the excellent virtues of self—denial and contentment. These are our prerogatives of the Hindu religion. We only want a school of self—discipline. We have to learn a-new the lessons of history. We can see in the wealth of England the real power of progress and reform in all departments of human activity. The recent history of Japan is another vivid and concrete instance wherein we shall see that progressive wealth organizes the national life. We have in India got the noblest blessings of the British rule but with all our development we are lacking in the modern agencies of producing wealth. There is no industry worth the name, nor is there any commerce that can keep the wealth of the country in the country itself, and can stop the further exploitation of the country for the exclusive advancement of the rulers. We have been enjoying the good of a foreign rule of the best type but in paying a heavy price for such a rule we have made no provisions for the ills and miseries consequent upon it. This want of providing against the drain of national wealth is the cause of our ruin. We bow down to these circumstances and are being drifted by them. Unless we exercise some controling influence on them we shall run to the inevitable—a lot of all nations that once had enjoyed a bright day. It is only to be seen whether we shall change the current of the inevitable. If we succeed we shall hand over to future generations a task of forming a progressive people.

We have explained our difficulty and we have shown what should be the summum bonum of national life. Material wealth is no doubt a means to an end but a time has come when it should be our sole and substantial goal. Our education must equip us with the means of making money. Our industry and commerce should be the main stay of our occupation. Agriculture should be less crowded than what it is at present. The present mode of life should also receive a check because it has raised the standard of our comforts and engendered the supineness of a a prodigal gambler. We should turn our back against such deadly modes of living. It would be for better if we, who hold it as our sacred duty to revive our fallen nation, unite in one people and work below assiduously in the way indicated in the eloquent terms of the Bengalee. "Elevation and progress demand a vast deal of self-sacrifice and self-reliance, and these are the virtues, so essential to the well-being of our national life. Work and no speculation should be our motto; and a firm belief in the noble reward, which work brings in its train, should prompt us in all our undertakings and steady the feet of the wavering and the vacillating. A nation earns progress which has learnt to work and to undergo sacrifices. We at the present moment do greatly need self-discipline and self-sacrifice. In these lies our salvation, and with their help we must work it out. Slow progress must not dis-hearten us; our hearts must not sink within us if our efforts are not crowned with instant success. We must go on working; and our salvation, by an immutable and unerring law, must inevitably come if we work manfully for it.

## वऱ्हाड

हवामान— ऊन अती तापतें. रात्रीं पहाटेस थंडी पडते. हस्तनक्षत्राचे पाऊस एक दोन जरूर पाहिजेत. दोषिक ज्वरही जोरावर आहेत,

वेदशास्त्र संपन्न रा० रा० नारायण शास्त्री कऱ्हाडकर हे आकोल्यास आले होते, हे पुराणिक आहेत. पुराण फार चांगलें सांगतात. सध्यां ते उमरावतीस गेले आहेत.

राव बहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर व रा० रा० मोरो विश्वनाथ जोशी हे यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या कामानिमित्त अलाहाबादेस गेले आहेत.

मे० ब्यारन साहेब जुडिशिअल कमिशनर हे हैदराबादला एका मोकद्दम्याच्या कामानिमित्त गेले आहेत.

### नोटीस

बेशमी रामराय लक्ष्मीनारायण मारवाडी राहणार ताजनापेठ, आकोला यांसः—

नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मा उभयतांच्या मालकीचें घर दरमहा चार रुपये भाड्यानें घेतलें. पण भाडे चिठ्ठींत न कळत दरसाल ४८ रुपया ऐवजीं ४० रुपये लिहून दिलें. आह्मी सदहू घर गहाण ठेऊन २०० रुपये कागदीं कर्ज काढलें होतें पण त्यापैकीं फक्त १०० रुपयेच घेतले आहेत. तुह्मी हल्लीं आमच्या घरांवर पदरचा पैसा खर्च करून वाटेल तसें बांधीत आहां. तसें तुह्मी करूं नये ह्मणून पुष्कळ सांगितलें पण तुह्मी ऐकत नाहीं. आमच्या घराची रचना आमच्या खुशीवरची आहे. तुह्मी पैसा खर्च केलेला आह्मांस कबूल नाहीं व पुढें कराल तर तो मान्य नाहीं. तुह्मी आमचें घर खालीं करून द्यावें. तुमच्या गहाणापैकीं भरणा १०० रुपये घेतला आहे. गहाणाची रकम रुपये ११६४८ व्याजासुद्धां होते त्यांतून घर भाड्याबद्दल ६६ रुपये वजा करितां बाकीची रकम ९०४८ शेट किसनदास चापसी कपडेवाला यांच्या **दुकानावरून घेऊन जावी.** यापुढें तुमचें व्याज बंद आहे. तुह्मी भाडेचिठ्ठींत लिहिलेल्या लांबलचक गोष्टी आह्मांस कबूल नाहींत. घर खालीं करून तीन दिवसांत पाहिजे. तसें न केल्यास कोर्ट मार्फत परत मिळेपर्यंत तुह्माकडून दरमहा ८ रुपये प्रमाणें भाडें वसूल केलें जाईल. कळावें. तारीख २९ माहे सप्टेंबर सन १९०१ इसवी.

(सही)

हुसेनखा वल्लद बुडेखा निशाणी

बिरामखा वल्लद बुडेखा

दस्तुर खुद्द.

### नोटीस.

रा० रा० भगवंतराव खुशालराव देशमुख राहणार हिवरखेड तालुके अकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून नो- [illegible] ते बडतर्फ झाले येते कीं, तुमचे शेत हिवरखेड येथील सरकारचा इमानें पैकीं २९६ एकर २० [illegible] व मोठमोठीं कामें हे खाते $\frac{१}{६}$ हिशाचें तुह्मी [illegible] गरनें त्यांस ह्मातार शिपी यास रुपये ३२५ [illegible] हुत पेनशन दिलें, देऊन तारीख २०-२-९ [illegible] पेनेलसाहेबां सारखा तबिगहाण लिहून दिले व [illegible] राजीनव्हता. विचो[illegible] दिले तो दस्तऐवज आह्मास सदर झाले कीं [illegible] यानीं तारीख ८-८-१९०० रोजीं मोजीनात ३१९ यास बेचण देऊन आमचे स्वाधीन्तानें केलें. व हल्लीं ताब्यांत दिल्यावरून तुह्मास सुचवितो कीं तबिगहाणाचे शर्ती प्रमाणें रुपये तुह्मी आह्मास द्यावे. जाणून कांहीं देऊं नये. त्या दस्तऐवजावर पूर्ण मालकी आमची, आहे करारा प्रमाणें रुपये आणून देऊन दस्तऐवज घेऊन जावे कळावे, ता. २९।९। १९०१ इसवी.

सही.

मिवराज रामसुख दस्तुर मोतीलाल

हिवरखेड.

## वर्तमानसार

सर्पदंशावर उपाय-एका डाक्तरचे स्वानुभवावरून असें ह्मणणें आहे कीं, साप चावला असतां मनुष्यास पोटांत गंधकाचा तेजाब ( sulphurc acid ) द्यावा व ज्या ठिकाणीं तो चावला असेल तेथें शुद्ध तेजाब त्वचेचा भेद करून आंत घालावा. यानें हटकून साप उततो.

न्यायाची मौज—लंडन शहरांतील एका गाडीवाल्यानें आपल्या गाडींतील स्त्रीचा मुका घेतला ह्मणून तिनें त्यास मारलें. गाडीवाल्यानें न्यायदरबारांत असें सांगितलें कीं, त्या स्त्रीचा मुका घेतला त्यावेळीं मी निर्दोष होतो. त्या स्त्रीनें आपल्या मदनचेष्टांनीं मला सुचविल्यामुळें मी तिचा मुका घेतला. तिच्या मदनविलासी चेष्टांनीं मला तिचा मुका घ्यायला लावल्यामुळें मी सरकारच्या कायद्यांत सांपडत नाहीं. माजिस्ट्रेटांनीं मुका घेणारास सोडून देऊन मुका देणाऱ्या स्त्रीस ७ शिलिंग दंड केला.

इंटरनॅशनल पोलीस—अराजक लोकां सारख्या दुष्ट व घातकी लोकांचा परिपूर्ण बंदोबस्त करण्यासाठीं सर्व राष्ट्रांनीं मिळून एक हुषार पोलीस नेमावे असें घाटत आहे.

पाऊस पाणी—पावसाकडे सर्वांचे डोळे लागले होते. ईशकृपेनें थोडा बहुत पाऊस सर्वत्र झाला. लोकांना आतां आशा लागली, व हस्त नक्षत्राचा पाऊस बरा झाला तर सर्वत्र आबादानी होईल असा रंग दिसतो.

रशियाची कारवाई—इराण देश रशियानें आपलासा करून सोडलाच आहे व तिबेट मिशन पाठवून आपला पैगम तिबेटांतहि बसविल्या सारखाच आहे. आतां हिंदुस्थानांत उतरण्यास आडकाठी काय ती काबूलच्या अमीरांचीच राहिली. व तेथेहि पाताळयंत्र सुरूं असेलच. आमचे सरकारहि सावध असेल हें निराळें सांगणें नकोच.

बोलण्याचें चातुर्य— पुष्कळांस असा भ्रम असतो कीं, आपण वाटेल तितकें बोलूं शकूं पण खरें पहातां एखाद्या बरोबर दोन घटका सहज संभाषण करीत बसणें काम सोपें नाहीं. हें चातुर्याचें काम आहे व पुष्क- ीं नसेत. उगीच वेड्या सारखी बडबड मनुष्य करूं शकेल. शब्द, शहाणपणानें, नवीन दुसऱ्यास आवडतील असें कठीण होय. हें काम चातुर्य अवलोकन, बहुश्रुत- ाभ्यासंग या शिवाय कोणासही होणार नाहीं. आणि ह्मणूनच ासे एखाद्या मनुष्याशीं घटकाभर बोलून ाचें मन रंजविण्याची वेळ आली ह्मणजे त्याची फजिती होते.

शर्यतीची नवीन तऱ्हा—अश्वादि उमद्या जनावरांची शर्यत लावण्याचा छंद पुष्कळांस असतो. पण फ्रान्सांत कांहींजणांची आवड विलक्षणच आहे. त्यांनीं बेडूक, बदक वगैरेचीच शर्यत लावली.

मनुष्य जात्या मांसाहारी आहे कीं नाहीं यास कांहीं गमतीचीं प्रमाणें:—मांसहारी प्राणी व वनस्पती खाणारे प्राणी असे दोन बाजूस उभे करून मनुष्यास मध्यें उभें करावें व त्याचा स्वभाव कोणत्या प्राण्याशीं विशेष जुळतो हें पहावें. जसें—सर्व मांसाहारी प्राणी रात्रींचे जास्त वावरतात. त्यांना घाम येत नाहीं व एक टांग वर करून ते मुततात. जे मांसाहारी नाहींत त्यांच्या गोष्टी याच्या उलट असतात. मनुष्याचा स्वभाव यांच्याशींच विशेष जुळतो ह्मणून तो मांसाहारी नाहीं.

नवीन शोध—आकाशगंगेच्या अलीकडच्या फोटोग्राफावरून असें कळलें आहे कीं त्या तारासमुहांत पन्नास सूर्यकोटी आहेत व प्रत्येकाची निरनिराळी ग्रहमाला आहे.

उपजतांच शिंगें— रत्नागिरी जिल्ह्यांत गेवरें गांवीं एका कुणब्याच्या गाईस वांसरूं झालें असून त्याला उपजत वीतभर शिंगें आहेत. वांसरूं अद्याप चांगलें हुषारींत आहे.

एकदम चार मुलें झालीं:-खोसपुरी ता० नेवासे येथें गेल्या १२ वे तारखेस सिताबाई मागाजी भालेराव नांवाच्या बाईस एकदम तीन मुलगे व एक मुलगी अशी आपत्यें निपजलीं. दुर्दैवानें चारी मुलें त्याच दिवशीं मेलीं. मुलीस उपजतच दांत आले होते असें ह्मणतात.

टेंकडी सरकूं लागली—फ्रान्सांत गार्ड नदीच्या जवळ ६५० फूट उंचीची एक टेंकडी आहे. ती इ० सन १८९६ च्या फेब्रुवारी महिन्यांत आपोआप हळू हळू नदीकडे चालूं लागली आहे तिनें कितीएक मैल आगगाडीचा रस्ता नाहींसा केला, आणि त्या नदीस ६॥ फूट मागें हटविलें ही टेंकडी नदीच्या पलीकडे जाऊन तेथच्या मोठ्या डोंगरास केव्हां तरी मिळेल ह्मणतात.

उत्तमोत्तम—इंग्लंडच्या फौजेचा कायदा असा आहे कीं, कोणत्याही शिपायाचा शिपाईपणाच्या पेशांत असतांना जर एखादा अवयव गेला तर तो अवयव बसवून देण्याचें जोखीम सरकारचे शिरावर आहे. काम करीत असतांना अवयव नष्ट जाहला तर तो बसवावयाचा एवढेंच नाहीं, तर नौकरींतून शिपाई कमी जाहल्यावर देखील त्याचा अवयव गेल्यास तो सरकार बसवून देतें. हा नियम आतां हिंदुस्थानासही लागू होणार ह्मणून समजतें. प्रे.

पतित परावर्तन— बंगालच्या आर्यसमाजानें बाटलेल्या ख्रिस्ती लोकांस परत हिंदुसमाजांत घेण्याची रीत गेल्या तीन वर्षांपासून सुरू केली व आजपर्यंत सुमारें दोन हजार लोकांस प्रायश्चित देऊन पुनः हिंदूंत घेतलें. व इतक्यांत बाटलेला एक संभावित बंगाली गृहस्थ समाजास एक हजार रुपये देऊन हिंदु होणार आहे असें सांगतात. ही रीत चहूंकडे चालू होईल तर ख्रिस्त्यांचा ख्रिस्ती धर्म चांगलाच कसोटीस लागेल.

हिरे वजन करण्याचें तराजू:—हें इतकें सूक्ष्म असतात कीं, त्यांच्या पारड्या मध्यें धुळीचा अगदीं बारीक कण किंवा पापणीचा केस पडला तरी देखील सहन होत नाहीं.

मस्तकशूळ बंद होण्याचा बिनखर्चाचा हा खालील उपाय एका ब्राह्मो गृहस्थानें प्रसिद्ध केला आहे व त्याच्या योगानें डोकें दुखण्याचें हटकून बंद होतें असें तो सांगतो.

कागदाचा एक लहानसा तुकडा घेऊन तो चांगला चौकोनी करावा व त्यावर पुढील प्रमाणें सारखे नऊ चौकोन पाडावे. इतकें झाल्यावर त्या ९ चौकोनांत डाव्या आंगून आरंभ करून पुढील प्रमाणें प्रत्येक चौकोनांत १, २, ३, असे ८ आंकडे घालावे आणि मधला चौकोन रिकामा ठेवावा.

| | | |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ६ | | ४ |
| ८ | ५ | ७ |

नंतर एक मोठा दगड घ्यावा. मग ज्या वारीं तो आजारी माणूस जन्मला असेल त्य वाराचा नंबर रविवार १ व सोमवार २ या क्रमानें त्या रिकाम्या कोष्टकांत घालावा. इतकी तयारी झाल्यावर त्या आजारी माणसास तेथें पडूं द्यावें आणि तो कागद त्या नंबरासह त्या दगडाखालीं दाबावा असें करतांना त्या ९ चौकोनांतल्या मधल्या चौकोनास भोक पडणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी आणि तो कागद त्या दगड खालीं दाबतांना त्या आजारी माणसास सावध राहण्याची ताकीद करावी. पुढें तो दगड त्या कागदा वरून एकीकडे काढावा आणि तो काढतांच त्याचें डोकें दुखणें बंद होतें. उपाय साधा आहे आणि पुष्कळ लोक त्याचा प्रयोग करून अनुभव पहातील अशी आशा आहे.

लढाई— बोअर लोकांचा लागलेला वणवा केव्हां भडकेल व केव्हां नाहीं याचा अंदाजच होत नाहीं. ह्या वणव्यांत हजारों इंग्रज बहादर अद्याप होरपळून जात आहेत. लॉर्ड किचनेर सारख्या सेनाधिपतींनीं कितीहि लांबलचक व धमकीचे जाहीरनामे काढले तरी त्यांची बोअर लोकांस कांहींच भीति वाटत नाहीं. परवां नुकताच बोअर लोकांनीं थोडासा इंग्रजास हात दाखविला. व त्यांत इंग्रजांस माघार खावी लागली. बोअर सरदारांची शहामत व हिंम्मत अप्रतीम होत.

लढाईविषयीं भविष्य—विलायतेंत नुकतेंच एक ओल्ड मूरचें पंचांग निघालें आहे. त्यांत हल्लीं चालू असलेली दक्षिण आफ्रिकेंतील लढाई येत्या जानेवारींत बंद होईल, व जुलैमध्यें पुनः एक मोठें बंड उपस्थित होईल आणि त्याचा ब्रिटनच पूर्णपणें मोड करील. नंतर पुढील सालचे अखेरीस तेथें चांगली स्वस्थता होईल असें भविष्य केलें आहे. ईश्वर करो व सर्वांचीच ईडापीडा टळो.

| राज्य. | लोकसंख्या |
|---|---|
| इंग्लिशांचें राज्य. | ३९ कोट |
| रशियाचें राज्य. | १३ " |
| स्वतंत्र संस्थानचें राज्य. | ८ " ७० लक्ष |
| फ्रान्साचें राज्य. | ९ " ६० लक्ष |
| जर्मनीचें राज्य. | ७ " |

या वरून आपलें इंग्रजी राष्ट्र सर्वांत बलवान् आहे हें स्पष्ट दिसतें.

नोटीस

रावजी वल्लद विठोबा पाटील राहणार मौजे पळसी सुपो प्रगणें जळगांव तालुके मजकूर जिल्हे आकोले यास:——

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे पळसी सुपो येथील शेत सरवई नंबर ५३ ठिके बिड्यावाले यातील पांच ८५ आणि चार ८४ पैचा हिसा याचे खाते नामदेव वल्लद केशव पाटील याचे नांवें असून खातेदारापासून मी दोनशे रुपयास खरिदी घेतला आहे असें असून तुह्मी स्वतः जबरीनें वाहता. सदर्हू शेतासंबंधानें आह्मी बरेच वेळां ताबा मागितला असतां देतो देतो ह्मणतां परंतु आज पावेतो देत नाहीं. मालकी प्रमाणें बळकावून बसले. या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं सदर्हू शेतांत असलेले पिकासह नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत घरील हिसा आमचे ताब्यांत द्यावा. न दिल्यास तुमचेवर दिवाणींत दावा करून नुकसानीसह व नोटीशीचे खर्चासह रुपये भरून घेतले जातील. कळावे तारीख २७ ९।१९०१ इसवी.

सही

नारायण बाळकृष्ण कुळकर्णी
पळसी सुपो

नोटीस.

बेशमी सुर्यभान गावंडे राहणार दहीगांव तालुका आकोला पोस्ट बोरगांव यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितो कीं, तुमची मुलगी नर्मे जनी हिजशी मी गंधर्व केला त्यास सुमारे ९-१० महिने झाले. आह्मी दोघे सुखानें नांदत होतो. असें असूनहि तुमच्या संमत्तीनेंच तुमच्या तीन मुलांनीं ह्मणजे पुरण, शिताराम व टिकाराम यांनीं गेल्या तारीख २२ रोजीं माझ्या बायकोस ह्मणजे त्यांनीं आपल्या बहिणीस, मी बाहेर गांवीं गेलों आहे अशी संधी साधून, माझ्या घरातून बाहेर काढून पळवून नेले. वाटेंत मी त्याना पळवून नेत असतांना पाहिले, व माझी बायको सोडून द्या ह्मणून मी त्यांस हटकले, पण जबरदस्तीनें त्यांनीं आपलें कृत्य तडीस नेलें. मी पोलीसला या गोष्टोची वर्दी दिली पण मला पोलीसची मदत बरोबर मिळाली नाहीं असो. हल्लीं माझी बायको ह्मणजे तुमची मुलगी तुमच्या घरीं आहे. तिचे अंगावर सुमारे शंभर रुपयांचें धन आहे. तुह्मी ही नोटीस पावल्यापासून दोन दिवसांचे आंत तिला दागिन्यासह माझ्या घरीं आणून घालावें. असें न कराल तर मी तुमच्यावर व तुमच्या मुलांवर माझी बायको लबाडीनें पळवून नेल्याबद्दल, व पैशाच्या लालचीनें तिची नियत बिघडवून दुसरा मोहतीर करून देण्याच्या इराद्याबद्दल फौजदारी करीन व अखेर निकालापर्यंत जें नुकसान व जो खर्च लागेल तो सर्व तुमच्यापासून भरून घेईन. कळावें तारीख २७ माहे सप्टेंबर सन १९०१ इ.

सही

तुकाराम वल्लद हरसिंग वाकोळे
रहाणार गोरेगांव दस्तुर खुद्द.

पुरवणी पाहा